म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. नं. ५८४

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.
संग्रहालय/वाचनालय शाखा.

अनुक्रम नं. | विभाग निबंध | क्रमांक

पुस्तकाचें नांव

लेखक संपादक

सूचना—पुस्तक आठ दिवसांवर ठेवूं नका पुस्तकाची खराबी करूं नका.

REFBK-0006827

नि. २१५

म. सा. प. ग्रं.
र. नं. ८३६३
निबंध वि. भाग
क्रमां १०१५

# सोव्हिएट दर्शन



युगवाणी प्रकाशन

श्री. वा. वि. भट यांनीं हें
पुस्तक अभिनव प्रकाशन
तर्फे छापून युगवाणी
प्रकाशन साठीं प्रसिद्ध केलें.
१२ त्रिभुवनरोड, मुंबई ४

आवृत्ति १ ली : १९४७
किंमत दोन रुपये
सर्वाधिकार सुरक्षित
मुद्रक :
डी. डी. नाईक
"फेमस प्रिंटर्स"
१२ त्रिभुवनरोड, मुंबई ४



REFBK-0006827

# सॉव्हिएट दर्शन

# अनुक्रम

पृष्ठांक ८८२५


★ परिचय
डॉ. रा. ना. दांडेकर

★ रशियन रंगभूमि — १
के. नारायण काळे

★ रवीन्द्रनाथ टागोर व सोव्हिएट यूनियन — १३
श्री. पु. का. ओक

★ सोव्हिएट आरोग्यव्यवस्था — २४
डॉ. सुशीला बेडेकर

★ सोव्हिएट विरोधामागील अर्थकारण — ४५
प्रि. वा. य. कोल्हटकर

★ कारंज्याजवळील सफरचंद — ६०
श्री. 'शशिकांत पुनर्वसु'

★ सोव्हिएट शाळा — ६७
सौ. प्रभावती जोशी

★ सोव्हिएटमधील धर्मस्वातंत्र्य — ८१
श्री. दि. वा. फडनवीस

★ चुकची जमातीची प्रगति — ९३
प्रा. अ. रा. कामत

★ लेखक परिचय — १११

# परिचय

शिक्षण, राजकीय व आर्थिक व्यवस्था, कुटुंबसंस्था इत्यादि विविध बाबतींत सोव्हिएट यूनियनमध्यें काय परिस्थिति आहे हें आपल्या लोकांना सांगण्याचें कार्य सोव्हिएट–मित्र–संघ या संस्थेतर्फे करीत असतांना आम्हांला असा अनुभव आला कीं सोव्हिएट यूनियनसंबंधीं लोकांची जिज्ञासा वाढत्या प्रमाणावर आहे. अशी जिज्ञासा पूर्वीं फक्त राजकीय कार्यकर्त्यांमध्यें, विशेषतः समाजवादानें आकर्षिलेल्या तरुणांत, होती. आतां सामान्य माणसांत ती दिसते. शिक्षक, डॉक्टर, शास्त्रीय विषयांचें संशोधन करणारे विद्वान, कलावंत यांना आज सोव्हिएटनें केलेल्या प्रगतीची माहिती हवी आहे; तसेंच, साध्या नागरिकांनाहीं तेथील जीवनाचें सर्वांगीण ज्ञान हवेंसें वाटूं लागलें आहे.

सर्व व्यवसायांतील आणि सर्व दर्जाच्या व मनोवृत्तींच्या लोकांमध्ये सोव्हिएट समाजासंबंधींचें कुतूहल इतक्या व्यापक प्रमाणावर निर्माण होण्याचीं अनेक कारणें आहेत. अगदीं अलीकडचें व ठळक कारण म्हणजे गेल्या महायुद्धांत बलाढ्य व सर्वशक्तिमान भासणाऱ्या फॅसिस्ट साम्राज्यवादाचा सोव्हिएटनें केलेला लष्करी पराभव. सोव्हिएटच्या या विजयामुळें लोकांना वाटूं लागलें आहे कीं एवढ्या महासंकटाला जवळजवळ एकाकीपणानें यशस्वी रीतीनें टक्कर देणाऱ्या सोव्हिएट जनतेचें मनोधैर्य, देशाभिमान, आर्थिक व सामाजिक संघटन व राज्यव्यवस्था भक्कम व विस्तृत लोकशाहीच्या पायावर व तत्वांवर उभारलेली असली पाहिजे. तेथील लोकांमध्यें जर सुखलोलुपता, नैतिक अधःपात, कसल्याही हुकुमशाहीच्या-खालीं बिनबोभाट दबून राहण्याची नेभळट व भेकड वृत्ति व भयंकर विषमता असती तर नाझी रणगाड्यांच्या पहिल्या धडकीनेंच तेथें अराजक माजलें असतें, फंदफितुरीला ऊत आला असता व सोव्हिएट राज्य धुळीला मिळालें असतें, ही गोष्ट आज लोकांना स्पष्ट दिसते व म्हणूनच मनांतून

त्यांना खात्री पटते कीं हे दोष सोव्हिएटमध्यें नसावेत. अवघ्या तीस वर्षांच्या अवधींत, मागासलेला झारकालीन रशियन समाज बदलून आजचा प्रबळ व पुढारलेला सोव्हिएट समाज निर्माण झाला आहे; तो कसा आहे, त्या समाजाच्या जीवनाचीं विविध अंगें कसकशीं बदलत व विकासत गेलीं आहेत, याविषयीं प्रत्येकाला जिज्ञासा वाटत आहे.

लष्करी सामर्थ्यामुळें विजयी ठरलेल्या सोव्हिएट समाजाबद्दल वाटणाऱ्या या जिज्ञासेला पोषक अशी दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे सोव्हिएटचें जागतिक शांततेसंबंधींचें व परतंत्र दुर्बळ राष्ट्रांसंबंधींचें परराष्ट्रीय धोरण. यासंबंधीं थोडीफार चर्चा प्रस्तुत पुस्तकांत प्रि. कोल्हटकर यांच्या लेखामध्यें आलेली आहेच; याशिवाय, अगदीं अलीकडे संयुक्त राष्ट्रांच्या बैठकींत मोलोटोव, ग्रोमिको, व्हिशिन्स्की प्रभृति सोव्हिएट प्रतिनिधींनीं हिंदुस्थानाविषयीं, दक्षिण आफ्रिकेंतील युरोपियनेतर प्रजेविषयीं, स्पेनविषयीं आणि अशाच आंतरराष्ट्रीय शांततेच्या व लोकशाहीच्या प्रश्नांविषयीं आपली भूमिका स्पष्ट मांडली आहे. श्रीमती विजयालक्ष्मींनीं या बाबतींत असें स्पष्टच म्हटलें आहे कीं, ज्या गोष्टी बोलण्याचेंही साम्राज्यवादी राष्ट्रांनीं टाळलें त्या गोष्टी निर्भीडपणें व संपूर्ण माहितीनें भरलेली भाषणें करून सोव्हिएट प्रतिनिधींनीं मांडल्या. जगांतील राष्ट्रांचें निःशस्त्रीकरण व परतंत्र राष्ट्रांना तावडतोब स्वयंनिर्णय ह्या दोन महत्वाच्या मुद्यांवर सोव्हिएटनें धरलेला आग्रह व दाखवलेला निश्चयीपणा पाहूनच संयुक्त राष्ट्र संघटनेविषयीं आपल्या पुढाऱ्यांना आतां आशा वाटूं लागली आहे, व सोव्हिएटला एक पाताळयंत्री साम्राज्यवादी “ बडा दादा ” समजण्याची वृत्ति एकंदरींतच कमी होत आहे. ग्रीस, इराण, स्पेन, इंडोनेशिया, चीन इत्यादि राष्ट्रांत ब्रिटन व अमेरिका यांची लष्करी व इतर कारस्थानें वाढतच असल्यामुळें पुन्हा युद्धाची भीति वाटूं लागली असल्यानें सोव्हिएटकडे लोकांचें लक्ष वेधलें जाणें व आपुलकी वाटूं लागणें, अपरिहार्य आहे.

वरील महत्त्वाच्या कारणांच्या जोडीला दुसरीं अनेक लहानमोठीं कारणें आहेत कीं ज्यामुळें वर सांगितलेला सोव्हिएट यूनियनसंबंधींचा मित्रभाव येथें वाढूं लागला आहे व तो असा वाढत जाणें साहजिकच आहे. यूरोप व आशिया या दोन्ही खंडांतील प्रदेश जसा सोव्हिएट भूमीमध्यें सामावलेला आहे, त्याप्रमाणें या दोन्ही खंडांतील जनतेनें प्राचीन काळापासून आजपर्यंत जें जें कांहीं मोलाचें व मानवाला श्रेयस्कर असें निर्माण केलें आहे त्या सर्वांचें संरक्षण व संवर्धन सोव्हिएट यूनियन व जगांतील इतर सर्व राष्ट्रें यांच्यामधील अशा मित्रभावावर अवलंबून आहे.

या मित्रभावाची वाढ करण्यासाठींच सोव्हिएट-मित्र-संघाचें कार्य चाललेलें आहे.

## अनुकरण व अंधश्रद्धा नव्हे

सोव्हिएटसंबंधीं मित्रभाव म्हणजे तेथील सर्व गोष्टींच्या चांगुलपणाविषयीं अंधश्रद्धा नव्हे व तिच्या पोटीं उद्भवणारी अनुकरणाची इच्छाही नव्हे. उलटपक्षीं, आपला सोव्हिएटसंबंधींचा मित्रभाव समानतेच्या, स्वाभिमानाच्या व सहकार्याच्या पायावरच उभारलेला असावयास पाहिजे. आंधळें अनुकरण किंवा आंधळा द्वेष हा जित व जेते यांच्यामध्यें निर्माण होतो, ही गोष्ट आपल्या जनतेला परिचयाची आहे. परंतु, आज ज्या नव्या लोकसत्तात्मक जगाकडे आपण पहात आहोंत त्या जगांत जित व जेते, साम्राज्यकर्ते व गुलाम, पालक राष्ट्रें व दुबळीं मांडलिक राष्ट्रें, असे भेदच नष्ट व्हावयाचे आहेत व याच सामान्य ध्येयामुळें आपण व सोव्हिएट यूनियन यांच्यामध्यें मैत्री उत्पन्न होणें व तीं टिकणें शक्य आहे.

खुद्द सोव्हिएट यूनियनमध्यें असा मित्रभाव आपल्यासंबंधीं आहे काय? याचें उत्तर अस्तिपक्षींच देतां येतें. रवींद्रनाथ टागोरांनीं प्रत्यक्ष तेथें जाऊन जो अनुभव घेतला त्यासंबंधींचें कांहीं उतारे व एका सोव्हिएट लेखकाचा

एक लेख ह्या पुस्तकांत छापलेला आहे; त्यावरून याची प्रचीति येईल. शिवाय तेथील सामान्य नागरिकाला हिंदी राजकीय व सामाजिक जीवनाबद्दल जी भरपूर व खरी माहिती देण्यांत येते, त्यावरून तेथील व्यापक सहानुभूति व मैत्रीच दिसून येते. उदाहरणार्थ, सन १९४२ सालीं काँग्रेसच्या पुढाऱ्यांना फॅसिझमचे हस्तक ठरवून तुरुंगांत डांबण्यांत आलें व साऱ्या जगांतील वृत्तपत्र संस्थांनीं ब्रिटिशांना अनुकूल प्रचार केला. सर्व पुढारलेल्या देशांतील जनतेला "रायटर" प्रभृति प्रतिगामी संस्थांनीं पुरविलेली माहिती मिळाली; परंतु कोट्यावधि सोव्हिएट जनतेला मात्र काँग्रेसची खरी भूमिका व मागणी आणि जनतेवर झालेली दडपशाही यांचा वृत्तान्त वाचावयास मिळाला. वर्णद्वेष व साम्राज्यवाद यांच्या विषारी प्रभावाखालीं युरोपीय व अमेरिकन प्रचारसंस्था आहेत, त्यामुळें हिंदुस्थानासारख्या आशिया-वासी व परतंत्र देशाबद्दल त्यांचा प्रचार सहानुभूतिशून्यच असणार. उलट, वर्णद्वेषाला व आक्रमक वृत्तीला सोव्हिएट व्यवस्थेंत स्थानच नसल्यानें तेथील जनतेची व प्रचारसंस्थांची आपल्यासंबंधींची भावना मैत्रीचीच आहे.

## सोव्हिएट–मित्र–संघाचें कांहीं कार्य

सोव्हिएट यूनियनच्या कार्यासंबंधीं व ध्येयासंबंधीं वाढती जिज्ञासा आणि त्या देशांतील जनता व हिंदी जनता यांच्यामधील वाढता मित्रभाव या दुहेरी पायावर हिंदुस्थानांतील सोव्हिएट–मित्र–संघाचें कार्य चालू आहे. या संघाच्या शाखा सर्व प्रमुख हिंदी शहरांत आहेत व त्यामध्यें सर्व व्यवसायांतील आणि राजकीय व सामाजिक पक्षांतील लोक कार्य करीत आहेत. व्याख्यानें, चित्रें व फोटोग्राफ यांच्या द्वारें सोव्हिएटची कल्पना देणारीं प्रदर्शनें, सोव्हिएटमध्यें तयार झालेले ऐतिहासिक व सामाजिक चित्रपट, इत्यादि ज्ञानसाधनांच्या साहाय्यानें संघाचें कार्य चालू आहे; आणि या कार्यामुळें जास्त जास्त लोक सोव्हिएट यूनियनसंबंधीं व त्याच्या एकंदर ध्येयाविषयीं जागरूक होत आहेत. ..

पुणें येथें संघाची शाखा सन १९४० सालीं सुरू करण्यांत आली. तिच्या अल्पकार्यांचा अहवाल येथें देणें अप्रस्तुत होईल. परंतु, येथेंही आम्हांला हाच अनुभव आला आहे कीं लोकांची वाढती जिज्ञासा व आमची अल्प-शक्ति याचें व्यस्त प्रमाणच पडत आहे. व्याख्यानें व प्रदर्शनें यांव्यतिरिक्त प्रस्तुत पुस्तकांसारखीं पुस्तकें प्रकाशित करण्याचें आम्ही योजिलें आहे, तें देखील याच अनुभवामुळें. म्हणूनच आमच्या या प्रकाशन–कार्याला जनते-कडून भरपूर प्रोत्साहन मिळेल, अशी आम्हाला आशा आहे.

## सहकार्याची विनंती

मराठीमधून असें सोव्हिएट–वाङमय निर्माण करण्याची आवश्यकता भासल्यामुळें आम्हीं, हें कार्य हातीं घेतलें आहे. "सोव्हिएट–दर्शन" च्या या पहिल्या भागानंतर असेच पुढील भाग प्रकाशित करण्यासाठीं मराठी लेखकांनीं आपुलकीनें आम्हाला साहाय्य करणें आवश्यक आहे. सोव्हिएट–मित्र–संघ ही पक्षातीत संघटना असल्यामुळें कोणच्याही मतप्रणालीच्या विद्वानास किंवा लेखकास असें साहाय्य देणें शक्य आहे. सोव्हिएट यूनियनविषयीं आस्था व आदर असलेल्या प्रत्येक लेखकास स्वतःच्या विषयासंबंधीं सोव्हिएट यूनियनमध्यें चाललेल्या कार्याची माहिती मिळविणें व तिचा सर्वसाधारण वाचकांना उपयोग करून देणें हें सहज करतां येण्यासारखें आहे. प्रस्तुत पुस्तकांत वेगवेगळ्या क्षेत्रांमध्यें काम करणाऱ्या लेखकांचे जे लेख आहेत त्यावरूनच त्याची प्रचीति पटेल. म्हणून सोव्हिएट मित्र संघातर्फे आम्ही अशी विनंती करतों कीं या संग्रहाप्रमाणेंच आणखी पुस्तकें प्रकाशित करण्यासाठीं मराठी लेखकांनीं आम्हास मदत करावी.

## आभार

शेवटीं, या संग्रहाच्या प्रकाशनांत आम्हांला ज्या लेखकांचें साहाय्य झालें त्यांचे आभार मानणें जरूर आहे, त्यांपैकीं कांहीं लेखक आमच्या संघाचे कार्यकर्तेच असल्यामुळें त्यांचे आभार मानणें अर्थातच औपचारिक

ठरेल ; कारण संघाच्या कार्यापैकीच एक कार्य म्हणून त्यांनीं हें लेखन केलें आहे. परंतु, आमच्या संघाशीं तसा संबंध नसूनही केवळ सोव्हिएट यूनियन संबंधीं असलेल्या प्रेमादरामुळें ज्यांनीं आम्हांला लेखन साहाय्य दिलें, त्यांचें विशेष आभार मानले पाहिजेत.

प्रस्तुत संग्रहाप्रमाणेंच आणखीही संग्रह यथावकाश प्रसिद्ध करण्याचा आमचा विचार आहे. प्रस्तुत संग्रहासंबंधीं तसेंच आगामी प्रकाशनासंबंधीं सोव्हिएटप्रेमी लेखकांनीं व वाचकांनीं आम्हांला जर आपल्या सूचना व अभिप्राय पाठविले तर त्यांचा उपयोग होईल व हे संग्रह जास्तजास्त व लोकप्रिय करण्यास आम्हांला उत्तेजन मिळेल व मार्गदर्शन होईल. अशा सूचना पाठविण्याची आम्हीं सर्वांना विनंती करतों.

रा. ना. दांडेकर

प्राध्यापक, फर्ग्युसन कॉलेज

चिटणीस, भांडारकर प्राच्यविद्या संशोधन मंदिर

दि. १ मे १९४७ अध्यक्ष, **सोव्हिएट-मित्र-संघ** (पुणें)

**कार्यालयाचा-पत्ता**

श्री. **मो. शं. भडभडे**


चिटणीस, **सोव्हिएट-मित्र-संघ** (पुणें)

१४१७ कसबा पेठ, पंडितांचा वाडा

नव्या पुलाजवळ, पुणें



आपलीं मुलें नर्सरीज व किंडरगार्टन्स् मध्यें ठेवून आया निर्वेधपणें कामावर जाऊं शकतात. वरील देखावा "बोल्शाया इव्हॅनोव्हस्काया" या कापडाच्या गिरणींतील नर्सरीचा आहे.



उझ्बेकिस्तानचे शेतकरी आपल्या सामुदायिक शेतकीसंबंधी विचारविनिमय करीत असतांना



"सिटी ऑफ क्रॅफ्टस्‌मेन" मधील एक देखावा. मॉस्को येथील मुलांच्या मध्यवर्ति नाट्यसंस्थेतर्फे झालेल्या या नाटकाला "स्टॅलीन प्राईझ" मिळालें होतें.



लेनिनग्राडच्या एका शाळेतील बालविद्यार्थी. शिक्षकानें विचारलेल्या प्रश्नांचीं उत्तरें देण्याची आतुरता त्यांच्या चेहेऱ्यांवर स्पष्ट दिसत आहे.

# र शि य न रं ग भू मि

लेखक के. ना रा य ण काळे

रशियन रंगभूमीबद्दल अधिकारानें बोलण्या लिहिण्याचा हक्क मला नाहीं. प्रथमच हें प्रांजलपणें सांगणें जरूर आहे कीं रशियन भाषा मला समजत नाहीं. मी रशियाला जाऊन आलेला नाहीं. माझी माहिती आडगिऱ्हाइकी आहे. तीवरून बनलेले माझे विचार व मतें, कित्येक वेळां वस्तुस्थितीशीं विसंगत असण्याचाहि संभव आहे. ज्या साधनांच्या द्वारा ही माहिती मिळाली, तीं निर्माण करणारांच्या वैयक्तिक आवडी निवडींचा, समज गैरसमजांचाहि तिच्यावर परिणाम झालेला असणें शक्य आहे.

रशियन रंगभूमी जगांतील सर्व रंगभूमींत अत्यंत पुढारलेली आहे. अजूनही ती पुरोगामी आहे. जगांतल्या परिणत म्हणून समजल्या जाणाऱ्या रंगभूमींशीं प्रत्यक्ष संबंध असलेले अनेक नाटककार, दिग्दर्शक, चित्रकार, नट व प्रेक्षक यांनीं असें मत अनेकवार प्रदर्शित केलें आहे.

पण त्याबरोबरच, जगांतील इतर परिणत रंगभूमींपेक्षां रशियन रंगभूमीचें स्वरूप पूर्णपणें भिन्न आहे. तिचीं, व इतरांचीं ध्येयें व साधनें यामध्यें मूलगामी फरक आहे. यामुळें इतरांना तिचें स्वरूप कितीही मनोरम आणि उदात्त वाटलें, तरी त्याचें अनुकरण करणें त्यांना कितपत शक्य आहे याबद्दल मुक्त कंठानें तिची स्तुती करणाऱ्या व्यक्तींच्या अंत:करणांतहि साशंकताच असलेली आढळते.

आधुनिक रशियन रंगभूमीचें तात्त्विक अधिष्ठान मार्क्स, एंगेल्स, लेनिन, स्टॅलिन प्रणित शास्त्रीय समाजवादावर प्रतिष्ठित आहे. रशियन रंगभूमि वरील नाट्यव्यवसायाला नफ्याचा हेतु ही प्रेरणा नाहीं. वैयक्तिक अभिरुचि व उत्पन्नाचें मान यांनीं प्रयोगाच्या यशाचें मूल्यमापन तेथें होत नाहीं.

सामाजिक उपयुक्तता व कलात्मक सौंदर्य यावरून त्याची योग्यता तेथें ठरत असते. रशियन रंगभूमी, करमणूक म्हणजे जीवनांतील वास्तवतेची विस्मृती, हें समीकरण नजरेपुढें ठेवीत नाहीं. वैयक्तिक जीवनांतील प्रश्नांचें सामाजिक स्वारस्य सिद्ध करण्याची प्रयोगशाळा, या दृष्टीनें नाटककार, प्रयोजक व नट रंगभूमीचा वापर करीत असतात. समाजशास्त्र, संस्कृती व शिक्षण यांच्या विकासाला पोषक होईल अशा रीतीनें रंगभूमीचा उपयोग करणें हें त्यांचें धोरण असतें.

भांडवशलाही देशांत नाटकांचा विशेष आणि स्वतंत्र असा आश्रयदाता प्रेक्षकवर्ग असतो. रशियांत तसा प्रेक्षकवर्ग अस्तित्वांत नाहीं. तेथें समग्र जनताच नाटकाचा प्रेक्षकवर्ग आहे. फुरसतीचा वेळ कसातरी घालविण्यासाठीं रशियन प्रेक्षक नाटकगृहांत जात नाहीं. तो नाटकाचा प्रयोग पहावयास येतो. यामुळें रशियन नाटकगृहांतील प्रेक्षकसमूहाला कपडे आणि दागिने यांच्या प्रदर्शनाचें स्वरूप प्राप्त होत नाहीं. इतर देशांतील प्रेक्षक तिऱ्हाइताच्या दृष्टीनें, नाटकाचा प्रयोग पहावयास बसतात. त्यांची अपेक्षा करमणुकीची असते. नटनटींनीं ती पुरी करावी आणि आपण आरामांत तिचा उपभोग घ्यावा, अशी त्यांची कल्पना असते. याच्या उलट रशियन प्रेक्षक तादात्म्यानें प्रयोग पहातो. प्रयोगाच्या यशस्वितेसाठीं समरसतेनें सहकार्य करतो. प्रयोगकार, नटवर्ग आणि प्रेक्षक यांमध्यें यामुळें एका प्रकारची एकात्मता निर्माण होते.

स्वाभाविकच प्रेक्षकवर्गाची अभिरुचि आणि मागणी पाहून तिच्या अनुरोधानें किफायतशीर ठरेल अशा करमणुकीचा प्रेक्षकांना पुरवठा करणारा धंदेवाईक नाट्यव्यवसाइकांचा वर्ग रशियांत अस्तित्वांत नाहीं. रशियांत रंगभूमी ही राष्ट्रीय संस्था आहे. ती जनतेच्या मालकीची आहे. सरकारच्या शिक्षण आणि कला या खात्यांच्या द्वारा तिचें नियंत्रण आणि मार्गदर्शन होत असतें.

रशियांतील नटवर्ग आणि इतर देशांतील नटवर्ग यांमध्येहि या महत्त्वाच्या फरकांमुळे मूलगामी अंतर उत्पन्न झालें आहे. इतर देशांत नट व नाट्यव्यवसाय यांबद्दल जनतेंत कुतूहल असतें. त्यांच्याकडे सवलतीच्या नजरेने पाहाण्यांत येतें. पण सामाजिक जीवनांतील एक महत्त्वाचा व्यवसाय व समाजांतील एक जबाबदार घटक, या दृष्टीनें त्यांची जनतेकडून दखल घेतली जात नाहीं. त्यांना सामाजिक प्रतिष्ठा नसते. परोपजीवी आणि अविधायक व्यवसाय व वर्ग या दृष्टींनी त्यांच्याकडे पाहण्यांत येतें. याच्या उलट रशियांत नट व नाट्यव्यवसाय इतर कोणताहि प्रतिष्ठित व्यवसाय व व्यावसायिक यांप्रमाणेंच समाजाला उपयुक्त व आवश्यक आहेत असें समजण्यांत येतें. शिक्षक व नट या दोहोंच्या सामाजिक प्रतिष्ठेंत रशियांत कांहीं फरक असूं शकत नाहीं. नाट्यव्यवसाय व कला तेथें विशिष्ट वर्गाच्या अभिरुचीवर व आश्रयावर अवलंबून राहात नाहींत. सामाजिक हितमूल्यांच्या अपेक्षेनें तेथें नाट्यव्यवसाय चालतो. अर्थातच तें एक सामाजिक कार्य ठरतें: तें करणाऱ्याला समाजसेवकाची प्रतिष्ठा प्राप्त होते.

रंगभूमीचा उपयोग आणि तिचें कार्य याबद्दलच्या सरकारी धोरणाचा, रशियांतील नट व नाट्यव्यवसायी यांच्या कामावर परिणाम झाला आहे ; इतकेंच नव्हे तर नाटककारांच्या नाट्यलेखनावरही त्याचा फार मोठा परिणाम झाला आहे. लेखन ललित आहे,हें रशियन रंगभूमीवर नाट्यवाङ्मयाच्या चांगुलपणाचें व उपयुक्ततेचें एकमेव गमक नाहीं. तें मार्क्सियन तत्त्वज्ञानाशीं विसंगत नाहीं, क्रांतिविरोधी नाहीं, सरकारी धोरण व कार्यक्रम यांना विघातक नाहीं, इत्यादि कसोट्यांनाहि तें उतरावें लागतें. यांतील कांहीं कसोट्या लेखनाची सहजता, लेखकाची सर्जनशक्ति व विचारस्वातंत्र्य, यांना संकुचित करणाऱ्या आहेत. यामुळें आधुनिक रशियन नाट्यवाङ्मय बरेंचसें ठरीव ठशाचें, प्रचारकी व यांत्रिक वाटतें. रशियन सरकारला जसजसें अधिकाधिक स्थैर्य व स्वास्थ्य प्राप्त होत गेलें, तसतसे निर्मितीवरील निर्बन्ध आणि सर्जनस्वातंत्र्यावरील नियंत्रणें

हळूहळू शिथिल करण्यांत येऊं लागलीं. यामुळें नाट्यवाङ्मयांतील संकुचितपणा व ठरीवपणा थोडथोडा कमीकमी होऊं लागला. विविधता वाढीला लागली. पण अजूनहि, रशियन रंगभूमींचीं इतर अंगें विकास पावलीं आहेत त्या मानानें, तिचें हे महत्त्वाचें अंग विकास पावलेलें नाहीं.

रशियन रंगभूमीची आजची स्थिति म्हणजे १९१७ च्या आक्टोबर क्रांतीनंतरचें तिचें अवस्थांतर होय. त्या पूर्वींचें तिचें स्वरूप जगांतील इतर देशांमधील रंगभूमींपेक्षां फारसें वेगळें नव्हतें. पण आज तिच्या मूल हेतूंत, आणि अनुषंगानें तिच्या वेगवेगळ्या अंगांच्या संबंधांतही, आमूलाग्र फरक पडला आहे. स्वाभाविकच जगांतील इतर रंगभूमींत आणि तिच्यांत जमीन अस्मानाची तफावत पडली आहे. या फरकाची कल्पना तपशीलाच्या सांगोपांग आणि विस्तृत माहितीशिवाय करतां येणें कठीण आहे. पण स्थलसंकोचामुळें तिचा संक्षेप करण्याशिवाय गत्यंतर नाहीं.

आजच्या रशियन रंगभूमींत तिच्या क्रांतिपूर्व स्वरूपांतील कित्येक तांत्रिक अवशेष आढळून येत असले तरी एकंदरींत तिचें स्वरूप आक्टोबर क्रांतीच्या ध्येयांनींच निर्णित झालेलें आहे. जनता आणि सरकार यांच्या विशेष प्रकारच्या गरजांनीं तें आकाराला आलें आहे.

आक्टोबर क्रांतीचें स्वरूप फ्रेंच राज्यक्रांतीप्रमाणें केवळ राजकीय नव्हतें. आर्थिक आणि सामाजिकही होतें. एक राज्यपद्धती घालवून तिच्या ठिकाणीं दुसरी आणणें एवढेंच तिचें साध्य नव्हतें. झारशाहीसारखी जुलमी व एकतंत्री राज्यपद्धती नष्ट करून तिच्याजागीं समाजसत्तेची स्थापना करणें हें नवनिर्मितीचें कार्य तिला साध्य करावयाचें होतें. त्यासाठीं सामाजिक लोकशासनसंस्थांची जागा श्रमजीविकांच्या अधिकारशाहीनें भरून काढणें हा तिचा विधायक कार्यक्रम होता.

या कामाच्या सिद्धीसाठीं रंगभूमी हें प्रभावी प्रचारमाध्यम आहे हें रशियन सरकारनें ओळखलें. आणि तिला आपल्या ताब्यांत घेतलें. तिच्यावरील खाजगी

मालकी नाहींशी करून टाकली, तिचें राष्ट्रीयीकरण केलें. शिक्षण व संस्कृती यांच्या प्रसार खात्याशीं तिचा संबंध जोडून दिला. लष्करी, राजकीय, आर्थिक सांस्कृतिक, शैक्षणिक व कलात्मक संघटनेचें कार्य तिच्या द्वारा करून घेतां येईल अशा रितीनें तिला नवें वळण लावलें. तिला नवीं मूल्यें दिलीं.

रशियन रंगभूमीला नवीन स्वरूप देऊन तिची उन्नती करण्याच्या कामीं ज्यांचे परिश्रम व मार्गदर्शन हीं प्रामुख्यानें उपयुक्त व प्रभावी ठरलीं, त्यांमध्यें ए. व्ही. लूनाचार्स्की, व्ही. मॉयरहोल्ड, सी. एस. स्टॅनिस्लावस्की, ए. टायराव्ह, ए. ग्रनॉव्हस्की हें मुख्य होते. यांपैकीं लूनाचार्स्की खेरीज इतर सर्व रंगभूमीशीं प्रत्यक्ष संबंध असलेले असे होते. लूनाचार्स्की हा राजकारणीमुत्सद्दी, लेनिनचा मित्र, लेखक, नाटककार आणि शिक्षणखात्याचा मंत्री होता. रंगभूमीच्या पुनर्घटनेंत याची विद्वत्ता, रसिकता व तत्त्वनिष्ठा यांच्या समन्वयानें निर्माण झालेल्या समतोलपणानें फार महत्त्वाचें आणि उपयुक्त कार्य केलें आहे.

मेयर होल्ड हा स्टॅनिस्लावस्कीचा शिष्य. तो स्वतंत्र वृत्तीचा आणि प्रयोग प्रिय होता. बोल्शेविक विचारसरणीचा रंगभूमीच्याद्वारें आविष्कार आणि प्रचार करण्याचें धोरण अगदीं आरंभापासून त्यानें मोठ्या उत्साहानें स्वीकारलें होतें. लोकनाट्याच्या कल्पनेचा तो पहिला खंबीर पुरस्कर्ता होय. त्याचें आक्टोबर थिएटर रशियांतील नवरंगभूमीवरील फार महत्त्वाचा प्रयोग आहे. नाट्य-प्रयोग, अभिनय, व नाट्यलेखन यांबद्दलच्या त्याच्या उपपत्ती व त्या संबंधांत त्यानें केलेले प्रयोग व कार्य यांची थोडक्यांत कल्पना देतां येण्या-सारखी नाहीं. सौंदर्यात्मक संयोगांऐवजीं रचनात्मक संयोगांचा व वास्तव-वादी अविष्काराऐवजीं संकेतात्मक सरणींचा अवलंब करण्याचा मार्ग तो स्वीकारीत असे. नाटककार व नट यांच्यापेक्षां दिग्दर्शकाच्या प्रयोगविषयक दृष्टीलाच तो अधिक महत्त्व देई. त्याच्या या व्यक्तिनिष्ठ आणि वास्तवता पराङ्मुख दृष्टिकोणामुळें लोकमताचा प्रवाह पुढें पुढें त्याच्या कार्याच्या विरोधी

दिशेनें वाहूं लागला. आज रशियन रंगभूमीवर त्याच्या उपपत्तींचें आणि पद्धतींचें महत्त्व कमी झालें असलें तरी त्याच्याकडून घडलेलें कार्य विसरलें जाण्यासारखें नाहीं.

स्टॅनिस्लावस्की हा आक्टोबर क्रांतीच्या पूर्वकालीन रशियन रंगभूमीवर सर्व श्रेष्ठ दिग्दर्शक व नट समजला जात असे. क्रांतीनंतर तो नवरंगभूमीशीं समरस झाला. पण कांहीं एका मर्यादेपलीकडे आपली आविष्कारपद्धती त्यानें बदलली नाहीं. तो वास्तववादी होता. यामुळें मेयरहोल्डच्या पद्धतीच्या पुरस्कर्त्यांकडून कित्येकवेळां त्याचा निषेध होई. पण त्याच्या केवळ अलौकिक व्यक्तिमत्त्वामुळेंच तो आपल्या परंपरेला चिकटून राहूं शकला. अभिनय शिक्षणाची त्याची पद्धती अजूनहि रशियांत सर्वमान्य आहे. रशियन नाट्यकला प्रक्षोभ व प्रचार या दोन अवस्थांतून पार पडून आतां प्रसादाच्या परिणत अवस्थेला येऊन पोहोंचत असतां स्टॅनिस्लावस्कीची नाट्यविषयक उपपत्ती व त्याची आविष्कार पद्धती यांच्याकडेच लोकमताच्या मान्यतेचा ओघ पुन्हां वळत असलेला दिसत आहे. स्टॅनिस्लावस्की १९३८ सालीं मरण पावला.

टॉयराव्ह हा नाट्यविषयक उपपत्तींत व आविष्कार पद्धतींत मेयरहोल्ड व स्टॅनिस्लावस्की या दोहोंच्या मध्यें आहे. तो स्वत:ला नववास्तववादी म्हणवितो. रंगमूल्यांना तो सर्वांत अधिक महत्त्व देतो. अभिनय व नेपथ्य या दोन्हीं अंगांत संकेत आणि 'सरणी' निर्माण करून नट व पार्श्वभूमि यांची प्रकटनक्षमता वाढविण्याचा त्याचा प्रयत्न असतो.

ग्रनॉवस्की हा ज्यू आहे. आक्टोबर क्रांतिनंतर ज्यू लोकांना रशियामध्यें स्वातंत्र्य आणि समान दर्जा प्राप्त झाला. ज्यू रंगभूमीची निर्मिती आणि प्रगती करण्यास ग्रनॉवस्की याची सर्जनशक्ती, बुद्धी व प्रयत्न, हीं फार मोठ्या प्रमाणांत कारणीभूत झाली आहेत.

या प्रमुख दिग्दर्शकांव्यतिरिक्त वाखटून गॉव्ह याची कामगिरीही विशेष उल्लेखनीय आहे. स्टॅनिस्लावस्कीचा हा प्रतिभासंपन्न शिष्य, दुर्दैवानें

३८ वर्षांच्या अल्पवयांतच १९२२ सालीं मरण पावला. परंतु त्याचें नाटकगृह व परंपरा हीं अद्यापिही प्रगतीच्या मार्गावर आहेत. औपपत्तिक दृष्ट्या तो स्टॅनिस्लावस्कीचा अनुयायी होता. पण पार्थिव वास्तवतेपेक्षां मानसिक प्रक्रियांच्या प्रकटनांतील वास्तवतेवर त्याचा अधिक भर असे; व त्यांचें प्रकटन परिणामकारक अभिनयाच्या द्वारा व्हावें म्हणून अभिनय कांहींसा अतिरंजित करण्याकडेही त्याची प्रवृत्ति असे.

या दिग्दर्शकांच्या प्रयोगविषयक उपपत्तींतील भेद, भूमिका प्रकटनाच्या तंत्राबाबत ते नटांना जो उपदेश करीत त्यावरून स्पष्ट होतो :

स्टॅनिस्लावस्की हा नटाला आपलें व्यक्तित्व व प्रेक्षकांचें अस्तित्व विसरून आणि भूमिकेच्या अंतरंगाशीं पूर्णपणें समरस होऊन तिचें प्रकटन करण्यास सांगतो.

नटानें प्रेक्षकांचें अस्तित्व कधींहि विसरतां कामा नये, प्रेक्षकांच्यावर परिणाम करणें हें नटाच्या भूमिकाप्रकटनाचें साध्य आहे; आपल्या शारिरिक हालचाली आवाज आणि कृति यांचा नटानें जास्तींत जास्त परिणामकारक वापर करून तें साध्य केलें पाहिजे; असें मेयरहोल्ड सांगतो :

रंगभूमीवर असतांना आपण नट आहोंत याची नटानें नेहमीं जाणीव ठेवली पाहिजे; भूमिकेंत आपले व्यक्तित्व त्यानें विलीन करतां कामा नये; रंगमूल्यांचा परिणामकारक वापर करून त्यानें भूमिका प्रकटन केलें पाहिजे; असें टायरॉव्हचें म्हणणें आहे :

नटाची आपल्या भूमिकेकडे पाहाण्याची वृत्ति टीकाकारांची असली पाहिजे. भूमिकेच्या कृती आणि त्यांमागील वैचारिक पार्श्वभूमी या दोहोंचेंही निदर्शन नटानें केलें पाहिजे असें वाख्तन्गॉव्हचें मत आहे. रंगभूमीवरील संवाद प्रेक्षकांच्या समजुतीसाठीं आहेत. असें तो प्रतिपादितो. या बाबतींत मेयरहोल्ड व तो यांमध्यें ऐकमत्य आहे. असो.

आक्टोबर क्रांतीपूर्वी, १९१३ सालीं सबंध रशियन साम्राज्यांत १५३ नाटकगृहें होतीं. १९४१ सालीं ती संख्या ८२३ वर गेली. आर्मेनियन, ताझिक, किरगीज यासारख्या अल्पसंख्याकांच्या प्रदेशांत आक्टोबर क्रांतीपूर्वी नाटकगृहांचा पूर्णपणें अभाव होता. १९३८ पर्यंत त्यांमध्यें अनुक्रमें २४, २१, ९ आणि १५ नाटकगृहें निर्माण झालीं. युक्रेनियामध्यें पूर्वी ३५ नाटकगृहें होतीं. १९३८ मध्यें ती संख्या १०० वर गेली. या नाटकगृहांतून मास्कोमध्यें यशस्वी ठरलेल्या नाटकांचेंच तेवढे प्रयोग होतात असें नाहीं. तर नवीन आणि मोठ्या शहरांतून न झालेल्या इतरही नाटकांचे प्रयोग स्थानिक प्रेरणेनें त्यामध्यें केले जातात.

मुलांसाठीं नाटकगृहें आणि नाट्यप्रयोग हा रशियन रंगभूमीचा अभिनव विशेष आहे. अशा प्रकारचें पहिलें नाटकगृह ७ नोव्हेंबर १९१८ सालीं उघडण्यांत आलें. १९३८ पर्यंत अशीं १३१ नाटकगृहें आस्तित्वांत आलीं होतीं. हीं नाटकगृहें मुलांसाठीं असतात पण तीं मुलांकडून चालविलीं जात नाहींत. या कामासाठीं खास शिक्षण मिळालेले नट व तंत्र विशारद नेमलेले असतात. त्याप्रमाणें नाटकाचे प्रयोग पहात असतांना बालप्रेक्षकांच्या प्रतिक्रिया काय होतात, हें पहाण्यासाठीं, त्यांचा अभ्यास करण्यासाठीं, मानसशास्त्र व शिक्षणशास्त्र यांतील तज्ज्ञांची योजना केलेली असते. वेगवेगळ्या वयाच्या आणि बुद्धीच्या मुलांचे स्वतंत्र गट करून त्यांना उपयुक्त होतील व मनोरंजक वाटतील अशा नाटकांचे प्रयोग त्यांना दाखविले जातात: त्यांवर प्रश्नपत्रिका तयार करून त्यांचा या बालप्रेक्षकांत प्रसार करण्यांत येतो. पद्धतशीर वादविवाद व चर्चा घडविण्यांत येतात. आणि अशा रीतीनें मुलांचें ज्ञान व अभिरुची हीं वाढविण्याचें व त्यांचें मोजमाप करण्याचें काम या प्रयोगांच्या द्वारा साधलें जातें.

रशियन नटनटींच्या अभिनयाचा दर्जा फार उच्च असतो. रशियांत येणाऱ्या परकीय नाट्यप्रेमी लोकांनीं अनेकवार अशी ग्वाही दिली आहे.

१९३४ सालीं स्टेट ज्युविश थिएटरनें शेक्सपीअरच्या किंग लिअर नाटकाचे प्रयोग केले. आतां सुप्रसिद्ध असलेला एस्. मिखोएल यानें त्यांत लिअरची भूमिका केला होतो. गॉर्डन क्रेग यानें हा प्रयोग पाहिला तेव्हां आपण पाहिलेल्या कोणत्याही लिअर पेक्षां ही भूमिका कितीतरी पटीनें अधिक यथार्थ व परिणामकारक प्रकट केली जात आहे, असे उद्गार त्यानें काढले होते. प्रयोगांतील केवळ प्रमुख पात्रांचींच कामें काळजीपूर्वक आणि व्यवस्थित होतात असें नव्हे तर बारीक सारिक भूमिकाही अत्यंत कसोशीनें वजावल्या जातात; हा रशियन नाट्यप्रयोगांचा विशेष आहे.

१९३८ सालीं सोव्हिएट युनिअनमध्यें नाट्यशिक्षण देणाऱ्या ४४ शाळा आणि दोन इन्स्टीटयूटस होत्या. एक मास्कोमध्यें व दुसरी कीव्ह-मध्यें. या शाळांत चार हजार विद्यार्थी शिक्षण घेत होते. कीव्ह आणि मास्को येथील मुख्य संस्था शिक्षण मंत्र्यांच्या नियंत्रणाखालीं आहेत. शाळांवर त्यांची देखरेख असते. पण प्रत्यक्ष हुकमत नसते. मार्ग दर्शना-साठीं शाळांच्या चालकांना शिक्षण खात्याकडून किमान अभ्यासक्रम नेमून देण्यांत येतो. शिक्षणाची पद्धति व तंत्र या संबंधांत चालकांना स्वातंत्र्य असतें. शिक्षणक्रमांत शासनशास्त्र, अर्थशास्त्र, युरोपियन रंगभूमीचा इतिहास, रशियन भाषा व वाङ्मय, मानसशास्त्र, कलेचा इतिहास ज्या नाटकगृहाशीं त्या शाळेचा संबंध असेल त्याच्या विशिष्ट पद्धतीचा इतिहास, संगीत, उच्चार शास्त्र, प्रयोग विज्ञान, नेपथ्य, नृत्य, अभिनय स्वरशुद्धी इत्यादि विषयांच्या अभ्यासाचा समावेश होतो. सामान्यतः हा अभ्यासक्रम तीन वर्षांचा असतो. पहिल्या वर्षी बहुतेक विद्यार्थी आपले अन्य व्यवसाय सांभाळून या शाळांत येत असतात. दुसऱ्या वर्षी त्यांना आपला सर्व वेळ शिक्षणासाठीं खर्च करावा लागतो. त्यासाठीं त्यांना शिष्यवृत्ती देण्यांत येतात. या शिष्यवृत्ति फार मोठ्या असतात असें नाहीं. पण त्यांमध्यें त्यांचें भागूं शकतें. विद्यार्थ्यांसाठीं वसतीगृहें असतात. नाट्यगृहांना जोडून असलेल्या उपाहार गृहांतून

त्यांची जेवण्याची सोय होते. नट होऊं इच्छिणाऱ्या बुद्धिमान आणि प्रतिभासंपन्न विद्यार्थ्याला पैशाच्या अभावीं शिक्षण घेतां येत नाहीं अशी परिस्थिति रशियांत उद्भवूं शकत नाहीं.

कीव्ह व मॉस्को येथील नाट्य शिक्षण संस्थांचें स्वरूप या शाळांपेक्षां वेगळें आहे. त्यांचा मुख्य उद्देश देशांतील दूर दूरच्या भागांत असलेल्या नाटकगृहांना उपयोगी पडतील असे तंत्र तज्ज्ञ व नट तयार करणें हा आहे. या संस्थांत दाखल होण्यासाठीं एक प्रवेश परीक्षा असते. तीमध्यें यशस्वी होणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांत प्रवेश मिळतो. उमेदवाराचें वय १७ ते २५ च्या दरम्यान असतें. आणि त्यांतील बहुतेक सांधिक शेतीच्या प्रदेश विभागांतून आलेले असतात. सोव्हिएट युनिअन मधील वेगवेगळया अल्प-संख्याक जमातींतूनहि अनेक विद्यार्थी या संस्थांत दाखल होत असतात.

आक्टोबर क्रांतीच्या पूर्वकालांत रशियांत टॉलस्टॉय, चेकॉव्ह, गागॉल, ऑस्ट्रॉव्हस्की यांसारखे प्रथितयश नाटककार होऊन गेले. क्रांती नंतरच्या कालांत त्यांच्या तोडीचे नवे नाटककार निर्माण झालेले नाहींत. गॉर्की हा या दोन्ही कालांना साधारण असलेला लेखक याला अपवाद म्हणून समजतां येईल. पण एकंदरींत या कालांतील रशियन नाट्यलेखनाचा वाङ्मयीन दर्जा फारसा उच्च राहिलेला नाहीं. अपवाद म्हणून कांहीं थोडीं उत्तम नाटकें लिहिलीं गेलीं आहेत. पण बहुशः चांगल्या नाटकासाठीं प्रयोजकांवर परकीय भाषांतून उसनवारी करण्याचे प्रसंगच जास्त प्रमाणांत आलेले आढळून येतील. यूजीन् ओनेल, बर्नार्ड शॉ, प्रीस्टले इत्यादि अमेरिकन व इंग्लिश नाटककारांचीं नाटकें रशियांत लोकप्रिय आहेत. १९४१ सालीं जर्मनीनें रशियावर आक्रमण केलें तेव्हां मॉस्कोमध्यें शेक्सपिअर, शेरिडन, मोलिअर, बेनव्हेंटे आणि फ्लावेर यांचीं नाटकें रंग-भूमीवर प्रयोग रूपानें होत होतीं. यावरून रशियन संस्कृति किती सामवायिक, उदार आणि सर्वंकश आहे याची कांहीशी कल्पना करतां येते;

पण त्या बरोबरच त्यावरून रशियांत स्वदेशीय व लोकप्रिय नाटकांचा अभाव आहे असेंहि अनुमान निघाल्यावांचून रहात नाहीं.

रशियन नाट्यवाङ्मयाच्या निर्मितीला उत्तेजन देण्यासाठीं, समाज-सत्तावादी वास्तवतेचा रशियन रंगभूमीवर पुरस्कार करण्यासाठीं, १९३४ सालीं सरकारतर्फे नाट्यलेखनाची एक चढाओढ ठेवण्यांत आली होती. या चढाओढीचा निकाल, परीक्षणार्थ आलेल्या सुमारें बाराशें नाटकांत पहिल्या बक्षिसाला पात्र ठरेल असें एकही नाटक नाहीं, असा लागला. या परीक्षा-समितींत राजकीय पुढाऱ्यांच्या बरोबरच अलेक्सी टॉलस्टॉय यासारखा ग्रंथकार आणि मेयरहोल्ड, स्टॅनिस्लास्की, सीमानॉव्ह यासारखे प्रयोग दिग्दर्शक यांचा समावेश करण्यांत आला होता.

"वैचारिक आणि कलात्मक अभिनयाच्या दृष्टीनें आपल्या या महान युगाची प्रतिनिधी म्हणून शोभून दिसतील अशीं अव्वल दर्जाचीं नाटकें अद्याप आपणापाशीं नाहींत," असें आपलें मत या समितीनें प्रदर्शित केलें होतें. आणि नाटककारांनीं जीवनाचा अधिक बारकाइनें व साक्षेपानें अभ्यास करण्याची, समाजसत्तावादाच्या विधायक कार्यक्रमांत अधिक प्रमाणांत प्रत्यक्ष भाग घेण्याची आणि मार्क्स, एंगेल्स, लेनीन, स्टॅलीनप्रणित विजयी तत्त्वज्ञानावर प्रभुत्व संपादन करण्याची शिफारस समितीनें नाटककारांना केली होती.

या उपदेशाचा फारसा उपयोग झालेला दिसत नाहीं. जीं कांहींशीं बऱ्या स्वरूपाचीं नाटकें उपलब्ध होत आहेत त्यांतही शास्त्रीय, समाजवादी व समतानिष्ठ दृष्टीपेक्षां वैयक्तिक मनोव्यापारांचें व वैयक्तिक जीवनक्रमांचें निदर्शन व निवेदनच अधिक प्रमाणांत केलेलें दिसून येतें. हीं मूल्यें नवीन नसून सनातन आहेत. यामुळें रशियांत नवी रंगभूमि निर्माण झाली असली तरी तिचा नवा नाटककार अजून जन्माला आलेला नाहीं असें म्हणणें प्राप्त आहे.

चेकॉव्ह, गॉर्की यांची परंपरा पुढें चालवूं शकतील अशी आशा उत्पन्न करणारे ॲफीनोझिनॉव्ह व कातेव्ह हे दोन नाटककार दिसत होते. परंतु ॲफिनोझिनॉव्ह हा गेल्या युद्धांत हवाई हल्ल्यांत मारला गेला. कातेव्ह हाही युध्दांत बळी पडला. 'ऑन दी ईव्ह' या नांवाचें नाटक ॲफिनोझिनॉव्ह यानें आपल्या मरणापूर्वी नुकतेंच पुरें केलें होतें. युद्धाचा एका खेड्यावर झालेला परिणाम आणि 'स्कॉर्न्ड अर्थ' या धोरणाचा अर्थ, हा त्याचा विषय आहे. गोलान्स कंपनीनें प्रकाशित केलल्या 'सिक्स बेस्ट रशियन प्लेज' या संग्रहांत ॲफिनोझिनॉव्ह याचें 'दी फिअर' आणि कातेव्हचें 'स्क्वेअरिंग दी सर्कल' हीं दोन उत्कृष्ट नाटकें इंग्रजी भाषांतरांत उपलब्ध आहेत. यापैकीं कातेव्हकृत 'स्क्वेअरिंग दी सर्कल'चें श्री. माधव मनोहर यांनीं मराठींत "सशाचीं शिंगें" नांवानें रूपांतर केलें असून इन्डियन नॅशनल थिएटरच्या मराठी शाखेनें मुंबई येथें त्याचे कांहीं प्रयोगही करून दाखविले होते.

# रवीन्द्रनाथ टागोर व सोव्हिएट यूनियन

लेखक **एस् कोगन** अनुवादक **पु. का. ओक**

रशियामध्यें " संस्कृतीची राखरांगोळी " करण्यांत आली आहे, असा प्रचार आमच्या शत्रूंकडून नेहमीं केला जातो. परंतु, प्रत्यक्ष पहावें तर असें दिसतें कीं मानवाच्या संस्कृतीची व तिच्या जगविख्यात उपासकांची कदर सोव्हिएट यूनियनमधील स्वतंत्र राष्ट्रांमध्यें जितकी होते तेवढी दुसरीकडे होत नाहीं. रवींद्रनाथ टागोरांनीं सन १९३० मध्यें रशियाला भेट दिली व सोव्हिएट नागरिकांच्या मनांत या महाकवीबद्दल किती उत्कट प्रेमादर वसत आहे याचा स्वतःच अनुभव घेतला. टागोर जेथें जातील तेथें त्यांचा जयजयकार व प्रेमानें स्वागत झालें. त्यांचें व्याख्यान असलें कीं सभागृहें फुलून जात. त्यांच्या चित्रांचें प्रदर्शन पाहण्यासाठीं मास्कोमध्यें लाखोंनी गर्दी जमली. 'यूनियन हाऊस' या प्रचंड सभा-गृहांत टागोरांनीं स्वतःच्या काव्याचें वाचन केलें. अर्थात बंगाली भाषा श्रोत्यांना अवगत नव्हती, परन्तु त्या भाषेच्या संगीताशीं तन्मय होऊन सगळेजण त्या काव्यगायनानें प्रभावित झाले होते. एका महान प्रति-भावान पुरुषाच्या आत्म्याचें सांनिध्य लाभल्याचा आनंद श्रोत्यांच्या चेहऱ्यावर दिसत होता.

राजकीय कोलाहलापासून अलिप्त राहून आपल्याच गूढगुंजनांत रमलेला टागोर हा महाकवि; आणि आमचें जीवन तर राजकीय वादळांनीं व सामाजिक पुनर्घटनेच्या धडपडींनीं व्यापलेलें! साहजिकच, टागोरांच्यांत व आमच्यांत कोणचा स्नेहसंबंध असूं शकणार? ते आम्हाला परकेच वाटणार! असा समज होणें शक्य आहे. पण ही कल्पनाच चूक आहे. अनंतासंबंधीं चिंतन करणाऱ्या कवीचें व जीवनांतील निकडीचे प्रश्न सोडविणाऱ्या क्रांतिकारकाचें नातें वैराचें नसतें. या दोघांच्या जीवनांचे ओघ परस्परविरुद्ध

तर नसतातच ; उलट, शेवटीं कोठेंतरी त्यांचा मधुर संगमच होतो. आजवर जेवढे धर्मपंथ झाले त्यांनीं अंतिम श्रेय म्हणून जें सांगितलें व मानवतेला मार्गदर्शन करणाऱ्या महानुभावांनीं जें घोषित केलें तें ध्येय कोणचें ? तर विश्वकुटुंबाचें व मानवाला कधींकाळीं लाभणाऱ्या सुवर्णयुगाचें ! आम्हा क्रांतिकारकांच्या मनःचक्षूपुढेंही तोच आदर्श आहे. तो आदर्शभूत "मानवी स्वर्ग" प्रत्यक्ष जीवनांत अवतरला पाहिजे, ह्याच ध्येयानें प्रेरित होऊन कम्यूनिस्ट क्रांतीची ध्वजा उभारली गेली आहे. ह्या क्रांतीमध्यें महात्म्यांचा अनादर किंवा नाश कसा होईल ? महान आदर्शांना प्रत्यक्ष व्यवहारांत आणण्याचें कार्य आपलें आहे व या विचारधनाचा खराखुरा वारसा आपल्याकडेच आहे, अशी कामगार वर्गाची भावना आहे. म्हणूनच टागोरांच्या काव्याचा पडसाद आमच्या हृदयांत उमटतो व तीं मुक्तीचीं सुंदर कवनें आहेत असा आम्हाला अनुभव येतो.

टागोरांनीं ईश्वराला साद घातली आहे. "देवा ! तुझ्या कृपेनें मी अनंत झालों आहे." या शब्दांनीं गीतांजलीचा ओघ सुरू होतो. उलटपक्षीं, आमचीं मनें आज अतर्क्याकडे ओढलीं जात नाहींत. ऐहिकांतच आम्हीं आमचें जीवन रचीत आहोंत. विवेकपूर्ण अशा श्रमव्यवस्थेनें जें हवें तें निर्माण करण्यांत आम्हीं गुंतलों आहोंत. परंतु, टागोरांचें काव्य वाचलें कीं आम्हाला त्यांत अशी साक्ष पटते कीं या काव्यांत एका महान हिंदू कवीनें आपल्या आत्म्याचा संपूर्ण अविष्कार केला आहे, स्वार्थाच्या घाणीनें लडबडलेल्या मनुष्यप्राण्यानें आपलीं सारी लक्तरें फेकून दिलीं आहेत, आणि एका परम ध्येयाची आस लागून त्यामध्येंच कवीचा आत्मा रंगून गेला आहे. या उज्वल आशेचें व आनंदाचें वर्णन टागोरांच्या इतक्या काव्यात्म तऱ्हेनें कोण करूं शकेल ? आमच्या समाजांतील प्रत्येक लढवय्याच्या हृदयांत नवनिर्मितीची जी आकांक्षा व आनंद ओसंडत आहे, त्याचेंच ध्येयात्म स्वरूप टागोरांच्या काव्यांत त्याला अनुभवास येतें, व म्हणूनच त्यांच्या

सौंदर्याशीं तो समरस होऊं शकतो. ऐहिकाच्या व ज्ञानाच्या पलीकडे टागोरांची ध्येयसृष्टि रंगते, आणि ऐहिकाचें अंगणच पुरेसें आहे असें आम्हाला वाटतें ; पण, या फरकामुळें त्यांच्या काव्यांमुळें आम्हाला होणाऱ्या आनंदांत कांहीं उणेपणा उरतो, असें नाहीं. ध्येयसृष्टीचें स्वरूप येथूनतेथून एकच असणार ; आणि टागोरांच्या काव्यानें, ( किंवा सोव्हिएट कवींच्या काव्यानेंही ), मानवाच्या आत्म्याला या ध्येयसृष्टीचें दर्शन घडतें व वेड लागतें; म्हणूनच टागोरांचें काव्य हें आमच्या हृदयांतून उठणाऱ्या भावनांचेंही संगीत आहे. किंबहुना लोभानें व क्रूर जीवनकलहानें ध्येयात्म जीवनाला गाडून टाकणाऱ्या जुन्या समाजरचनेंतील मानवामध्यें अशा भावनांचे सूरच उठत नाहींत म्हणून अशा कलेशी आम्हीच खरे समरस होऊं शकतों.

ईश्वराचा शोध काढतां काढतां टागोर जेथें जाऊन पोंचले, तेथेंच आम्हांलाही आमचा ईश्वर सांपडला आहे. रवींद्रनाथ आम्हांला जवळचे व प्रिय असण्याचें हें दुसरें कारण आहे. गीतांजलीचा दहावा व अकरावा श्लोक मी किती तरी वेळां वाचला आहे. किती उदात्त शब्दांत त्यांनीं देवाला म्हटलें आहे.

> रंकातले रंक, दीनांतले दीन व अनाथांतले अनाथ जेथें असतील तेथें, देवा, तूं असतोस–त्यांच्या दीन मलिन वेषांत तूं जेथें वावरत असतोस तेथें गर्वाचा मुकुट धारण करणाऱ्याचें पाऊल तरी कसें पडेल ?
>
> हे मंत्रघोष, पंचारत्या व जपमाळा कशाला ? मंदिराच्या कोंदट गाभाऱ्यांत तूं कोणाची पूजा करीत आहेस ? आणि सर्व दारें लावून घेतली आहेस ! डोळे जरा उघडून तर पाहशील ? तुझ्या सन्मुख तुझा देव नाहीं !
>
> नांगर धरून घामानें डबडबलेल्या शेतकऱ्याजवळ जा. देव तेथें आहे. पाथरवट दगड घडीत आहे. देव तेथें आहे. प्रखर

उन्हांत व मुसळधार पावसांत तो उभा आहे. त्याच्या अंगावर धुळीनें भरलेलें वस्त्र आहे.
फुलें व धूपदीप बाजूला ठेव व डोळे मिटून ध्यान करूं नकोस. तुझ्या वस्त्रांवरही धूळ पडेल. तीं फाटतील. पण त्याची काळजी कशाला ? त्याच्याजवळ जा. श्रम करीत निढळाचा घाम गाळीत त्याच्याजवळ उभा रहा. "

अशाच शेतकऱ्यांची व पाथरवटांची आम्हीं एक सेना बनविली आहे. लाखों स्त्रीपुरुष या सेनेमधील सैनिक बनले आहेत व मानवतेला मुक्त करणें हें या सेनेचें ब्रीद व ध्येय आहे.

महान कवींनीं व पंडितांनीं जीं स्वप्नें नुसतीं रेखाटलीं ती मूर्त स्वरूपांत आणण्याचें कार्य आमचा श्रमिक समाज करीत आहे व म्हणूनच त्या कवींना व पंडितांना आम्हीं आपलेच समजत आहों.

टागोरांचें इतक्या उत्कट भक्तीनें आम्ही स्वागत कां केलें, याचें कारणही हेंच.

मास्कोमध्यें " हाऊस ऑफ यूनियन " च्या कॉलम हॉलमध्यें टागोरांच्या काव्याचें त्यांच्या मुखांतून श्रवण करतांना मला जो आनंद मिळाला, त्यामुळें मला बंगाली भाषेच्या माझ्या अज्ञानाबद्दल फारच खंत वाटली. युरोपियन भाषांतून झालेलीं भाषांतरें केव्हांही मूळ काव्याचे क्षीण प्रसादच ठरणार ; तरी त्या भाषांतरावरूनही मला टागोरांच्या उच्च प्रतिभेबद्दल, उदात्त विचारांबद्दल व नितांत सहृदयतेबद्दल कल्पना आली. या *" सुवर्णग्रंथांत "

---

* सन १९३१ सालीं, टागोरांच्या सत्तराव्या वाढदिवसानिमित्त टागोर "सुवर्णग्रंथ" (Golden Book) हा ग्रंथ प्रकाशित झाला. त्यांत हिंदी व परस्थ विद्वानांचे अनेक लेख संग्रहित आहेत. त्यांतून हा लेख व पुढचें सोव्हिएट मुलांचें पत्र घेतलें आहे.

टागोरांच्या सर्व सुहृदांचे शुभसंदेश आहेत त्यांतच मी सहभागी होत आहे. आमच्या देशांत टागोरांना मोठा मान आहे. व त्यांच्या ग्रंथांचीं उत्तम भाषांतरं आमच्या भाषांतून झालेलीं आहेत. कालपरवांपर्यंत अज्ञानांत चांचपडणारी व जुलमाखालीं चेपलेली आमची जनता आतां स्वतंत्र जीवन उपभोगीत असून संस्कृतीच्या मूल्याशीं समरस होत आहे. आमच्या देशाची आर्थिक व संस्कृतिक पुनर्रचना करण्याच्या प्रचंड कार्यांत ती गुंतली आहे. आणि हें कार्य जितक्या लवकर पुरें होईल तेवढ्या जलदीनें आम्हांला मानवतेच्या गुरुस्थानीं असणाऱ्या महापुरुषांच्या विचार धनाचा लाभ घेतां येईल व ते महापुरुष आम्हांला वंद्य होत जातील. अशा महापुरुषांत टागोरांचें नांव नेहमींच उज्वल व प्रकाशमान असें तळपत राहील.

★

## ' व्ही. ओ. के. एस फर्स्ट पायोनियर कम्यून " च्या मुलांचें रवीन्द्रनाथ टागोरांना पत्र

प्रिय कविवर्य,

फर्स्ट पायोनियर कम्यूनच्या आम्हा मुलांना एका संध्याकाळीं तुमच्या सहवासाचा जो लाभ झाला तो आमच्या नेहमीं स्मरणांत राहील, तुमच्या सत्तराव्या वाढदिवसाच्या दिवशीं आम्हीं आपले प्रणाम पाठवीत आहोंत.

तुम्ही जें आपलें राष्ट्रीय गीत गाऊन दाखवलेंत त्याचा आम्हाला विसर पडणार नाहीं.

तुम्ही भेट दिल्यानंतरच्या काळांत आम्ही बरीच आघाडी मारली आहे. आमच्या देशानें समाजवादाकडे मोठ्या वेगानें पावलें टाकलीं आहेत.

आमच्या समाजाविषयीं वैरबुद्धि बाळगणारे लोक आमच्या पंचवार्षिक योजनेकडे पाहून कुचेष्टेनें हंसत व म्हणत "सगळा भ्रमाचा भोपळा

लवकरच फुटेल." पण येथें पहा! एकादी दुसरी फॅक्टरी रोज जन्माला येत आहे व आमची योजना पुरी होत चालली आहे.

आमच्या देशांत जो उत्साह आहे त्यामुळें आम्ही अघटित घडवून दाखवूं. ही सगळी पुनर्घटना फक्त मोठीं माणसेंच करीत आहेत असें नाहीं. आम्ही चाळीस लाख मुलेंही या रचनेंत भाग घेत आहोंत. भविष्यकाळांतच नव्हे तर आजच्या निर्मितीमध्येंही आमचा वांटा हवा, असं आमचें ब्रीद आहे. राष्ट्रीय श्रमव्यवस्थेमध्यें इतर गटांच्या खांद्याला खांदा लावून आमचें कम्यूनही निष्ठेनें कर्तव्यतत्पर आहे.

" हातोडा व कोयता " हेंच नांव असलेला एक लोखंडाचा कारखाना हें आमचें कार्यक्षेत्र आहे. गूजाँ नांवाचा फ्रेंच भांडवलदार क्रांतीपूर्वी या कारखान्याचा मालक होता. सध्यां येथें काम करणाऱ्या कामगारांमध्यें कांहींजण अजून जुन्या अज्ञानानें पछाडलेले आहेत. ते दारू पितात व बेहोष होऊन पडतात व कारखान्यांत गैरहजर राहतात. आम्ही त्यांना चांगल्या मार्गावर आणण्याचा प्रयत्न करीत आहोंत. आमच्याजवळ एक प्रभावी अस्त्र आहे, तें म्हणजे एका सामाजिक करारनाम्याचें. आम्ही व कामगारांनीं आपसांत असा जाहीर करारनामा केला आहे कीं आम्ही शाळेंत जाऊन अभ्यास करावयाचा व कामगारांनीं मुळींच न वेळ गमावितां काम करावयाचें. आळसाची संवय झालेल्या पुष्कळ कामगारांच्या सह्या आम्ही या करारनाम्यावर मिळविल्या आहेत व राष्ट्रीय पुनर्घटनेंत नेटाने भाग घेण्याचें त्यांनीं वचन दिलें आहे.

जुन्या काळांतली आणखी एक दुष्ट धोंड आमच्या मार्गांत आहे, ती म्हणजे निरक्षरतेची. अजून आमच्या देशांत लाखों माणसें निरक्षरतेनें ग्रासलेलीं आहेत व या राक्षसीविरुद्ध लढण्याचे कामांत भाग घेण्याचा आम्हाला आदेश मिळालेला आहे. आमच्या शाळेंतच आम्ही सध्यां पन्नास निरक्षरांना साक्षर करीत आहोंत. येथील वाचनालयांत, " रेड कॉर्नर "

नांवाचा विभाग आहे, त्यांत सांस्कृतिक माहिती गोळा करून मांडणें वगैरे कार्य आम्ही करीत आहोंत. जनतेमध्यें शास्त्रीय व यांत्रिक विषयाची आवड उत्पन्न करण्याची कामगिरीही आम्ही करतोंच. ह्या सर्व कार्यामुळें देशाच्या पुनर्घटनेच्या महान् कार्यासाठीं जरूर असणारें राजकीय शिक्षण आम्ही घेत आहोंत.

आमच्या स्वतंत्र समाजवादी देशाला तुम्ही पुन्हा भेट द्याल व आम्हाला भेटाल अशी आशा व्यक्त करून तुम्हाला दीर्घायुष्य व सुख लाभो अशी आपली इच्छा आम्ही प्रगट करतों.

फर्स्ट पायोनियर कम्यूनचा प्रणाम.

मॉस्को.

## सोव्हियट युनियनसंबंधीं टागोरांचे उद्गार

[ रवींद्रनाथ टागोरांनीं सन १९३०–३१ मध्यें सोव्हिएट यूनियनला भेट दिली. तेथील निरीक्षणाचा अहवाल देणारें एक पुस्तकही त्यांनीं प्रसिद्ध केलें आहे. तेथूनच मित्रांना पाठविलेल्या पत्रांतील कांहीं उतारे पुढें दिले आहेत. “ युवर टागोर फॉर टुडे ” या संग्रहांतून प्रस्तुत उतारे घेतले आहेत. —संपादक ]

### श्रमिकांचा भाग्योदय

“ मी रशियन भूमीवर पाऊल ठेवलें आहे. येथील सर्व दृश्य पाहून मी आश्चर्यमग्न झालों आहें. दुसऱ्या कोठल्याहि देशांत ह्या सारखें जीवन नाहीं. सारा फरक अगदीं मुळापासूनच आहे. अगदीं खालपासून वरपर्यंत सर्व मानवसमाजच येथे अभ्युदयाकडे चालला आहे. व त्यांत भेदभाव यत्किंचितही नाहीं.

कांहींजणांना हीनदीन जिणें कंठावें लागल्याचें इतिहासांत दिसतें. आणि जगासाठीं घाम गाळणाऱ्या अशा लोकांचाच बहुजनसमाज असतो. मानवी

जीवनाचा खरा अर्थ समजाऊन घेण्याइतकी उसंतच त्यांना मिळत नाहीं. प्रासादांच्या बाहेर टाकण्यांत आलेल्या उच्छिष्टांवर त्यांना उदरभरण करावें लागतें. कमीतकमी अन्न खावें, लज्जारक्षणापुरतें नेसावें व शिक्षणादिक संस्कारांना मुकावें असें त्यांचें दुर्दैव; परन्तु जास्तींतजास्त राबतात हेच आणि जगाचे हे पोशिंदे सगळ्या तऱ्हेचे अपमान सारखे सहन करीत असतात. दुष्काळ आले कीं यांचें मरण ओढवलेंच. वरिष्ठ वर्गाकडून लाथा व शिव्याशाप तर यांच्या कपाळी नेहमींच ठेवलेले, मग उन्नत जीवनाचा लाभ ह्यांना कोठून होणार ! मानवाची संस्कृति म्हणजे एक मेणबत्तीचा दिवा समजला तर तिचा प्रकाश वर सगळीकडे पसरत आहे. पण जळणाऱ्या मेणबत्तीवर मात्र घाणेरडें मेण पाघळत आहे, तसें दुर्दैव या श्रमिकांचें आहे.

या लोकांच्यापुढें भवितव्य काय ? हा प्रश्न मला एकसारखा डांचत असे. व माझ्या डोळ्यांपुढें कोणतेंही उत्तर दिसत नसे. मला वाटे कीं कांहीं लोकांना उच्च जीवनाच्या प्रकाशाचा उपभोग हवाच व तसें व्हावयाचें म्हणजे इतरांना तळाशीं अंधारांत रखडलेंच पाहिजे.......पण, हा विचार किती लाजिरवाणा आहे ? बहुजनसमाजावर अमानुष व दीनवाणें जीवन बळेंच लादल्याशिवाय मानवी संस्कृतीचा ध्वज उभारणेंच शक्य नाहीं, असा सिद्धांत मानावयाचा काय ?

ह्या समस्येला अगदीं मूलगामी उत्तर देण्याचा प्रयत्न रशियांत होत आहे. यशापयशासंबंधीं अखेरचा निर्णय इतक्यांत देणें शक्य नाहीं, पण माझ्या डोळ्यांनीं मी जें पहात आहें, तें आश्चर्यकारक आहे.

येथें आल्यापासून प्रत्येक दिवशीं मी येथल्या स्थितीशीं आपल्याकडील जीवनाची तुलना करतों, आणि मनांत येतें कीं इतकें येथें घडूं शकलें आणि इतकें हिंदुस्थानांतहि घडूं शकलें असतें. परिस्थितींतील हा विरोध मनाला चांगलाच जाणवतो. डॉ. हॅरी टिम्बर्स नांवाचे अमेरिकन डॉक्टर माझे येथल्या प्रवासांतले सोबती आहेत, व येथील वैद्यकीय प्रगतीचा ते अभ्यास करीत

आहेत. हिंदी जनतेची रोगग्रस्त, अन्नान्न, दीन व असहाय स्थिति कोणीकडे व येथील वैद्यकीय संस्थांचें उत्कृष्ट कार्य कोणीकडे? आणि अगदीं थोड्याच वर्षांपूर्वी येथील जनतेच्या नशिबीं‌ही हिंदी लोकांचे भोगच होते! त्यांनीं थोडक्या अवधींत केवढी मोठी मजल मारली आहे, आणि आम्ही जेथले तेथेंच आहोंत. अगतिकतेच्या दलदलींत पक्के रुतून बसलों आहोंत."

× × ×

"मी सध्यां रशियांत आहे. या देशाला भेट दिल्याशिवाय माझी यात्रा अपुरी राहिली असती. या देशानें मिळविलेल्या यशाबद्दल कांहीं म्हणण्या-पूर्वीच स्वयंस्फूर्त असे उद्गार माझ्या तोंडून निघतात. 'धन्य यांच्या प्रचंड वीरोत्साहाची!'

मॉस्कोहून मला निमंत्रण आलें. माझ्या मनांत त्यावेळीं बोल्शेव्हिकांच्याबद्दल नीट स्पष्ट अशी कांहींच कल्पना नव्हती. त्यांच्याबद्दल निंदाव्यंजक प्रचार माझ्या कानांवर एकसारखा आदळला होता......रशियामध्यें सुखसोयींचें नांव नाहीं, तेथें पुरेसें खायला मिळण्याची व राहण्यासाठीं जागा मिळण्याची वानवा आहे, असें कांहींजणांनीं मला सुनावलें व माझ्या प्रकृतीला तेथें जाण्यानें अपाय होईल असा उपदेश केला. कांहींजण यापेक्षां जास्त चतुर होते. त्यांनीं माझ्या कानांत सांगितलें, 'अहो! ते लोक मोठे हुषार आहेत. सगळीं बनावट सोंगें तुमच्यापुढें उभीं करतील!' आतां हें खरें कीं माझ्यासारख्या वृद्धानें, इतक्या तोळामासा प्रकृतिमानांत, रशियाची सफर करतों म्हणणें म्हणजे साहसच होतें. पण, मी गेलों. कारण, एकतर मला आमंत्रण होतें व दुसरें म्हणजे आजवर इतिहासांत झाला नाहीं असा व एवढा प्रचंड यज्ञ चालू असतांना तो न पाहतां परत येणें म्हणजे अक्षम्य गुन्हाच झाला असता......

मी स्वतःशीं म्हणालों, पाश्चिमात्य राष्ट्रांच्या तिरस्काराला व संतापाला न जुमानतां, एवढ्या बलाढ्य शस्त्रास्त्रांनीं सुसज्ज अशा पाश्चिमात्य भांडवलशाही

संस्कृतींच्या नाकासमोरच रशियानें श्रमिकांचें राज्य मांडलें आहे; हें दृश्य पहावयास मी जावयाचें नाहीं तर कोणी जावयाचें? बलिष्ठांची प्रतिष्ठा व कुबेरांची धनसत्ता धुळीला मिळविण्यासाठीं रशिया धडपडत आहे. मग आपल्या पोटांत भय किंवा राग कशाला? सत्ता व धन दोन्हींना आपण पारखेच नाहीं कां? रंजलेल्याचें, गांजलेल्याचें जें जग तेंच आपलें जग आहे, हें खास.

मी नुकताच रशियांतून परतलों आहें. आपला देश वैभवशिखराला पोचेल पण तिकडे नेणारा मार्ग किती दुःखमय व संकटमय आहे तें मला आतां नीट स्पष्ट दिसलें आहे. रशियाच्या हुतात्म्यांनीं जे त्याग केले व क्लेश भोगले त्यामानानें आपल्यावर झालेले आघात म्हणजे फुलांचा मार म्हणावा लागेल."

* * *

[ पुढील उतारा " Crisis in Civilisation " या सन १९४१ सालीं लिहिलेल्या टागोरांच्या ग्रंथांतून घेतला आहे. ]

" आपल्या साम्राज्यांतील परतंत्र लोकसमूहांना प्रगतीची वाट मोकळी न ठेवतां उलट स्वतःच्या स्वार्थासाठीं त्यांना राबविण्याचा उपक्रम साम्राज्यवादी राष्ट्रें चालू ठेवीत आहेत. परंतु तिकडे सोव्हिएट यूनियनमध्यें पहा! एका अवाढव्य प्रदेशांत वसलेल्या अनेक राष्ट्रांचे हितसंबंध एकवटून सहकार्य कसें होईल याचाच खराखुरा प्रयत्न तेथें चालला आहे. परवांपर्यंत वन्य जमाती म्हणून ओळखल्या जाणाऱ्या लोकांना सुसंकृतीच्या जीवनाकडे वळण्याला उत्तेजनच नव्हे तर प्रत्यक्ष मदत करण्यांत येत आहे. मी असे लोकसमूह स्वतः पाहिले आहेत, आणि त्यांच्या शिक्षणांत झपाट्यानें वाढ करण्यासाठीं अवाढव्य पैसा खर्च करण्यांत येत आहे. थोड्या वर्षांपूर्वी सोव्हिएट प्रदेशांतील सुमारे २०० राष्ट्रसमूह अगदी भिन्नभिन्न पातळीवर होते पण आज सर्वजण मित्रत्वानें व परस्पर सहकार्यानें प्रगतिपथावर वेगानें चालले आहेत.

इकडे आपल्या देशांत पहावें तर आमची जनता अत्यंत मोठ्या संस्कृतींत व बौद्धिक वातावरणांत वाढलेली असूनहि सगळीकडे पाशवी अराजकता माजली आहे. हीं दोन दृश्यें पाहून मला तुलना करावीशी वाटते. एका देशांतील सत्ता नुसती शोषणावर अधिष्ठित आहे, दुसऱ्या देशांत ती सहकार्यावर आधारलेली आहे केवळ ह्या फरकामुळें इतकीं विरोधी दृश्यें आपल्यासमोर आहेत ही गोष्ट दिसते. ”

## ★ सोव्हिएट यूनियनजवळ ‘गुप्त अस्त्र’

डायसन कार्टर नांवाचा इंग्रज लेखक म्हणतो कीं सोव्हिएट यूनियनजवळचें प्रभावी ‘गुप्त अस्त्र’ म्हणजे विज्ञान. पदार्थविज्ञानशास्त्र, रसायनशास्त्र, वनस्पतिशास्त्र, भूगर्भशास्त्र वगैरे अनेक शास्त्रांचा उपयोग मूठभर धनिकांना न होतां सर्व समाजाला होऊं लागला तर केवढें सामर्थ्य निर्माण होऊं शकतें, हें सोव्हिएटनें दाखविलें व हें सामर्थ्य म्हणजेच जर्मनीसारख्या प्रबळ शत्रूला जिंकणारें ‘गुप्त अस्त्र’ ठरलें. तें गुप्त कां म्हणावयाचें? कार्टर म्हणतो कीं, सोव्हिएटला तें गुप्त वाटत नाहीं, परंतु जगाला तें ‘गुप्त’ वाटतें. “कारण हें साधें सत्यच जगाला दिसत नाहीं; खोट्या प्रचाराचा प्रचंड डोंगर रचला गेला आहे आणि तें साधें सत्य त्या डोंगराखालीं दिसेनासें झालें आहे. ”

# सोव्हिएट आरोग्य व्यवस्था

## लेखिका डॉ. सुशीला बेडेकर

प्रयत्नांची व उपायांची पराकाष्ठा करीत असतांना मृत्यूनें मात करून रोग्याला ओढून नेल्यानें डॉक्टरच्या मनाला काय वेदना होत असतील व त्याला किती निराश व हतबल वाटत असेल याची कल्पना इतरांना यावयाची नाहीं. आणि असे प्रसंग डॉक्टरला एकसारखेच सहन करावे लागतात. परंतु, निदान अशावेळीं एवढें तरी समाधान मनांत राहतेंच कीं आपण आपल्या ज्ञानाचा पुरेपूर उपयोग केला, धडपड केली व आपला पराभव झाला असला तरी आपले प्रयत्न बरोबरच होते. सार्वजनिक आरोग्याच्या क्षेत्रांत काम करणाऱ्या माझ्यासारख्या डॉक्टरला एवढें समाधानही लाभूं शकत नाहीं. उघड्या डोळ्यांनीं व बांधलेल्या हातांनीं आम्ही जनतेची रोगग्रस्त स्थिति पाहतों. स्वच्छता ठेवा, पौष्टिक खा, मोकळ्या हवेंत व्यायाम घ्या, वगैरे उपदेशपर सांगतों. 'माता व बालकें हीं राष्ट्राची संपत्ति आहे' अशीं उदात्त वाक्यें लोकांच्या गळीं उतरविण्याचा कधींकधीं प्रयत्न करतों. पण आमचें वैद्यकीय ज्ञान व आमचा रोजचा अनुभव यांचा मेळ घातला कीं आम्हाला वाटूं लागतें : इतका दरिद्री, अज्ञानी, दडपला गेलेला बहुजनसमाज व इतकी निर्घृण समाजव्यवस्था असतांना, रोगनिवारणाचें ज्ञान असूनही सार्वजनिक आरोग्याची अपेक्षा करणें वेडगळपणाच नाहीं कां ?

माता आणि बालकें यांच्या आरोग्यासंबंधींचा एक स्वतंत्र अभ्यासक्रम कलकत्याला ठेवण्यांत आला आहे. व तेथें मी शिकत असतांना आमचे अध्यापक डॉ. ग्रँट हे नेहमीं म्हणत असत कीं हिंदुस्थानच्या आरोग्याचा प्रश्न असा लहानसहान व तुटकतुटक प्रयत्नांनीं कधींच सुटणार नाहीं;

त्यासाठीं प्रचंड प्रमाणावर सोव्हिएट यूनियनप्रमाणें योजना आंखली पाहिजे व पार पाडली पाहिजे. माता–बालक–संगोपन केंद्रांची व्यवस्था पाहतांना हिंदुस्थानांतलि वेगवेगळ्या शहरांतील माता व बालकें यांच्या शारीरिक ऱ्हासाचें मी स्वतः पाहिलेलें विदारक व भीषण चित्र माझ्या डोळ्यापुढें नेहमीं उभें राहतें व डॉ. ग्रॅटच्या त्या उद्गारांची मला नेहमीं आठवण होते.

## आपल्या समाजांत डॉक्टरांची कुचंबणा

सार्वजनिक आरोग्याच्या बाबतींत आणि विशेषतः माता व बालकें यांच्या बाबतींत आपल्या देशांत सगळीकडून आकाश फाटल्यासारखें आहे. मुख्य जबाबदारी समाजाची तर त्या बाजूनें आरोग्याकडे लक्ष नसून फक्त अनारोग्यांच्या बाबतींत, म्हणजे फक्त रोगनिवारणाच्या बाबतींत, थोडाफार प्रयत्न आहे. त्यांतूनही रोगनिवारणाची बरींच हॉस्पिटल्स् धनिक वर्गाच्या दानशूरत्वावरच चाललीं आहेत. एकंदरींत रोगनिवारणाचा बहुतांश भार रोगी माणसावर किंवा त्याच्या कुटुंबावर पडत आहे, असेंच दिसून येईल. ऐपतीप्रमाणें रोगनिवारणासाठीं मनुष्य डॉक्टर, वैद्य, हकीम वगैरे लोकांकडे जातो. तेथें त्याला भेटणारा तज्ज्ञ त्याच्याकडे रोगी म्हणून पाहतो खरा, पण त्याची मुख्य दृष्टि अशी असते कीं या रोग्यांकडून मला प्राप्ती किती होईल. या बाबतींत, डॉक्टर वैद्य इत्यादि लोकांवर समाजाकडून गहजब केला जातो व या ‘ धंदेवाईक ’ प्राप्तीच्या दृष्टीचा मोठ्या हिरीरीनें निषेध केला जातो. पण यांत डॉक्टर किंवा वैद्य यांना वैयक्तिक दृष्टीनें दोष कोणी व कसा द्यावयाचा ? सर्व समाजच जर वैयक्तिक नफातोटा, चढाओढ, जाहिरातबाजी व महत्वाकांक्षा या प्रेरणांनीं चालला आहे तर डॉक्टरी पेशाच्या लोकांनीं तेवढें निःस्वार्थी बनावें व समाजाची निरपेक्ष सेवा करावी हा उपदेश मानभावीपणाचा, निदान चुकीचा, ठरणार नाहीं कां ?

## माता व बालकें यांचा संहार

रोग्याच्या दृष्टीनें मात्र वरील 'धंदेवाइक' दृष्टि फार घातुक ठरते. त्यांतून, रोग्यानें वैद्यकीय सल्ला घेतला तरी आजच्या औषधी कारखानदारी-कडून त्याला सहाय्य होण्याऐवजीं त्याची लुबाडणूक होते. माता व बालकें यांच्या बाबतींत आणखीं वेगळींच संकटें उभीं राहतात. त्यांना आपल्या कुटुंबव्यवस्थेमधील स्त्रियांच्या परावलंबित्वाची व दुःस्थितीची झळ लागते. माझ्या पाहण्यांत आलेल्या हजारों रोगग्रस्त स्त्रियांच्या बाबतींत मी असें म्हणूं शकेन कीं गरोदरपणीं हवें असणारें अन्न व विश्रांति, तसेंच प्रसवकाळीं व नंतर हवी असणारी वैद्यकीय मदत व इतर सुखसोयी त्यांना आजच्या कौटुंबिक जीवनामुळें मिळूं शकल्या नाहींत व म्हणून त्यांना जन्माचा रोगीपणा सहन करावा लागला. आंकडेवारीनें सांगावयाचें तर आपल्या देशामध्यें दर वर्षी १५०,००० स्त्रिया व २८,५०,००० बालकें केवळ अशा सामाजिक अनवस्थेमुळें मृत्युमुखीं पडतात, असा अंदाज सन १९३५ सालच्या सरकारी अहवालांत मिळतो.

इतकी सगळीकडूनच कोंडलेली व हताश परिस्थिति पाहून वाटूं लागतें कीं यांतून बाहेर निघणें शक्य आहे का? अशावेळीं सोव्हिएट यूनियनमध्यें चाल-लेल्या वैद्यकीय प्रयत्नांचें व प्रगतीचें चित्र मला नेहमीं आशादायक वाटलें आहे. कारण अशाच कुचंबलेल्या व नाडलेल्या बहुजनसमाजानें अवघ्या तीस वर्षांत केलेल्या आश्चर्यकारक करामतीचें तें चित्र आहे.

## सोव्हिएट आरोग्य व्यवस्थेचीं तीन वैशिष्ट्यें

सोव्हिएट आरोग्यव्यवस्थेबद्दलची माहिती देणारीं आज अनेक लहानमोठीं पुस्तकें उपलब्ध आहेत व त्यापैकीं कांहीं ग्रंथ ब्रिटिश तज्ञांनीं मोठ्या चिकि-त्सक व काटेकोर पद्धतीनें लिहिलेले आहेत. त्यामुळें त्यांतील माहितीच्या खरेखोटेपणाबद्दल शंका काढतां येत नाहीं. या पुस्तकांतील माहितीवरून एकंदर दोनतीन गोष्टी ठळकपणें लक्षांत येतात त्या अशा :

१–सोव्हिएट आरोग्यव्यवस्था व्यापक व शास्त्रशुद्ध नियोजनाच्या पायावर रचलेली आहे. केवळ रोगनिवारणापुरताच तिचा व्याप नसून रोगप्रतिबंध व रोगरहित अवस्थेंतून शरीराच्या व मनाच्या जास्तजास्त सुदृढतेकडे प्रगति, यांची तरतूद त्या व्यवस्थेंत आहे. भरपूर अन्नाचें उत्पादन, भोजनगृहांचें सर्व दृष्टीनें आधुनिक संघटन, नव्या आरोग्यशील बांधणीच्या इमारतींची योजना, पाणीपुरवठ्याची योजना, कारखाने व सामुदायिक शेतें यांच्यामध्यें काम करणाऱ्या कोट्यावधि स्त्रीपुरुषांच्या श्रमाचें, विश्रांतीचें, व्यायामाचें व वैद्यकीय तपासणीचें नियोजित संघटन, अशा एक ना दोन अनेक बाजूंनीं सोव्हिएटमधील आरोग्यव्यवस्था सर्वस्पर्शी व त्यामुळें प्रभावी बनविण्यांत आली आहे. आज इतर सर्व देशांत आरोग्याशीं जवळचा किंवा दूरचा संबंध असलेली प्रत्येक बाब 'व्यक्तींच्या' स्वार्थबुद्धीवर, ऐपतीवर व एकाकी प्रयत्नावर सोंपविलेली आहे. त्या सर्व बाबी घेऊन त्यांच्यांतून एक सूत्रबद्ध सामाजिक संघटना व व्यवहार्य योजना सोव्हिएटमध्यें बनविली गेली आहे.

२–ह्या व्यापकतेचा पाया कशांत आहे ? तर, इतर देशांतील आरोग्यविषयक प्रयत्नांचे उद्दिष्ट "सर्वांचें आरोग्य" हें नाहीं ; उलटपक्षीं, सोव्हिएटआरोग्यव्यवस्थेला अमूक एका रोग्याचें किंवा मनुष्याचें आरोग्य पुरेसें ध्येय वाटत नाहीं व "सर्व समाजाचें आरोग्य" ह्या एका विशाल ध्येयाला मार्गदर्शक धरूनच तेथील प्रत्येक प्रयत्न केला जातो. इतर देशांतील वैद्यशास्त्रांत व वैद्यकीय संस्थांत प्रतिभावान संशोधक व उत्कृष्ट तज्ज्ञ आहेत व ते आपल्याकडून वैद्यकाची प्रगति करीत आहेतच. परंतु, त्यांच्या प्रयत्नांचें स्वरूप शेवटीं संकुचित व मर्यादितच ठरतें ; कारण स्वतःपुढें आलेल्या रोग्यांच्या प्रकृतीपलीकडे व स्वतःच्या नाकासमोर असलेल्या प्रश्नापलीकडे जाऊन आरोग्याविषयक किंवा वैद्यकशास्त्रविषयक अशी सामाजिक प्रगति करणें, त्यांच्या शक्तीबाहेरचें असतें. सोव्हिएट डॉक्टरच्या शक्तीला अशी

मर्यादा नाहीं व त्यानें योजिलेल्या कोणत्याही आरोग्यविषयक प्रयत्नाला सोव्हिएटच्या राजकीय व औद्योगिक संस्थांचें पुरेपूर पाठबळ मिळतें.

३–सोव्हिएट आरोग्यव्यवस्था ही प्रत्येक आरोग्यविषयक बाबीचा समावेश करणारी व सर्वांच्या आरोग्याचें ध्येय पुढें ठेवणारी आहे. परंतु, एवढ्यानेंच तिला यश मिळालें नसतें. नुसती कागदी योजना किंवा एखाद्या रॉयल कमिशनच्या शिफारशीचा अहवाल एवढेंच तिला महत्त्व मिळालें असतें. पण ती अंमलांत आली हें तिचें खरें मोठेपण आहे; आणि ती खरीखुरी अंमलांत येण्याचें कारणही साधें आहे; तिची अंमलबजावणी चार दोन तज्ञांनीं व सरकारी अंमलदारांनीं केलेली नाहीं; तसें करणें अशक्यच होतें. उलटपक्षीं, सर्वांच्या आरोग्याची ही योजना पार पाडण्यासाठीं कोट्यावधि सोव्हिएट स्त्रीपुरुषांनींच पुढें होऊन तिचा अर्थ समजाऊन घेणें जरूर होतें व जाणतेपणानें प्रत्येक लहानमोठी बाब स्वतः प्रत्यक्ष व्यवहारांत आणणें आवश्यक होतें. सोव्हिएट समाजामध्यें हाच खरा विशेष दिसतो कीं ज्या बाबी सार्वजनिक तऱ्हेनें पार पाडावयाच्या असतात त्या तशा तडीला नेण्याचा विवेक व सामर्थ्य त्या लोकांत आलेलें दिसतें. सार्वजनिक आरोग्याच्या क्षेत्रांत काम करतांना आलेल्या माझ्या येथील अनुभवांमुळें मला एक गोष्ट स्पष्ट दिसते ती अशी कीं कितीही लोकशाही पद्धतीचें सुराज्य किंवा सुस्वभावी हुकुमशाही असली व शंभरटक्के कर्तव्यतत्पर नोकरशाही असली तरी सार्वजनिक आरोग्य साधणें हें काम शेवटीं विवेकी, दक्ष व सामर्थ्यवान अशा नागरिकांनाच पार पाडावें लागतें व तेंही स्वयंस्फूर्त अशा सामुदायिक पद्धतीनें करावें लागतें. सोव्हिएटनें प्रत्यक्ष केलेली प्रगति ही तेथील सत्ताधारी कामगार वर्गाच्या व राजकीय संस्थांच्या नेतृत्वामुळें जरी झाली आहे तरी तिच्या यशाचा मोठा व महत्वाचा वांटा सोव्हिएटच्या सर्वच नागरिकांमध्यें असलेली दक्षता व त्यांचें राजकीय व सामाजिक दृष्ट्या सामुदायिक सामर्थ्य हेंच आहे.

## सोव्हिएट डॉक्टरांची वाढती संख्या

सोव्हिएट आरोग्यव्यवस्थेचीं वर सांगितलेलीं तीन वैशिष्ट्यें प्रत्येक प्रयत्नांत दिसून येतात. उदाहरणार्थ, मॉस्कोसारखें शहर घेतलें तर तेथील लोकसंख्येचे ४०,००० ते ८०,००० वस्तीचे अनेक गट पाडण्यांत आले आहेत. प्रत्येक गटाचें आरोग्य एका मध्यवर्ती 'प्रॉफिलॅक्टोरियम'कडे (आरोग्य-केंद्र) आहे. नंतर प्रत्येक गटांत २००० ते ३००० वस्तीचे विभाग केले आहेत. या प्रत्येक विभागाची जबाबदारी दोन किंवा तीन डॉक्टर्स, कांहीं नर्सेस व आरोग्य प्रचारिका यांच्यावर टाकलेली आहे. तीन वर्षांखालील मुलें व त्यांच्या माता यांची जबाबदारी वेगळ्या डॉक्टरवर, १६ वर्षांपर्यंतचीं मुलें वेगळ्या डॉक्टरकडे अशीही विभागणी आहेच. कोणीही मनुष्य आजारी असो कीं आरोग्यविषयक माहिती त्याला हवी असो, ती आरोग्य-केंद्राकडे मिळूं शकते. मुलांचे कपडे व खेळणीं याबाबतींतही योग्य सूचना तेथें मिळतात व स्त्रियांना कायदेशीर सल्ला देणारा वकीलही मिळूं शकतो. जंतुनाशक पद्धतीनें काळजी घेऊन भरून ठेवलेल्या दुधाच्या बाटल्या लहान मुलांसाठीं मिळतात. तसेंच तज्ञ डॉक्टरांचा व मानसोपचार तज्ञांचाही सल्ला येथें मिळतो.

स्टॅलिनग्राडमधील यांत्रिक नांगराच्या प्रचंड कारखान्यांतील ४०००० कामगारांसाठीं असें एक आरोग्य केंद्र आहे. तेथें ११० डॉक्टर्स व १३५ नर्सेस आहेत. केंद्रामध्यें साधारण २५०० लोक रोज येतात. त्यांना नुसती 'औषधाची बाटली' मिळत नाहीं, तर सर्व तऱ्हेचीं निसर्गोपचाराचीं साधनें, व मालिश वगैरेची व्यवस्था तेथेंच होते. तसेंच प्रत्येक रोग्याला डॉक्टरच्या सल्ल्याप्रमाणें पथ्याचें जेवण देण्याची व्यवस्था आरोग्य-केंद्रानें चालविलेल्या भोजनगृहांत होते. या भोजनगृहांत सहा वेगवेगळ्या पथ्यांचें जेवण देण्याची व्यवस्था आहे. कारखान्यांत काम करणाऱ्या कामगारांच्या सहा पाळ्या आहेत व प्रत्येक पाळींत काम करणाऱ्या स्त्रियांच्या बालकांची

सोय सहा वेगवेगळ्या 'क्रेश' (पाळण्याची खोली) मध्यें होते. या एकाच आरोग्य–केंद्राच्या व्यापामध्यें क्षयरोगी, कॅन्सरचे रोगी वगैरे विशिष्ट रोग्यांची तपासणी व उपचारांची व्यवस्था होते. आवश्यक वाटल्यास त्यांना दुसऱ्या मोठ्या केंद्रांतून किंवा हवेच्या ठिकाणीं पाठविण्यांत येतें. साध्या पडशापासून तों मोठ्या रोगापर्यंतची सर्व काळजी केंद्राकडून घेतली जाते व कोणचाही आर्थिक ऐपतीचा प्रश्न यांत निघत नाहीं. उलट, प्रत्येक व्यक्तीचें व कुटुंबाचें आरोग्य वाढविण्यासाठीं घरांची, कारखान्यांची व भोजनगृहांची व्यवस्था तज्ञ डॉक्टर व आरोग्यप्रचारिका यांच्या देखरेखीखालीं राहते व कोणीही आजारी पडल्यास त्याच्या रोगावर उपचार होतो तोही त्याच्या अन्नाचा, विश्रांतीचा, राहणीचा व श्रमाचा विचार करून व त्यांत जरूर त्या सुधारणा करून केला जातो.

अशा या व्यापक योजनेमुळें सोव्हिएट डॉक्टरांना व आरोग्यविषयक कार्यांत गुंतलेल्या इतर सर्व कार्यकर्त्यांना किती हुरूप व आत्मविश्वास वाटत असला पाहिजे, याची मला नीट कल्पना येते; आणि माझी अशी खात्री आहे कीं इंग्लंड व अमेरिका इत्यादि देशांतील डॉक्टरांनाही सोव्हिएट डॉक्टरचा सर्व बाबतींत हेवा वाटण्यासारखी स्थिति आहे. एक साधी गोष्ट घ्या : आज येथें आपण नेहमीं पाहतों कीं जसजशी डॉक्टरांची संख्या वाढूं लागली तसतशी त्यांच्यांतली चढाओढ वाढत जाऊन प्रत्येकाच्या मनांत एक विवंचना व प्रॅक्टिसमध्यें कमीजास्त चढउतार होण्याचें भय वाढत गेलें आहे. त्यामुळें, एकदां शिकतांना मिळविलेल्या ज्ञानामध्यें भर घालण्याची व नवेनवे शोध हस्तगत करण्याची इच्छा मनांत आली तरी आपला दवाखाना सोडणें कोणालाही शक्य राहिलेलें नाहीं. त्यामुळें, एकीकडे वैद्यकीय ज्ञानांत एकसारखी भर पडत असतांना डॉक्टरांना मात्र आपल्या जुन्या ज्ञानावरच विसंबून प्राप्तीच्या आंकड्याकडे पहात रहावें लागत आहे.

आतां, सोव्हिएट डॉक्टरांच्या बाबतींत पहा. झारकालीन रशियांत तेथें फक्त १९,७८५ डॉक्टर्स होते; म्हणजे ७००० माणसांमागें एक डॉक्टर

होता. खेड्यांच्या बाबतींत तर हें प्रमाण २१००० ना १ डॉक्टर असें होतें. परंतु क्रांतीनंतरच्या अवघ्या १८ वर्षांत, सन १९३५ पर्यंतच २००० माणसांगणिक १ डॉक्टर इतकी डॉक्टरांच्या संख्येंत वाढ झाली व आज तेथें १,३०,००० डॉक्टर्स आहेत. शिवाय १,००,००० विद्यार्थी वैद्यकीय शिक्षणसंस्थांत तयार होत आहेत. क्रांतीनंतर झालेले हे १,०७,००० डॉक्टर्स आज कोणच्याही विवंचनेंत आहेत काय ? एकमेकांशी स्पर्धा करीत कसेबसे तुटपुंज्या ज्ञानावर भागवीत आहेत काय ? नाहीं. त्यांच्याकडे येणाऱ्या रोग्यांकडून त्यांना फी घ्यावी लागत नाहीं ; परंतु कारखाने, सामुदायिक शेतें वगैरे सोव्हिएट संस्थांकडून त्यांना वेतन मिळतें. प्रत्येक डॉक्टरला दर तीन वर्षांनीं भर पगारी तीन महिन्यांची रजा पोस्ट ग्रॅज्युएट कोर्स घेण्यासाठीं मिळते.

## डॉक्टरी व्यवसायांत स्त्रीचें महत्व

डॉक्टरांच्या जीवनांत व स्वतःच्या धंद्याविषयीं त्यांना वाटणाऱ्या अभिमानांत व दक्षतेंत कांहीं उणीव राहूं नये, यासाठीं सोव्हिएट समाज काळजी घेतो व तेंही साहजिक आहे. लाखों तरुणांना डॉक्टर बनवून जर त्यांना खितपत पडावें लागलें तर समाजाचें आरोग्य टिकणें शक्यच नाहीं, ही साधी गोष्ट त्या समाजाला कळली आहे. आज सोव्हिएट डॉक्टर्सच्या एकंदर संख्येपैकीं ७० टक्के स्त्रिया आहेत व नर्सेस व आरोग्यप्रचारिका वगैरे प्रामुख्यानें स्त्रियाच आहेत. यावरून या व्यवसायामध्यें स्त्रीच्या कर्तबगारीचा उपयोग तेथें पूर्णपणें करून घेतलेला दिसतो.

यावरून अशी कल्पना मात्र करूं नये कीं सोव्हिएट स्त्रीला फक्त याच एका व्यवसायांत ओढलें जात आहे. प्रत्येक कुटुंबानें घरकामामध्यें स्त्रियांना गुंतवून ठेवावें, या ऐवजीं अनेक कुटुंबांच्या घरकामाचा जास्तजास्त भाग जर सामुदायिक रीतीनें व यंत्रसहाय्यानें पार पाडला, तर स्त्रियांच्या वांट्याला आलेली ही घरकामाची दगदग व कुचंबणा टळेल व त्यांना अनेक उपयुक्त

व बुद्धिकौशल्याच्या कार्यांत भाग घेतां येईल, अशी सोव्हिएट समाजाची दृष्टि आहे ; व नव्या पद्धतीनें बांधलेल्या प्रचंड इमारतींतून अशा सामुदायिक जीवनाची सोयही करण्यांत आली आहे. त्यामुळें, डॉक्टरीबरोबरच इतर बहुतेक सर्व व्यवसायांतून स्त्रियांचें प्रमाण वाढत आहे. असें जरी असलें तरी वैद्यकीय व्यवसायामध्यें स्त्रीला जें महत्व आहे त्याचें दुसरें एक कारण आहे ; तें कोणतें तें पाहूं.

सोव्हिएट आरोग्यव्यवस्थेंत माता व बालकें यांचें आरोग्य फार महत्त्वाचें, किंबहुना सर्व व्यवस्थेचा पायाच, मानलें जातें. अर्थातच ह्या कार्यांत स्त्री डॉक्टरला जास्त सहज रीतीनें कार्य करतां येईल, हें उघड आहे. माता व बालकें यांच्या आरोग्याचें महत्व इतर देशांतही मानलेलें आहेच. उदारणार्थ कोणत्याही देशाची एकंदर आरोग्यव्यवस्था व तेथील आरोग्य यांची कसोटी किंवा मोजमाप कोणचें असें विचारल्यास वैद्यकशास्त्राचें उत्तर असें : दर हजार जन्मलेल्या बालकांपैकीं एक वर्षाच्या आंत किती मृत्युमुखीं पडतात तें मोजावें व या बालमृत्यूंच्या प्रमाणाला किंवा मानाला आरोग्य मोजण्याचें साधन मानावें. एक वर्षाच्या आंत बालकांना येणाऱ्या मृत्यूचीं कारणें बालकांच्या सभोंवतालच्या परिस्थितींत तर असतातच, शिवाय मातेच्या एकंदर आरोग्यावर व गर्भिणी अवस्थेंत, प्रसवकालीं व नंतरच्या कांहीं महिन्यांत तिला मिळणाऱ्या अन्नावर, विश्रांतीवर व वैद्यकीय मदतीवर बालकांचें जीवन अवलंबून असतें. साहजिकच, एकंदर स्त्रीसमाजाचें आरोग्य व भावी पिढ्यांचें आरोग्य दर्शविणारें बालमृत्यूंचें मान हें सार्वजनिक आरोग्याच्या मोजमापाचें बिनचुक साधन ठरविण्यांत आलें आहे.

## माता बालक-संगोपनाची परिस्थिति

प्रथम बालमृत्यूसंबंधीं कांहीं आंकडेवारी पाहून संगोपन-कार्याची स्थिति काय आहे, तें पाहूं :

दर हजार जन्मलेल्या बालकांपैकीं एक वर्षांत मरणाऱ्या बालकांच्या संख्येला शास्त्रीय परिभाषेंत ‘ बालमृत्यूंचें मान ’ (Infant mortality rate) म्हणतात. वेगवेगळ्या देशांतील बालमृत्यूंच्या मानाचें खालील कोष्टक आहे.

| सन | मुंबई शहर | हिंदुस्थान | झारकालीन रशिया | सोव्हिएट यूनियन | ब्रिटन |
|---|---|---|---|---|---|
| १८७३ | | | | | १५५ |
| १९१३ | | | २७० | | ११० |
| १९१७–१९२१ | ५१२ | २१७ | | | ८९ |
| १९२२–१९२६ | ४४५ | १८१ | | | ७३ |
| १९२७–१९३१ | ३२० | १७० | | १२० (१९२८–२९) | ६७ |
| १९३२–१९३६ | २४८ | १७३ | | | ६१ |
| १९३७–१९३८ | २४५ | १६४ | | | ५३ |
| १९४० | २०१ | | | | |
| १९४३ | | | | | ४९ |

वरील कोष्टकांत, मुंबई शहराची सरासरी संख्या दिली आहे. परंतु जास्त तपशीलवार आंकडे पाहण्यासारखे आहेत, ते असे.

सन १९२७ सालीं, एकाच खोलींत संसार थाटणाऱ्या लोकांची संख्या एकंदर वस्तीच्या ९७ टक्के होती. सन १९४० पर्यंत हें प्रमाण

७४ टक्क्यांवर आलें आहे. या कोंदट वस्तीचा बालमृत्यूंच्या मानावर कसा परिणाम होतो पहा.

| रहाण्याची जागा | सन १९२७ सालीं आढळलेलें बाल मृत्यूचें मान |
|---|---|
| एक खोली | ४९० |
| दोन खोल्या | ३०३ |
| तीन खोल्या | २२२ |
| चार खोल्या | १९५ |

तसेंच सन १९४० च्या एका चौकशींत असें आढळून आलें कीं खालच्या जातींच्या हिंदूंत बालमृत्यू-मान २३२ होतें तर वरिष्ठवर्गीय लोकांत तें ९० पासून ३९ पर्यंत होतें.

बालकांच्या या भीषण संहाराला आळा घालण्याचा काय प्रयत्न झाला हें आतां पाहूं. शहरांतूनच बालमृत्यू-मान भयंकर होतें, पण सरकारनें व धनिक वर्गानें या बाबतींत कांहीं हालचाल केली नाहीं. कामाचे तास कमी करण्यासाठीं व मजुरीसाठीं संप करून कामगारांनीं आपली स्थिति सुधारून घेतली, त्याचा थोडाफार परिणाम झालेला दिसतो व एकंदर घरबांधणीच्या व स्वच्छतेच्या बाबतींतही कांहीं सुधारणा होऊन कामगारांचें आरोग्य सुधारलेलें दिसतें. परंतु माता-बालक-संगोपनासाठीं असे कांहीं प्रयत्न कोणी केलेले दिसत नाहींत.

डॉ. म्हसकर यांच्यासारख्या अनुभवी तज्ज्ञानें याबाबतींत असें म्हटलें आहे कीं, बाल-मृत्यूचें मान कमी करण्याच्या चळवळीला हिंदुस्थानांत अजून यश येत नाहीं; कारण "गरीबी अज्ञान व जुन्या चाली ह्यांमुळें समाजसेवकाचा कांहींच इलाज चालत नाहीं......संगोपन-कार्य अत्यंत बिकट आहे. औषध देऊन रोग बरे करणें हें त्यापेक्षां जास्त उठावदार

असल्यानें औषधावरचा विश्वास जनतेंत वाढत आहे व संगोपनाचें महत्व कमी होत आहे. म्हणून उदार लोक रुग्णालयें उघडतात, बालसंगोपन केंद्रें काढीत नाहींत. ”

बालकें व माता यांच्या बाबतींत आजची परिस्थिति किती अनास्थेची आहे, तें खालील आंकड्यांवरून दिसून येईल.

सन १९३५ सालीं :

| | | |
|---|---|---|
| मुंबई प्रांतांतील बाळंतिणींची संख्या | | ८,००,००० |
| शहरी हॉस्पिटलमधील बाळंतिणीसाठीं पलंग | २५७ | |
| ग्रामीण ,, ,, | ४७५ | |
| एकंदर पलंग | | ७३२ |
| पलंगांचें बाळंतिणींच्या संख्येशीं प्रमाण | | १ : ११०२ |

तुलनेसाठीं सोव्हिएट युनियनमधील माहिती पहा :

| | |
|---|---|
| बाळंतिणीसाठीं पलंग ( झारशाहींत ) | ६,८२४ |
| ,, ,, ( सोव्हिएट काळांत, सन १९४१ मध्यें ) | १,२०,००० |
| सोव्हिएटमधील बाळंतिणींची अंदाजें संख्या | ७०,००,००० |
| पलंगांचें बाळंतिणींच्या संख्येशीं प्रमाण | १ : ७० |

मातांना प्रत्यक्ष प्रसवकालीं व आजारीपणांत मिळूं शकणाऱ्या मदतीची वरच्या आंकड्यांवरून कल्पना येईल. परंतु, गर्भिणीच्या अवस्थेंतील मदतीचा प्रश्न वेगळा आहे. सोव्हिएट यूनियनमध्यें याबाबतींत फारच उत्कृष्ट व सर्वांगीण व्यवस्था आहे. एक तर तेथील प्रत्येक धंद्यामधील स्त्रीला ३५ दिवस + ४२ दिवस अशी बाळंतपणाची रजा व रजेचा पगार व शिवाय मदत मिळते. तेथील एकंदर वेतनव्यवस्थेंत नोकरीवर असणाऱ्याचा मालकाला उपयोग किती ? हा विचार नसतो ; उलटपक्षीं, प्रत्येक काम करणाऱ्या व्यक्तीला

माणूस या नात्यानें काय गरजा आहेत, हें पाहून कमीजास्त वेतन मिळतें. जास्त मुलें असणाऱ्या स्त्री-पुरुषांना या वाढलेल्या गरजेच्या प्रमाणांत जास्त वेतन मिळतें. त्यामुळें, बाळंतपणाचा व बालसंगोपनाचा भार एकेकट्या कुटुंबावर न पडतां, समाजावर वाटला जातो. गर्भिणी अवस्थेपासून मूल मोठें होईपर्यंत माताबालक–संगोपन केंद्रें, दूध–केंद्रें, मुलें संभाळण्याची केंद्रें, मुलांचीं आरोग्य–केंद्रें अशा अनेक संस्थांतून डॉक्टर्स, नर्सेस व आरोग्य-प्रचारिका ( health visitors ) यांची मदत स्त्रियांना मिळत राहते. याचा आंकडेवारीनें तपशील पुढें दिला आहे ; व आधीं आपल्याकडील परिस्थितीची माहिती दिली आहे.

| | | माता–बाल–संगोपन केंद्रें | आरोग्यप्रचारिका |
|---|---|---|---|
| हिंदुस्थान | १९३५ | ८०० | २५० |
| | १९४० | १,०२० | ३५१ |
| मुंबई प्रांत | ... | ... | २३ |
| मुंबई प्रांतांत ८ लक्ष बाळंतिणीसाठीं जरूर असलेल्या प्रचारिकांची संख्या | | | ३,८७० |

आतां सोव्हिएट यूनियनमधील माहिती पहा :

| | झारशाहींत (१९१३) | सोव्हिएट काळांत (१९४१) |
|---|---|---|
| शहरांतील संगोपन–केंद्रें | ९ | ३,४९१ |
| ग्रामीण संगोपन केन्द्रें | | २,३०४ |
| मुलें संभाळण्याचीं केंद्रें : | | |
| शहरी | ५३१ | ५,५४,४४८ |
| ग्रामीण | ७,००० | ४३,४५,६०० |

| | |
|---|---|
| उन्हाळ्यांतील आरोग्य–केंद्रांत ( Camps) मुलांची संख्या | २०,००,००० |
| कायमच्या आरोग्य–केंद्रांत मुलांची संख्या (Sanatoriam) | ४,५०,००० |

या सर्व केंद्रांतून नर्सेस व आरोग्यप्रचारिका काम करीत आहेत. त्यांचे वेगळे आंकडे मला मिळालेले नाहींत, पण तेथील वैद्यकीय खात्यांतील कार्यकर्त्यांची एकंदर संख्या पाहण्यासारखी आहे.

| | सन १९१७ | सन १९४१ |
|---|---|---|
| पदवीधर डॉक्टर्स | १९,७८५ | १,३०,००० |
| वैद्यकाचीं कॉलेजें | १५ | ७२ |
| दरवर्षी नवे पदवीधर डॉक्टर्स | १,५०० | २०,००० |
| नर्सेस, प्रचारिका वगैरे इतर वैद्यकीय कार्यकर्ते | ४६,००० | ( अंदाजें ) ४,६०,००० |
| रेडक्रॉसचे सभासद | | १,२०,००,००० |

वैद्यकीय खात्याचा हा प्रचंड व्याप जितका खर्चाचा आहे तितकाच किंबहुना जास्तच, फळदायी आहे. इतर देशांतून, आजारीपणामुळें देशाच्या उत्पादनांत जी तूट येते व औषधावर जो कोट्यावधी रुपयांचा खर्च होतो, तो जमेस घेतला, तर सोव्हिएट वैद्यकामुळें त्या देशाच्या संपत्तींत केवढी तरी भर पडते असें दिसून येईल.

ही प्रचंड प्रगति करीत असतांना सोव्हिएट समाजानें एक गोष्ट सारखी लक्षांत ठेवली होती ती ही कीं, ह्या सुधारणेचा फायदा किरगीझ, ताजिक वगैरे मागासलेल्या राष्ट्रांना व एकंदर सोव्हिएट खेड्यांतील जनतेला इतर लोकांपेक्षां जास्त प्रमाणांत व झपाट्यानें मिळाला पाहिजे. रशियामध्यें पूर्वीच्या दुपटीनें हॉस्पिटल्स्‌ची संख्या वाढली तर मागासलेल्या राष्ट्रांत

चौपटीनें किंवा जास्तही वाढ झाली व तशीच वाढ ग्रामीण विभागांत करण्यांत आली.

या सर्वांगीण प्रगतीमुळें सन १९१३ मध्यें एकंदर रशियन साम्राज्यांत बालमृत्यूचें प्रमाण सुमारें १७६ होतें तें आज सोव्हिएट संघराज्यांत ५८ इतकें खालीं आलें आहे. अवघ्या तीस वर्षांत हिंदुस्थानइतक्या भीषण परिस्थितींत असलेल्या समाजानें जवळजवळ इंग्लंडमधील आरोग्याइतकें आरोग्य संपादन केलें आहे.

याठिकाणीं, स्वतंत्र साम्राज्यानें संपन्न व पार्लमेंटरी लोकशाहीचें माहेरघर असलेल्या ब्रिटनशीं सोव्हिएटची तुलना करणें जरूर आहे; कारण बोलूनचालून हिंदुस्थान हा परतंत्र असल्यानें येथील प्रगतीला वावच नाहीं, हें खरें आहे. पण ब्रिटनशीं तुलना करूनही काय दिसतें तें पहा.

माता बालक–संगोपन कार्यासाठीं समाजाकडून होणाऱ्या खर्चाची रक्कमच प्रथम तुलनेसाठीं घेऊं. ब्रिटनमध्यें या कार्यासाठीं ३२,००,००० पौंड दरवर्षी खर्च होतात; परंतु सोव्हिएटमध्यें ५,४०,००, ००० पौंड खर्च होतात व लोकसंख्येचा विचार केला असतां प्रत्येक माणशीं ब्रिटनपेक्षां ४·५ पट जास्त रक्कम सोव्हिएटमध्यें खर्ची पडते. ( ही माहिती सन १९४१ सालची असावी. ती केंब्रिजच्या युनिव्हर्सिटी लेबर फेडरेशनच्या ' मेडिसिन ॲन्ड सोशालिझम ' या पुस्तकांतून घेतली आहे. ) ब्रिटनमध्यें माता–बालक संगोपन कार्यावर होणाऱ्यां खर्चाची तेथील औषधांच्या कारखानदारीच्या अवाढव्य धंद्याशीं तुलना करण्यासारखी आहे. सन १९२८ मध्यें, पेटंट औषधांची एकंदर विक्री २,८०,००,०० पौंडांची होती व कारखानदारांनीं जाहिरातबाजीवरच ३०,००,००० व पौंड खर्चले होते. या जाहिरातबाजीच्या व नफेबाजीच्या प्रचंड व्यापापुढें खऱ्या आरोग्यविषयक कार्याचा व्याप तोकडा पडणें साहजिकच आहे. ही सर्व अनाठायीं व अनर्थकारक उधळपट्टी

सोव्हिएट यूनियनमध्यें होत नसल्यानें तेथें खऱ्या लोकहिताच्या कार्यालाच एकमेव स्थान व महत्व मिळत आहे.

ब्रिटनमध्येंही सन १९४३ मध्यें 'बालमृत्यूंचें सरासरी प्रमाण' ४९ वर आलें आहे हें खरें; पण त्यांतही कांहीं गोष्टी बारकाईनें पाहणें जरूर आहे. तेथील बालमृत्यूंचें प्रमाण सन १८६८ मध्यें १५५ होतें व ७५ वर्षांनंतर तें ४९ वर आलें आहे. परंतु, गरीब श्रीमंत या तीव्र वर्गभेदामुळें तेथें आजही कांहीं ठिकाणीं बालमृत्यूंचें प्रमाण १७१ इतकें वर आहे, हें खालील माहितीवरून दिसेल.

बालमृत्यूंचें प्रमाण

सन १९३५

| | |
|---|---|
| पर्ले | ३२ |
| संडरलंड | ९२ |
| स्टॉकटन-ऑन-टीज् | १३४ |
| ब्रिटन | ५७ |

सन १९२५

| | |
|---|---|
| बर्मिंगहॅमचा कामगार विभाग | १७१ |
| इतर भाग | ८९ |
| मॅन्चेस्टर कामगार विभाग | १२० |
| वेलिन गार्डन सिटी | २५ |
| ब्रिटन | ६२ |

## इतर क्षेत्रांतील प्रगति

येथवर, माझ्या स्वतःच्या विशिष्ट कार्यक्षेत्रांसंबंधीं सोव्हिएटमधील प्रगति व तिचीं मूळ कारणें व प्रेरणा यांचा मी विचार केला आहे. अशाच तऱ्हेनें, वैद्यकीय शास्त्राच्या प्रत्येक तात्विक व व्यावहारिक क्षेत्रांत व बाबतींत पुष्कळच

अभ्यासण्यासारखें व सांगण्यासारखें आहे ; परंतु, तें ह्या लेखांत करणें शक्य नाहीं. यापुढें दोन चार विशेष महत्त्वाच्या गोष्टींचा मी उल्लेख करीत आहें.

क्षयरोगाविषयीं तेथें चाललेल्या कार्याला आतांपर्यंत बरेंच यश आलें असून दर हजारीं सन १९२० चें ३·९७ मृत्यूंचें प्रमाण सन १९३१ मध्येंच १·१६ वर आलें आहे. ब्रिटनमध्यें क्षयरोगाला आळा घालण्यासाठीं बरेच प्रयत्न होत आहेत. परंतु, तेथील उपाय-योजनेच्या सामाजिक व्यवस्थेमुळें होणारा बोजवारा पाहण्यासारखा आहे. तेथील रहाणीचें मानच एकंदरींत वाढत गेल्यामुळें तेथील क्षयरोगाच्या मृत्यूंचें दर हजारीं प्रमाण ·७८ इतकें कमी आहे, तरी कामगार वर्गामध्यें विशेषतः कामगार स्त्रियांमध्यें, अजून ह्या भयंकर रोगानें आपलें ठाणें कायम केलें आहे. प्रत्येक क्षयरोग्याला सहा महिनेपर्यंत सरकारतर्फें मदत मिळते व त्याच्यावर दर आठवड्याला ५ पौंडापर्यंत खर्च केले जातात ; पण नंतर अर्धवट बरा होऊन त्याला बाहेर जावें लागतें ; व मग पुन्हां मजुरी व बेकारी यांच्या आपत्तींना तोंड द्यावें लागतें. सोव्हिएटमध्यें अशी अनवस्था ओढवत नाहीं, कारण तेथें क्षयरोग्याला पूर्ण बरा होईपर्यंत विश्रांति व नंतर थोडें अनुरूप कामही देणें, तेथील सोव्हिएट—शासित कारखान्यांच्या कमि-ट्यांना शक्य असतें.

सिफिलिस या भयंकर रोगाचा फैलाव झारकालीन रशियांत फार होता व या ‘ गुप्त रोगावर ’ ज्या तऱ्हेच्या वेडगळ व अनर्थकारक उपाययोजना आपल्याकडे होतात तसाच प्रकार तेथें चालू होता. सोव्हिएट समाजानें प्रथम या बाबतींतला गुप्तपणा व अज्ञान नाहींसें करून लोकांना फसविणाऱ्या व लुबाडणाऱ्या वैदूंचा बंदोबस्त केला व सर्व बाजूंनीं शास्त्रशुद्ध रीतीनें ह्या रोगाला आळा घातला. विशेषतः वेश्याव्यवसायाला नुसता “ कायदेशीर प्रतिबंध ” करून मग डोळ्यांवर कातडें ओढण्याचा प्रकार तेथें झाला नाहीं. असलेल्या वेश्यांना कोणता तरी समाजोपयोगी व्यवसाय देणें व त्यांच्या

जीवनांतून बाहेर काढून त्यांच्यांत स्वाभिमान व प्रामाणिक श्रमाची आवड उत्पन्न करणें, ही गोष्ट सोव्हिएटला करतां आली व बेकारी वगैरे आपत्तींचें निर्मूलन झाल्यामुळें नव्यानें ह्या लाजिरवाण्या पेशांत कोणी स्त्रिया जाण्याचें बंद झालें. त्याचबरोबर, एकंदर स्वच्छता व लैंगिक जीवनाविषयींचें ज्ञान यांचा प्रसार करून गुप्त रोगाला आळा घालण्यांत आला. याचा पुरावा सन १९३५ च्या सैन्यभरतीच्या वैद्यकीय तपासणींत दिसला. अनेक औद्योगिक व ग्रामीण विभागांतून आलेल्या लाखों तरुणांपैकीं कोणीही सिफिलिसनें पछाडलेला आढळला नाहीं.

आतां, लेख संपविण्यापूर्वी मलेरियासारख्या एका भयंकर संहारक रोगा-संबंधीं सोव्हिएटनें केलेल्या प्रगतीचें स्वरूप पाहूं. ह्या रोगानें, सन १९३५ मध्यें, आपल्या देशांत १२,२५,००० लोक मेले. हिंदुस्थानच्या मलेरिया सर्व्हेचे प्रमुख ले. कर्नल सिन्टन यांनीं सन १९३६ मध्यें एक पुस्तक लिहिलें आहे त्याचें नांवच ' मानवानें निर्माण केलेला हिंदुस्थानांतील मलेरिया ' असें आहे. त्यांनीं असें दाखवून दिलें आहे कीं, जरी मलेरियाला नैसर्गिक कारणें असलीं तरी या देशांतील मलेरियाचें व्यापक व संहारक स्वरूप मानवनिर्मित आहे. रेल्वे बांधणी, पाट बंधाऱ्याची व तलावांची बांधणीं, नवीं बंदरें वगैरे करतांना येथील इंजिनियरांनीं फक्त तात्कालिक काटकसरीकडे पाहिलें व मोठमोठ्या प्रदेशांतून मलेरियाची कायमची " सोय " करून दिली, असें या तज्ञाचें मत आहे. हीच गोष्ट विशेषतः, बंगालमधील आजच्या परिस्थितीबद्दल, अनेक इंजिनियरांनीं व शास्त्रज्ञांनीं नमूद केलेली आहे. रेल्वे कंपन्यांच्या किंवा इतरांच्या नफ्याच्या व काटकसरीच्या धोरणामुळें जें येथें घडूं शकलें, तें तर सोव्हिएटमध्यें घडलें नाहींच; उलटपक्षीं, इंजिनियरांच्याच ज्ञानाचा उपयोग निसर्गतः मलेरियाचीं आगरें असलेल्या प्रदेशांना या रोगांपासून मुक्त करण्यांत झाला आहे. झारच्या साम्राज्यांत मलेरियाचा संहारक रोगांत दुसरा नंबर होता. अर्मेनिया, अझरबैजान, जॉर्जिया, उझबेकिस्तान वगैरे

मोठमोठ्या प्रदेशांत लाखों मृत्यू मलेरियानें होत. परंतु, उपाययोजनेसाठीं व संशोधनासाठीं फक्त बाटूमीला एक केंद्र होतें. सन १९४० सालीं १२३६ केंद्रें झालीं आहेत. तसेंच सोव्हिएट इंजिनियरांनीं पाण्याचा निचरा करून लाखों एकर जमीन नव्यानें लागवडीखालीं आणली आहे व असें करतांनाच मलेरियाची हकालपट्टी केली आहे.

सोव्हिएट आरोग्यव्यवस्था किती व्यापक तऱ्हेनें प्रत्येक लहानमोठा प्रश्न सोडवूं शकते, याचें मलेरियाच्या बाबतींत स्पष्ट प्रत्यंतर मिळतें. कारण, नुसत्या आरोग्यखात्याला हा प्रश्न सुटणें शक्यच नव्हतें. इंजिनियरांच्या मदतीला तेथें आणखीही कांहीं क्षेत्रांतील तज्ञांची मदत घ्यावी लागली. उदाहरणार्थ, मलेरियाचा नाश करण्यासाठीं रोगग्रस्त विभागांतील सर्व नागरिकांना या रोगाचीं खरी कारण-परंपरा समजावून देणें व डांसापासून स्वतःला वांचविण्याचे उपाय वापरण्याची संवय त्यांना लावणें, हें काम शिक्षण खात्याला करावें लागलें. सन १९३४ ते १९४१ या काळांत त्या विभागांतील २,७०,००० शेतकऱ्यांना मलेरियाविरुद्ध कसे प्रयत्न करावयाचे तें शिकविण्यांत आलें. केवळ दूषित हवेमुळें हा ताप येतो अशी तेथील लोकांची शतकानुशतकांची जुनी समजूत होती. ती घालविणें व जुन्या पद्धतीच्या वैद्यकाच्या विचार-सरणीचा पगडा नाहींसा करणें जरूर होतें. असें करतांना तेथील वैद्यकीय प्रचारकांना केवढे प्रयत्न करावे लागले असतील याची कल्पना येथील प्रचार-कार्यामुळें मला नीट येऊं शकते. प्रत्येक मनुष्याचें रोगविषयक ज्ञान वाढ-विल्याशिवाय आरोग्यासंबंधीचे साधे उपायही अंमलांत येणें शक्य नसतें. जुन्या वैद्यकांतील प्रभावी औषधींचें संशोधन करून त्याचा समावेश सोव्हिएट वैद्यकानें आपल्या ज्ञानभांडारांत केला आहे. पण असें करतांना आजच्या शास्त्रसिद्ध व प्रयोगसिद्ध वैद्यकासंबंधीं धरसोडीची किंवा साशंक वृत्ति त्यानें ठेवलेली नाहीं, त्यामुळेंच सोव्हिएट डॉक्टरांच्या मनांत व जनतेच्या मनांतही

आधुनिक उपाययोजना नीट अंमलांत आणण्यास लागणारा उत्साह व आत्म-विश्वास दिसत आहे. डॉक्टर व इतर नागरिक यांची ही शास्त्रीय दृष्टि व त्यांचें अव्याहत सहकार्य हा सोव्हिएटच्या आरोग्यविषयक प्रगतीचा पाया आहे; आणि अशी शास्त्रीय दृष्टि व व्यापक सहकार्य हें एकंदर सोव्हिएट समाजव्यवस्थेच्या यशाचेंही मूलभूत कारण आहे.

---

प्रस्तुत लेखांत खालील पुस्तकांतील माहितीचा उपयोग केला आहे. Webb (Sidney and Beatriee) "Soviet Communism', pages 833-862; Dr. Eva Black "Soviet health in wartime"; Prof. Semashko "Public Health in the U. S. S. R."; Dr. A. Upenski "The Moscow Malaria Institute"--article in "Soviet union News" (Delhi) of Dce, 1945; University Labour Federation (Cambridge) pamphlet, "Medicine and Socialism"; Arnold Sorsby "Medicine & Mankind"; Prof. Clark, "Patent Medicine"; Annual Report of the Public Health Commissioner with the Government of India for 1935; Margaret Read "Indian Peasant uprooted"; डॉ. म्हसकर "हिंदुस्थानांतील बालमृत्यूंची कारणपरंपरा; "आरोग्यमंदीर" मासिकाच्या "शिशु-अंकां" तील लेख.

सोव्हिएट वैद्यकासंबंधी पुढील ग्रंथ वाचनीय आहेत. Sir A. Newsholme & Dr. J. A. Kingsbury "Red Medicine"; Mrs. A W. Field "Protection of women & Children in Soviet Russia", A. J. Haines "Health work in Soviet Russia"

तेथील वैद्यकीय संशोधनाची माहिती "American Review of Soviet Medicine" या नियतकालिकांत मिळते व तें हिंदुस्थानांतही उपलब्ध आहे. शिवाय सोव्हिएटच्या काबूल येथील वकिलातीकडून व परराष्ट्रीय सांस्कृतिक संबंधासाठीं काम करणाऱ्या मॉस्कोंतील "व्होक्स" या संस्थेकडून वैद्यकासंबंधीं बुलेटीन्स हिंदी मेडिकल संस्थांना व जिज्ञासू व्यक्तींना पाठविण्यांत येतात.

★

## ★ ट्रॅक्टर व कापणीचीं यंत्रें

सन १९३० मध्यें, सोव्हिएट यूनियनमध्यें ७२,००० ट्रॅक्टर होते. सन १९४१ मध्यें त्यांची संख्या ५,२३,००० झाली. कापणीचीं यंत्रें सन १९२८ पूर्वीं सोव्हिएट यूनियनमध्यें नव्हतीं. सन १९३० मध्यें तेथल्याच कारखान्यांत पहिलें यंत्र तयार झालें. सन १९३५ मध्यें ५२,००० व सन १९४० मध्यें १,८२,००० यंत्रें शेतावर काम करींत होतीं. अमेरिका हें याबाबतींत जगांतील अग्रेसर राष्ट्र समजलें जात आहे. तेथील कापणी-यंत्रांनीं होणारें काम सन १९४१ मध्यें, प्रत्येक यंत्रामागें सरासरी ४०० एकर इतकें होतें. सोव्हिएट कापणी-यंत्रांनीं दर यंत्रामागें ७८३ एकर कापणी सन १९३८ मध्यें केली होती.

# सोव्हिएट विरोधामागील अर्थकारण

लेखक प्रि. वा. य. कोल्हटकर

## युद्धसमाप्तीपूर्वी

तेहरान, याल्टा आणि पॉटस्डॅम या युद्धकालांत भरलेल्या बड्या तीन राष्ट्र-प्रमुखांच्या बैठकींत सोव्हिएट रशिया व पश्चिमेकडील हिटलर-विरोधी राष्ट्रें यांचे संबंध पुष्कळच जवळचे झाले होते. फॅसिस्टसत्ताविरोधी युद्धांत १९४१ सालापासून पुढें युद्ध समाप्त होईपर्यंत इंग्लंड, अमेरिका आणि रशिया हीं बलाढ्य राष्ट्रें एकोप्यानें लढत होतीं व आपल्यांतील एकजूट शांतताकाळां-तहि अभेद्य राहील अशी आशा प्रदर्शित करीत होतीं. वर उल्लेखिलेल्या त्रिराष्ट्र परिषदांत जे जे निर्णय घेतले गेले, त्या सर्वांचा आधार त्रिराष्ट्रांच्या एकजुटीवर होता. युद्धाच्या आपत्तींत निर्माण झालेली मैत्री भावी जागतिक शांतता टिकविण्यास उपयोगी पडावी अशा सदिच्छेनें युद्ध चालू असतांनाच डंबार्टन ओक्स व ब्रेटनवुड्स् येथील आंतरराष्ट्रीय परिषदांत भावी राजकीय व आर्थिक व्यवस्थेची जी रूपरेखा आंखण्यांत आली, तिच्या मुळाशीं देखील बड्या राष्ट्रांतील एकोपाच गृहीत धरण्यांत आला होता.

## युद्धोत्तर

परंतु युद्ध संपून एक वर्ष झालें न झालें तोंच आपणांस ही सर्व परिस्थिति पालटून गेलेली दिसते. सोव्हिएट रशिया आणि अँग्लो-अमेरिका यांचे परस्परसंबंध मैत्रीच्या भूमिकेवरून जाऊन उघडउघड विरोधी भूमिकेवर आलेले आपणांस दिसतात. प्रत्येक आंतराष्ट्रीय परिषदेंत सोव्हिएट रशिया आणि पश्चिमेकडील वरील दोन राष्ट्रें यांच्यांत खटके उडतात, एवढेंच नव्हे, तर रशियाच्या परराष्ट्रीय व अंतस्थ धोरणासंबंधीं संशयाचें वातावरण निर्माण करण्याची जोराची खटपटहि या राष्ट्रांतून करण्यांत येत आहे.

रशियाचें धोरण साम्राज्यशाही आहे; रशियांत लोकसत्ता नाममात्रहि नाहीं; रशियांतील जनता अज्ञानांत व दारिद्र्यांत पिचत आहे; केवळ लष्करी सामर्थ्याच्या जोरावर स्टॅलिनची सत्ता रशियांत चालू आहे; अशा तऱ्हेची युद्धकालांतील रशियाविषयींच्या प्रेमादर मिश्रित विधानांशीं विसंगत असलेली भाषा आज पश्चिमेकडील राष्ट्रांतून आपणांस ऐकूं येऊं लागली आहे. आंतरराष्ट्रीय परिषदांत रशियानें इंग्लंड अमेरिका या देशांच्या धोरणाशीं विसंवादी असा कोणताहि मुद्दा पुढें आणला तर लगेच रशिया ही जागतिक शांततेच्या मार्गांतील मोठी धोंड ठरूं लागली आहे! जणूं काय ब्रिटन व अमेरिका यांनाच जगाच्या कल्याणाची खरी काळजी!

## रशियाचें अंतर्गत धोरण

जागतिक राजकारणांत झालेल्या या वदलामागें कोणतीं कारणें आहेत? रशियाच्या धोरणांत खरोखरीच कांहीं आश्चर्यकारक बदल झाला आहे कीं काय? असे प्रश्न साहजिकच पुढें येतात. प्रथम दुसरा प्रश्न विचारांत घेऊं. युद्धानंतरच्या काळांत रशियानें अंतस्थ आणि परराष्ट्रीय बाबतींत कोणतें धोरण अवलंबिलें आहे? अंतस्थ कारभारांत रशियापुढील मोठा प्रश्न म्हणजे युद्धांत झालेलें नुकसान भरून काढून जनतेच्या राहणीचें म्हणजेच उत्पादनाचें मान वाढविणें हा होय. त्या दृष्टीनें रशियानें केलेल्या कामगिरीची कल्पना पुढील उताऱ्यावरून येईल:

"युद्धकाळांत बांधलेल्या नवीन कारखान्यांत नागरी जीवनास उपयोगी अशी यंत्रसामुग्री निर्माण करण्यांत येत आहे. कापडगिरण्या फिरून सुरू करण्यांत येत असून मध्य-आशियांत नव्या गिरण्यांची स्थापना करण्याचें काम चालू आहे. अजस्र रणगाड्यांच्या कारखान्यांत साध्या मोटारी व लॉऱ्या तयार करण्यांत येणार असून इतर औद्योगिक कारखान्यांतून मोठ्या प्रमाणावर नित्योपयोगी गोष्टींचें उत्पादन सुरू झालें आहे. त्यामुळें अनियंत्रित

बाजारांतील मालाच्या किंमतीदेखील झपाट्यानें खालीं उतरूं लागल्या आहेत. धान्यपरिस्थिति सुधारत आहे व यंदा १९४० (युद्धापूर्वी) सालच्यापेक्षांहि जास्त पैदाशीची अपेक्षा आहे. पाव, पीठ व अन्नधान्यें यांची रेशनपद्धति यंदा व इतर सर्व मालाची रेशनपद्धति पुढील वर्षी नाहींशी होईल असें अनुमान आहे. कापूस, बीट आणि भाजीपाला यांच्या लागवडीखालील जमिनीची वाढ हजारों एकरांनी करण्यांत आली आहे. फ्रान्स, पोलंड आणि पूर्व युरोपांतील इतर राष्ट्रांस कमीअधिक प्रमाणांत धान्य रवाना करण्यांत आलें असून त्यामुळें तेथील धान्यपरिस्थिति आटोक्यांत आणण्यास मदत झाली आहे. एप्रिल १९४६ मध्यें नव्या पंचवार्षिक योजनेची घोषणा करण्यांत आली. १९५० त ही योजना पूर्णपणें कृतींत यावयाची आहे. त्या वेळीं मजुरींत युद्धपूर्वकालाच्या १५०° टक्के वाढ व्हावयाची असून दरम्यानच्या मुदतींत दरसाल १२॥ लक्ष अधिक कामगारांना काम मिळावयाचें आहे. खाद्यपदार्थांच्या वाढीबरोबरच घरें बांधण्याच्या प्रचंड योजना या पंचवार्षिक योजनेंत समाविष्ट केल्या आहेत. कोळसा, वीज व खनिज धातूंचें उत्पादनहि मोठ्या प्रमाणावर योजलेलें आहे. खेडोपाडीं वीजपुरवठा, हजारों मैलांची रेल्वे, रस्ते व इतर वाहतुकीचीं साधनें, दुभत्या जनावरांची वाढ इत्यादि गोष्टींनाहि बरेंच प्राधान्य देण्यांत आलेलें आहे. नवीन योजनेसाठीं २००० कोटि रूबलचें कर्ज मे १९४६ मध्यें काढण्यांत आलें आहे."

या उताऱ्याच्या सत्यासत्यतेबद्दल शंका घेण्याचें कारण पडणार नाहीं. कारण तो रशियाच्या कोठल्याहि पक्षपाती व्यक्तीनें अगर संस्थेनें प्रसिद्ध केलेल्या ग्रंथांतून उद्धृत केलेला नाहीं. तर आपल्याच देशांतील रिझर्व बँकेनें १९४५–४६ सालचा जो चलन आणि भांडवलविषयक वार्षिक अहवाल नुकताच प्रसिद्ध केला आहे त्यांतून तो घेतलेला आहे (पानें ११–१२). त्यावरून अंतस्थ कारभारांत आजपर्यंत ज्या धोरणानें रशियाचें पाऊल पडत होतें त्यांत कोणताच बदल झालेला नाहीं असें दिसून येतें.

## रशियाचें परराष्ट्रीय धोरण

आतां परराष्ट्रीय धोरणाकडे वळूं. तेहरान, याल्टा व पॉट्स्डॅम या पारिषदांत वेळोवेळीं झालेल्या ठरावांत फॅसिझमचा निःपात करण्याचा निर्णय घेण्यांत आला होता. त्याला अनुसरून फॅसिस्ट अमलाखालून मुक्त झालेल्या देशांत रशियानें आपलें धोरण आखलें. फॅसिझमचा उदय ज्या भांडवलशाही मक्तेदारींतून झाला तिचें उच्चाटन केल्याशिवाय फॅसिझम नाहींसा होणें शक्य नाहीं हें जाणून प्रत्येक देशांतील फॅसिस्टविरोधी लोकांस रशियानें आपला पाठिंबा दिला. या देशांवर हिटलर, मुसोलिनी इत्यादि परकीय फॅसिस्टांचा अंमल बसविण्याच्या कामीं ज्या तद्देशीय पुढाऱ्यांनीं हातभार लावला होता त्यांस शासन करणें, जनतेनें निवडून दिलेल्या फॅसिस्टविरोधी सरकारांस मदत करणें, आपल्या वजनाखालच्या देशांतील भांडवलशाही मक्तेदारी नाहींशी करणें, मोठमोठ्या जमीनदाऱ्या काढून जमिनींची फेरविभागणी करणें, महत्त्वाच्या उद्योगधंद्यांचें राष्ट्रीकरण, मजुरांना स्वातंत्र्य देणें इत्यादि गोष्टी रशियानें घडवून आणल्या. उलट फॅसिझमचें केंद्र जें जर्मनी, त्या जर्मनीच्या ब्रिटिश व अमेरिकनशासित विभागांत युद्धानंतर राज्यकारभारांत फॅसिस्टांची मदत घेण्यांत येत होती ही गोष्ट जाहीर आहे. जर्मनींतील बड्या भांडवलदार वर्गाची सत्ता हाणून पाडण्याच्या कामीं फ्रान्स व रशिया यांनीं जोर धरावा व ब्रिटन–अमेरिकेच्या प्रतिनिधींनी विरोध दर्शवावा असें दृश्य नुकत्याच झालेल्या पॅरिस येथील चार परराष्ट्रमंत्र्यांच्या परिषदेंतहि दिसून आलें. मुक्त झालेल्या देशांची आर्थिक पुनर्रचना होऊन तेथील नैसर्गिक व मानवी साधनसंपत्तीचा पुरेपूर उपयोग केला जावा व त्यामुळें समानतेच्या भूमिकेवरून जनतेच्या राहणीचें मान वाढावें यासाठीं स्वयंपूर्णता व नियोजन या धोरणांचा पुरस्कार रशियानें केलेला आहे असें दिसतें. आपल्या विस्तीर्ण प्रदेशांत याच तत्त्वांवर रशियानें गेल्या पंचवीस वर्षांत प्रचंड प्रगति घडवून आणली. ज्यांना

झारशाहींत केवळ पिळणूक करण्यासाठीं साम्राज्यांत सामील करून घेतलें होतें, अशा मध्य व पूर्व आशियांतील मागासलेल्या प्रदेशांत अद्ययवत् साधनांनीं सज्ज अशीं औद्योगिक केंद्रें सोव्हिएट सरकारच्या नव्या जनताभिमुख धोरणामुळें निर्माण झालीं. अशा पद्धतीनें जर फॅसिस्टांच्या हुकमतीपासून मुक्त झालेल्या देशांची उन्नती घडून आली, तर त्यांत वावगें काय? आणि परराष्ट्रीय धोरणांत रशिया या दृष्टीनें पाउलें टाकीत असल्यास रशियास 'शांतताविरोधी', 'साम्राज्यवादी' इत्यादि विशेषणें कशीं लागू पडतील? आणि रशियाविषयीं कशामुळें इतकी भीति वाटून ॲटम बॉंब संबंधींचें गुपित आपल्याजवळच राखून ठेवण्याचा इतका अट्टाहास पश्चिमेकडील राष्ट्रें करीत आहेत?

## भांडवलशाही पद्धति

या प्रश्नांचीं उत्तरें अमेरिकेसारख्या भांडवलशाही राष्ट्रांच्या आर्थिक व्यवस्थेंत आणि तिच्या भवितव्यांत शोधलीं पाहिजेत. ही गोष्ट आतां सर्वसंमत झाली आहे कीं, भांडवलशाहीची इमारत उत्पादित मालाची विक्री होऊन झालेल्या फायद्यावर उभारलेली आहे. या फायद्याचा उपयोग भांडवल आणखी वाढविण्यांत केला जातो. आणि पुन्हा त्यामुळें अधिक माल निर्माण करून त्याच्या विक्रींतून अधिक फायदा प्राप्त होतो. परंतु अशा रीतीनें चढत्या श्रेणीनें भांडवलाची वाढ होण्यास मालाचा उठाव होईल अशा बाजारपेठांची आवश्यकता असते; त्याशिवाय भांडवल गुंतविण्याचे किफायतशीर मार्ग सांपडणार नाहींत.

म्हणूनच औद्योगिक प्रगति झालेल्या देशांची बाजारपेठ मिळविण्यासाठीं धडपड चालू असते. या धडपडींतूनच साम्राज्यें निर्माण होतात आणि पुढें निरनिराळ्या साम्राज्यवादी राष्ट्रांत परस्परांविरुद्ध चढाओढ लागून त्याचे पर्यवसान युद्धांत होतें. त्याचबरोबर एका देशांतील भांडवलवाले इतर आपल्या समधर्मीय मंडळींशीं संगनमत करून परस्पर साहाय्याच्या भूमिके

करून बाजारपेठा किंवा विशिष्ट प्रकारच्या मालाचा पुरवठा नियंत्रित पद्धतीनें कबजांत ठेवतात आणि त्यांतून फायद्याची तजवीज करतात. यामुळें चढाओढीचें क्षेत्र मर्यादित झालें तरी ती जास्त तीव्र होते. कारण सर्वच भांडवलदार अशा रीतीनें एकत्र न येतां त्यांच्यांत अनेक लहानमोठे तट पडतात व या तटांत चढाओढ सुरूच राहाते. जोंपर्यंत बाजारपेठांचा विस्तार होत असतो तोंपर्यंत भांडवलदारी पद्धतीचा प्रसार होण्यास अडचण पडत नाहीं. परंतु बाजारपेठा मर्यादित होतांच त्यासाठीं होणाऱ्या चढाओढीस उग्र स्वरूप प्राप्त होतें. ब्रिटन अमेरिका, फ्रान्स, कॅनडा इत्यादि पश्चिमेकडील राष्ट्रांची आर्थिक व्यवस्था या भांडवलशाही पद्धतीची आहे. चालू शतकांत भांडवलशाहीचा प्रसार १९१४ सालच्या पुढें फारसा होऊं शकला नाहीं. कारण या पद्धतीवर होणारी प्रगति आता जवळजवळ कुंठित झालेली आहे. केवळ फायद्यासाठीं उत्पादन करावयाचें ठरविल्यास उत्पादनाच्या साधनांच्या व उत्पादन शक्तीच्या प्रमाणांत बाजारपेठा वाढलेल्या नसल्यामुळें भांडवल-दारांना मोठी पंचाईत पडेल अशी परिस्थिति निर्माण झाली आहे. ज्या मागासलेल्या प्रदेशांतील जनतेला भांडवलदार आपला माल पुरवीत असत, तिची क्रयशक्ति वाढण्याऐवजीं उलट कमीच होत आहे. त्यामुळें अधिक प्रमाणावर काढलेल्या मालाला गिऱ्हाईक अपुरें पडतें. त्यांतच जर जगांतील कांहीं प्रदेश आपल्या बाजारपेठेच्या कक्षेंतून बाहेर जाऊं लागले, तर अर्थात या भांडवलशाही राष्ट्रांची स्थिति अधिकच बिकट होणार. आणि तसाच प्रकार पहिल्या महायुद्धानंतर घडून आला.

## रशियन क्रांति व भांडवलशाही

युद्धाच्या शेवटीं रशियांत क्रांति होऊन जगाचा एकषष्ठांश इतका भाग भांडवलशाही चौकटींतून फुटून समाजवादी बनला. तोंपर्यंत इतर राष्ट्रांचा माल खपविण्यास व तेथील जादा भांडवल किफायतशीरपणें गुंतविण्यास रशियांत चांगलीच संधि मिळत होती. क्रांतिपूर्वी रशियांत १००० कोटि

६८२०

फ्रांक इतकं फ्रेंच भांडवल गुंतलेलें होतें व १९१२ त १३७ कोटि रूबल किंमतीचा माल परदेशांतून रशियांत आयात झाला होता. क्रांतीनंतर रशियांतील नव्या सरकारनें हें सर्व कर्ज फेटाळून लावलें व मालाची आयात १३७ कोटींवरून २ कोटींवर आली. नियोजित आर्थिक व्यवस्थेचा पुरस्कार केल्यामुळें जरी रशियास परदेशांची मदत हवी होती तरी परदेशी भांडवल-दारांस आपल्या देशांत धुमाकूळ घालून फायदे उकळण्यास रशियाची मान्यता मिळणें शक्य नव्हतें. हें पाहूनच रशियन राज्यक्रांति हाणून पाड-ण्याची पश्चिमेकडील भांडवलशाही राष्ट्रांनीं शिकस्त केली. परन्तु त्यांना यश आलें नाहीं. हा इतिहास आतां सर्वांच्या माहितीचा आहे. अशा रीतीनें भांडवलदारांना जरूर असलेल्या बाजारपेठांची मर्यादा आकुंचित झाली व त्या मानानें भांडवलशाही राष्ट्रांमधील चढाओढ अधिकच वाढली. यांतून तोड काढण्यासाठीं कांहीं वर्षे मोठमोठ्या रकमा इतर गरजू राष्ट्रांना कर्जाऊ देऊन त्यायोगें आपला माल खपविण्याचें धोरण अमेरिकेसारख्या देशांनीं अवलंबिलें. मध्य—युरोप व दक्षिण अमेरिकेंतलि देशांना अशा रीतीनें कर्जें मिळालीं. परंतु थोड्याच कालांत असें दिसून आलें कीं ज्यांना हीं कर्जे दिलीं त्यांनीं आपली औद्योगिक प्रगति करून घेऊन, तीं कर्जे परत करण्याचा मार्ग म्हणून आपला माल परत धनको राष्ट्राकडे पाठविण्याचें धोरण स्वीकारतांच धनको राष्ट्रांतर्गत उत्पादकांची गाळण उडाली! कारण आतां त्यांना या देशांची चढाओढ जाणवणार होती. म्हणून मालाच्या आयातीवर भारी जकाती बसवून आपलें संरक्षण करण्याचें त्यांनीं ठरविलें. पण याचा परिणाम ऋणको राष्ट्रांवर होऊन त्यांच्या मालाला गिऱ्हाईक सापडेना. तेव्हां तें मिळविण्यासाठीं त्यांनींहि व्यापारी करार वगैरे युक्त्या योजण्यास सुरवात केली. या गोष्टींनी जगाचा व्यापार वाढण्याऐवजी त्यावर नसतींच बंधनें लादलीं गेलीं व शेवटीं सर्व भांडवलशाही राष्ट्रांवर आर्थिक मंदीचा अंमल पसरूं लागला. १९२९ सालापासून पुढें पांच वर्षेपर्यंत ही मंदी बेकारीच्या वाढत्या आंकड्यावरून सर्व देशांत दृष्टीस पडत

होती. त्याला अपवाद असें एकच राष्ट्र होतें. पण तें समाजवादी पद्धतीवर आपला व्यवहार चालवीत होतें. तें राष्ट्र म्हणजे सोव्हिएट रशिया. बेकारीएवजी त्या देशांत कामकऱ्यांची संख्या अपुरी पडूं लागली होती. कारण समाजोपयोगी उत्पादनाची वाढ किती करावी याला ‘ भांडवलदारी फायदा ’ कसा होईल या विवंचनेची मर्यादा नसते.

## आर्थिक अरिष्टांतून महायुद्धांत

आर्थिक अरिष्टांतून मार्ग काढण्याचे अनेक मार्ग चोखाळण्यांत आले; पण शेवटीं हिटलरनें दाखवून दिलेला मार्गच जास्त प्रभावी ठरला. तो मार्ग म्हणजे युद्धनिर्मिती. १९३७ पासून पुढील कालांत युद्धसाहित्याचें उत्पादन मोठ्या प्रमाणावर चोहोंकडे सुरू झालें व बेकारी भराभर कमी होऊं लागली. भांडवलशाही आर्थिक व्यवस्थेला आपल्या बचावासाठीं शेवटीं युद्धाचा आश्रय करावा लागला! १९३९ पासून झालेलें दुसरें महायुद्ध हें भांडवलशाही राष्ट्रांच्या आपसांतील झगड्यांतून जरी निर्माण झालें असलें तरी त्याचें स्वरूप हळूहळू पालटत जाऊन तो एक सामान्य जनतेविरुद्ध भांडवलशहांनीं केलेला लढा ठरला. पश्चिमेकडील राष्ट्रांतील जनतेंत मोठी जागृति झाली व पुढें एका बाजूला सोव्हिएट रशिया व दुसऱ्या बाजूला उत्तर अमेरिका हे देश युद्धांत ओढले गेल्यावर जनतेच्या प्रतिकारशक्तीस अधिकच जोड मिळाली. हिटलर मुसोलिनी व टोजो हे अक्ष-राष्ट्रांचे नेते भांडवलशाही मक्तेदारीचे प्रतिनिधि ठरले. प्रत्येक भांडवलशाही राष्ट्रांत असलेल्या त्यांच्या अनुयायांनाहि बचावाचें धोरण स्वीकारावें लागलें. जगभर पसरलेल्या या युद्धांत सोव्हिएट रशियानें आपल्या अतुल प्रतिकारशक्तीनें हिटलरविरोधी सर्व राष्ट्रांत नवचैतन्य निर्माण केलें. हिटलरशाहीचा नाश करण्याच्या कामीं सोव्हिएट रशियाची मदत फारच महत्त्वाची ठरणार हें पाहून इंग्लंड, अमेरिका या प्रमुख मित्र राष्ट्रांनीं रशियाशीं दोस्ती वाढवली

व परस्पर सहकार्याच्या जोरावर महायुद्धांत यश मिळवलें. १९४५ पर्यंत या तीन राष्ट्रांचें संबंध किती जवळचे होते तें सुरवातीसच सांगितलें आहे.

## दुसऱ्या महायुद्धांतील बदल

दुसऱ्या महायुद्धाच्या काळांत आर्थिक व राजकीय परिस्थितींत मोठे बदल घडून येत होते. विशेषत: युरोपांत जेव्हां एकामागून एक राष्ट्रें हिटलरी अंमलांतून मुक्त होऊं लागलीं तेव्हां त्या त्या राष्ट्रांतील जनतेच्या पुढाऱ्यांनीं देशाची आर्थिक व सामाजिक व्यवस्था जास्तजास्त जनताभिमुख करण्याचा प्रयत्न सुरू केला. इतके दिवस फॅसिस्ट राजकर्त्यांनीं दडपून टाकलेले समाजवादी पक्ष पुन्हा प्रकट होऊं लागले व जनतेनेंहि त्यांना आपला पाठिंबा असल्याचें निवडणुकांच्या द्वारें जाहीर केलें. ऑस्ट्रिया, हंगेरी, बल्गेरिया, रुमानिया, युगोस्लाविया, पोलंड, फिन्लंड, इत्यादि राष्ट्रांत सोव्हिएट रशियाच्या मदतीनें नियोजित आर्थिक व्यवस्थेचा पुरस्कार करण्यांत आला. या व्यवस्थेंत देवाण-घेवाणीला वाव असला तरी त्यांतून एका देशांतील भांडवलदारांना दुसऱ्या देशांतील जनतेचा व नैसर्गिक संपत्तीचा आपल्या फायद्यासाठींच केवळ उपयोग करतां येत नाहीं. देवाण-घेवाण ही परस्परांस हितप्रद झाली पाहिजे. परदेशी भांडवल कर्ज म्हणून या देशांत येऊं शकेल व त्या कर्जावर कराराप्रमाणें व्याजहि देण्यांत येईल; परंतु भांडवलाबरोबरच आर्थिक नियंत्रणांत कांहीं राखीव हक्क धनकोनें मागितल्यास ते मात्र मिळणार नाहींत. म्हणजेच रीतसर व्याजापलीकडे ‘फायदा’ म्हणून उत्पादनाचा कांहीं भाग मिळण्याची शक्यता उरणार नाहीं. उलट, एखाद्या मागासलेल्या देशांत आपल्या हुकुमतीच्या जोरावर परकीय भांडवलदारांस आपल्या सोयीप्रमाणे उत्पादनाची आणखी वाढ करतां येते व त्यांतून जास्तींत जास्त फायदा काढतां येतो. या दृष्टीनेच पश्चिमेकडील भांडवलशहा आपलें भांडवल गुंतविण्यास सोयीचे प्रदेश मिळविण्यासाठी धडपडत असतात. आणि युरोपांत असें पुष्कळच भांडवल

गुंतविण्यास अवसर होता. त्याप्रमाणें वर उल्लेख केलेल्या देशांत मिळून १९३१–३२ सालीं १७४८ कोटि सुवर्ण फ्रांक इतकें परदेशी भांडवल गुंतलें होतें. आणि त्या भांडवलाच्या जोरावर तेथील आर्थिक व्यवस्थेंतहि भांडलदार देशांना हस्तक्षेप करतां येत असे.

## पोलंडमधील परकीय भांडवलशाही

उदाहरणार्थ, आपण पोलंड देशाची परिस्थिति बघूं. १९३७ सालीं पोलंडमध्यें असलेल्या १०६६ भागीदारी पद्धतीच्या मोठ्या कंपन्यांपैकीं ३९१ कंपन्यावर परदेशी भांडवलदारांचा ताबा होता; आणि या सर्व कंपन्यांतील एकंदर भांडवलापैकीं ६३ टक्के भांडवल परदेशी होतें. तसेंच महत्त्वाच्या उद्योगधंद्यांत परदेशी भांडवलदारांचें भांडवल व अर्थात ताबा पुढील आंकड्यांवरून दिसून येईल:—

| | | |
|---|---|---|
| खनिज उत्पादन... | ६३ | टक्के. |
| पेट्रोल ,, ... | ८९.९ | ,, |
| रासायनिक ,, ... | ९० | ,, |
| विजेवर चालणारीं यंत्रें... | ९० | ,, |
| वीज व पाणीपुरवठा ... | ९५ | ,, |
| कापड .... | ४० | ,, |

परदेशी भांडवलदारांची देशवार विभागणी केल्यास पुढील देश प्रमुख होते:—

| | | |
|---|---|---|
| फ्रान्स .... | २७.१ | टक्के |
| अमेरिका ... | १९.२ | ,, |
| बेलजियम् ... | १२.५ | ,, |
| स्वित्सर्लंड ... | ७.२ | ,, |
| ब्रिटन .... | ५.५ | ,, |

या आंकड्यांवरून पूर्व युरोपांतील १२ कोट लोकवस्तीचे देश दुसऱ्या महायुद्धानंतर भांडवलशाहीच्या चौकटींतून निघून गेल्यामुळें काय होणार आहे याची कल्पना येते. आज त्यांना सोव्हिएट रशियाचा पाठिंबा असल्यामुळेंच या देशांच्या अंतर्गत व्यवस्थेंत इतर बड्या राष्ट्रांना किंवा त्यांच्या हस्तकांना ढवळाढवळ करतां येत नाहीं. पण त्याचा परिणाम असा होणार आहे, कीं आधींच मर्यादित झालेल्या भांडवलदारांच्या बाजारपेठा जास्तच संकुचित होतील आणि ही भीतिच त्यांच्या सध्याच्या सोव्हिएट-विरोधामागें असली पाहिजे.

## उत्पादनशक्तीची वाढ व तिचा उपयोग

गेल्या महायुद्धापेक्षांहि अनेक पटींनी जास्त वाढ आज भांडवलशाही राष्ट्रांच्या उत्पादनशक्तींत झालेली आहे. नुसत्या अमेरिकेचें उत्पादन युद्धाच्या काळांत दुपटीनें वाढलेलें आहे. गेल्या सहा आठ महिन्यांत अमेरिकेमध्यें आर्थिक अरिष्टाचीं चिन्हें स्पष्ट दिसूं लागलीं आहेत. सोविएत रशियांतील प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ ई. वर्गा याने अमेरिकेंत येऊं पाहणाऱ्या या आगामी आर्थिक अरिष्टांची कांहीं पूर्व चिन्हें दिलेलीं आहेत. हीं पूर्व चिन्हें तीन प्रकारचीं आहेत. (१) अमेरिकेंतील कारखाने व घाऊक आणि किरकोळ व्यापारी संस्थांमधील मालाचे साठे ऑगष्ट १९४६ मध्यें ४०० कोटी रुपयांनी वाढलेले आहेत. अमेरिकेच्या व्यापार खात्याने याबद्दल भीतीचा इशारा दिलेला आहे. (२) मागल्या वर्षीच्या ऑक्टोबर महिन्यांत देवाणीकरतां विकल्या जाणाऱ्या कच्च्या मालाच्या किंमती बऱ्याच प्रमाणांत घसरल्या. (३) गेल्या वर्षीच्या मे महिन्यापासून उद्योगधंद्यांच्या संस्थांच्या शेअर्सचे भाव मोठ्या प्रमाणांत खालीं येऊं लागले. मे पासून सप्टेंबर पर्यंत न्यूयॉर्कच्या शेअर बाजारांत ह्या सर्व शेअर्सच्या किंमतींत एकंदर ७५०० कोटी रुपयांची घट झाली. पूर्वीच्या काळचा असा अनुभव आहे कीं अशा तऱ्हेची प्रचंड घट आर्थिक अरिष्टांच्या पूर्वी साधारणपणें वर्ष दीड वर्ष आधीं घडून येते. प्रो. ई. वर्गाच्या अंदाजाप्रमाणें १९४८

सालच्या सुरवातीपर्यंत व कदाचित त्याचे आधींसुद्धां अमेरिकेंत आर्थिक अरिष्ट येऊन जागतिक मंदीला सुरवात होईल.

इंग्लंडमध्यें जरी अजून आर्थिक घडी पूर्व स्थितीवर आलेली नसली तरी युद्धापूर्वींपेक्षां कितीतरी अधिक प्रमाणावर उत्पादन करण्याची शक्ति त्या देशांतील उत्पादन-साधनांत आहे. एकीकडे वाढलेली उत्पादनशक्ति आणि दुसरीकडे संकुचित होणाऱ्या बाजारपेठा ! अशी विसंगति निर्माण झाल्यामुळें आणि समाजवादी विचारसरणीचा फैलाव म्हणजे ही विसंगति अधिकच तीव्र होण्याचा मार्ग अशी निश्चिति असल्यामुळें रशियासारख्या समाजवादी आणि प्रबल राष्ट्राविरुद्ध जोरांत प्रचार सुरू झालेला आहे. आज फक्त पूर्व युरोपांतील राष्ट्रेंच भांडवलशाहीच्या पकडींतून सुटत नसून इराण, चीन वगैरे-मध्येंहि भांडवलशाहीविरोधी आघाडी झपाट्याने निर्माण होत आहे व त्यास रशियाची सहानुभूति मिळणेंहि अपरिहार्य आहे. त्यामुळें मागासलेल्या देशांच्या औद्योगीकरणाच्या निमित्ताने तेथें आपलें भांडवल गुंतविण्यास व त्यापासून फायदा काढण्याची संधि मिळावी अशी जी भांडवलदार–प्रमुखांची इच्छा, तिलाहि धक्का बसलेला आहे. शिवाय आज मागासलेल्या देशांची खरो-खरीच औद्योगिक प्रगति झाल्यास उद्यां हेच देश आपल्या मालाशीं चढाओढ करतील व मग आपला मार्ग अधिकच बिकट होईल याची जाणीव असल्या-मुळें या औद्योगीकरणाच्या किल्ल्या आपल्या हातीं ठेवण्याची भांडवलदारी राष्ट्रांची धडपड चालू आहे. म्हणूनच औद्योगीकरणांत शेती-सुधारणा, रस्ते बांधणें इत्यादि गोष्टींना प्राधान्य देण्यांत येत असून यांत्रिक उद्योगधंद्यांना व विशेषतः यंत्रनिर्मितीच्या कारखान्यांना दुय्यमतिय्यम स्थान देण्यांत येत आहे. ‘ मागासलेल्या देशांतील जनतेचें राहणीचें मान वाढवें, ’ यापेक्षां ‘ आपला फायदा अव्याहत चालू रहावा ’ हीच भांडवलशाही व्यवस्थेची प्रेरक शक्ति असल्यामुळें तिला मानवेल एवढेंच ‘ औद्योगीकरण ’ करण्याची तयारी दाखविली जाईल यांत शंका नाहीं.

## सोव्हिएटची आडकाठी

सोव्हिअेट रशियाचें वजन जितक्या प्रमाणांत वाढेल तितक्या प्रमाणांत समाजवादी विचारसरणीहि वाढेल व भांडवलशाहीची अधिकच तारांबळ उडेल. ही गोष्ट स्पष्ट दिसत असल्यामुळें सोव्हिएट रशियाविरुद्ध लोकमत निर्माण करण्याचा आटोकाट प्रयत्न होत आहे. विशेषतः युद्धकालांत सोव्हिएट रशियाविषयीं सामान्य जनतेंत बरीच सहानुभूति निर्माण झाल्यामुळें व आजच्या सत्ताधाऱ्यांना सामान्य जनतेचा पाठिंबा मिळाल्याशिवाय आपलें धोरण यशस्वी होईल अशी खात्री नसल्यामुळें सोव्हिअेट रशियाशीं मैत्री कायम ठेवण्याचे प्रयत्न चालू असल्याचा एकीकडे आभास निर्माण करण्यांत येत असून दुसरीकडे रशियाच्या प्रत्येक हालचालीमागें साम्राज्यपिपासा आहे असें दाखविण्यांत येत आहे. वास्तविक पाहतां आपलें आर्थिक व राजकीय साम्राज्य सबंध जगभर प्रस्थापित करणाऱ्या इंग्लंड, अमेरिका व फ्रान्स या राष्ट्रांनीं 'रशिया साम्राज्यवादी बनत आहे' अशी हाकाटी करावी हें हास्यास्पद आहे. परंतु साम्राज्यशाहीविषयीं तिटकारा आणि समाजवादाची गोडी मोठ्या प्रमाणांत जनतेमध्यें निर्माण झालेली असल्यामुळें समाजवादाचें प्रतीक जें रशिया त्यालाच 'साम्राज्यवादी' म्हणून संबोधण्यांत रशियाबरोबरच समाजवादाविषयींहि जनतेंत संशय निर्माण करण्याचा प्रयत्न चालू आहे.

पूर्व युरोपांतील बाल्टिक व बाल्कन राष्ट्रें तर भांडवलशाहींतून फुटलींच; आतां निदान जर्मनी, इटली व मध्यपूर्वेतील राष्ट्रें, तसेंच चीन व आग्नेय आशियांतील प्रदेश आपल्या भांडवलासाठीं मोकळे असावेत अशी अँग्लो-अमेरिकन मुत्सद्यांची इच्छा आहे. पण तेथेंहि रशिया आड येतो असें दिसतांच रशियाविरुद्ध येनकेनप्रकारेण गैरसमज पसरविण्याचा सपाटा चालविला जात आहे. आज चालू असलेल्या जागतिक परिषदांत रशिया व रशियाशीं साथ करणारी राष्ट्रें इतर भांडवलशाही राष्ट्रांच्या मानानें अल्पसंख्यच आहेत. त्यामुळें साध्या बहुमताच्या जोरावर आपण मात करूं अशी

पश्चिमेकडील राष्ट्रांना खात्री आहे. उलट पॉट्सडॅम परिषदेपर्यंत बड्या-राष्ट्रांनीं घेतलेल्या सर्व निर्णयांत प्रत्येक महत्त्वाच्या बाबतींत बड्या राष्ट्रांत एकमत झालें पाहिजे असें ठरविलें आहे. किंबहुना बहुमताच्या वरवंट्या-खालीं आपण भरडलों जाणार नाहीं अशी रशियाची खात्री करून देण्यास व त्या जोरावर जागतिक प्रश्न सोडविण्याच्या कामीं रशियाचें सहकार्य संपादन करण्यास या निर्णयांनीं मदत झाली ; मात्र असें असतांना साध्या बहुमतानें प्रश्न निकालांत काढावे म्हणजेच 'रशियाच्या पसंतीची आम्हांस आतां आवश्यकता नाहीं,' किंवा 'आमची इनामदारी टिकविण्यासाठीं रशियाची नापसंति पत्करावीच लागेल' अशी विचारसरणी पसरूं लागली आहे. शिवाय तात्त्विक दृष्ट्या लोकशाहीच्या तत्त्वाचा आपण अवलंब केला ; पण रशियानें त्यांत मोडता घातला, असा प्रचार करणेंहि त्यामुळें सोपें झालेलें आहे.

## अमेरिकेचें धोरण

समाजवादी विचारसरणीच्या प्रसाराचा विशेष परिणाम आज अमेरिकेवर होत आहे. युद्धकालांत वाढलेल्या प्रचंड उत्पादनशक्तीला वाव मिळण्यासाठीं अमेरिकेस परदेशी बाजारपेठांची अत्यंत जरूर आहे ; परंतु राजकीय साम्राज्याच्या अभावीं अमेरिकेस आपल्या मालासाठीं हक्काचें गिऱ्हाईक मिळालेलें नाहीं. आज कर्जाच्या रूपानें जरी प्रत्येक प्रमुख देश अमेरिकेची मदत घेण्यास तयार असला तरी युद्धामुळें विसकटलेली आर्थिक घडी परत बसविल्यावर तो आपापल्या साम्राज्यांतील बाजारपेठा आपल्याच ताब्यांत ठेवण्याची खटपट करणार याची अमेरिकेला पूर्ण जाणीव आहे. म्हणून अलीकडे जीं मोठमोठीं कर्जें अमेरिकेने या देशांना देऊं केलीं आहेत, त्या कर्जांबरोबरच 'खुला व्यापार' राखिला जाईल अशा तजविजीने त्यांवर अटीहि लादलेल्या आहेत. शिवाय चीनसारख्या अजून औद्योगिक प्रगतीस व अर्थातच भांडवल गुंतविण्यास वाव असलेल्या देशांत अमेरिका आपलें वर्चस्व प्रस्थापित करण्याचा निकराचा प्रयत्न करीत आहे. पण तेथें अमेरिकेनें

हाताशीं धरलेल्या ‘ राष्ट्रीय ’ सरकारला कम्युनिस्टांचा विरोध असल्यामुळे अमेरिकेच्या तेथील आर्थिक प्रगतीस जरूर असणारी शांतता व स्थैर्य प्राप्त होत नाहीं. चीनच्या सरहद्दीवरच रशिया असल्यामुळें व रशियाचें धोरण आणि चिनी कम्युनिस्टांचें धोरण परस्परपूरक असल्यामुळे रशियाचें वजन जितकें कमी होईल तितकी अमेरिकेची प्रगति झपाट्यानें होईल असा सरळ हिशेब आहे.

## सोव्हिएट-विरोधाचा पाया व ध्येय

कोणत्याहि मार्गानें भांडवलशाही टिकविण्याचा अट्टाहास अमेरिका व इतर राष्ट्रें यांनीं केल्यास त्या व्यवस्थेंत निर्माण झालेल्या विसंगतीमुळें रशियाविरुद्ध शस्त्र उपसून आपल्या आर्थिक क्षेत्रमर्यादा वाढविणें त्यांना जरूर पडेल. पण गेल्या युद्धांतील रशियन कामगिरीमुळें रशियाशीं युद्ध पुकारणें ही गोष्ट तितकी सोपी राहिलेली नाहीं. त्यासाठीं रशिया विरुद्ध लोकमत तयार करीत राहिलें पाहिजे व एकंदर जागतिक शांततेला रशिया हा धोका निर्माण करीत आहे अशी खात्री करून दिली पाहिजे. त्यासाठीं रशियाच्या प्रत्येक कृतीचा विकृत अर्थ लावण्यांत येत आहे. या कामीं भांडवलशाहीच्या वर्चस्वाखालीं असलेल्या वर्तमानपत्रांचा चांगलाच उपयोग होत आहे. आणि इंग्लंड-अमेरिकेंतच नव्हे, तर जेथें जेथें भांडवलशाही-प्रधान समाजव्यवस्था आहे तेथें तेथें रशियाविरोधाचें जणू पेंव फुटलें आहे असें दिसतें. कारण आज ‘ रशियाची सरशी म्हणजे भांडवल शाहीची पीछेहाट ’ अशी परिस्थिति असल्यामुळें इतर अनेक मुद्यांवर मतभेद दर्शविणारे भिन्नदेशीय वृत्तपत्रकार रशिया विरोधाच्या भूमिकेवर एकत्र आलेले आपण पाहतों. युद्धसमाप्तीनंतर नव्यानें सुरू झालेल्या रशिया-विरोधाची आर्थिक कारणमीमांसा ही अशी आहे.

■

# कारंज्याजवळील सफरचंद

ले. **निकोलाय तिखोनोव** अनु. **शशिकान्त पुनर्वसु**

आसराघरांतले दिवे एकदम मालवले. त्यानंतर लागलीच सगळीकडे खुर्च्या आणि बाकं सरकवल्यामुळं होणारी खटरफटर ऐकूं आली, माणसांच्या आरडाओरडीचाहि आवाज त्यांत मिसळला. त्यानंतर कुणीतरी मोठ्यानं उच्चारलेले शब्द ऐकूं आले—

"लोकहो! शांत रहा! आपापल्या जागा सोडूं नका! भिण्याचं कांहीं कारण नाहीं."

यानंतर पुन्हां सगळीकडे स्थिरस्थावर झाली. भोंवतालीं दाट अंधार होता. हा विमानहल्ला कित्येक तास चालू राहिला होता. चित्रकार आपल्या स्टुलावर बसून राहिलेला होता. रेखाटन करायला जातांना हें स्टूल तो आपल्यावरोबर नेत असे. मोठं सुटसुटीत होतं तें. तीन पायांचं नि त्यानं स्वत:च बनवलेलं. एका बैठ्या घरांत तो राहत असे. महायुद्ध आणि क्रांत्या यांच्या फेऱ्यांतून बचावलेल्या पेट्रोग्राड विभागांतल्या अनेक घरांपैकीं तें एक होतं. त्याच्या त्या छोट्याशा घराच्या पुढच्या अंगाला इवलीशी बाग होती. त्या बागेत एक जुनं, फारशी दखलगिरी कुणीच न घेतलेलं, गंजलेल्या नळाचं नि शेवाळ्यानं व्यापलेला चौथरा असलेलं एक कारंजं होतं. त्याच्यावर आतां बर्फाचे दाट थर सांचले होते. पण आत्तां या क्षणीं त्या चित्रकाराच्या मनांत त्या छोट्या घराचे, त्याच्यापुढच्या त्या बागेचे आणि त्यांतल्या त्यांत त्या दुर्लक्षिलेल्या कारंज्याचे विचार येत नव्हते म्हटलं तरी चालेल.

त्याच्या भोंवतालच्या लोकांचं बोलणं, भीति, आश्चर्य इत्यादि भावना दाखवणारे उद्गार, लहान मुलांची रडारड, दरवाज्याची करकर, त्या या कर्णरंध्रांतून क्वचितच शिरत होती. सभोंवार काळाकुट्ट गडद अंधकार दाटून राहिला होता.

" लेनिनग्राड शहर सोडून आपण पूर्वीच जायला पाहिजे होतं "-कुणीतरी चिडून काढलेले उद्गार त्याला ऐकूं आले. त्याच्या मनांत विचार आला, " बरोबर ! अगदीं बरोबर ! मी गेलों नाहीं, केवढा वेडेपणा झाला हा माझा ! तसं केल्यानं कांहीं भ्याडपणा पदरीं आला नसता आपल्या ! " त्याचं काम भित्तिपत्रकं काढण्याचं होतं. त्याची भित्तिपत्रकं चांगलीच लोकप्रिय झालीं होतीं आणि रस्त्यांवरून, क्लबांमधून नि आघाडीवरच्या भुई-घरांतून ( Dug out ) त्यांचा सार्वत्रिक प्रसार होत होता. पण त्याकरतां त्याला लेनिनग्राडमधें राहण्याची कांहींच जरूरी नव्हती. आणखी एक गोष्ट अशी कीं इथं परिस्थिति इतकी बिकट झालेली होती, कीं काम करणं जवळजवळ अशक्यच होतं. त्याच्या कलामंदिरांत गारठा फारच पडे, बोटं गारठून जात, त्यामुळें हातांत पेन्सिल धरणं मुष्कील होऊन जाई आणि खोलींतल्या शेगडींतून उष्णता मिळे ती अगदींच अपुरी पडे. अंगांत ऊब आणण्याचं दुसरं कोणतंच साधन त्याच्यापाशीं नव्हतं. त्याचं घर छोटेखानी, त्यामुळें साहजिकच त्यांत आसराघर नव्हतं आणि म्हणून ज्या ज्या वेळीं वैमानिक हल्ल्याचा इशारा मिळे, त्या त्या वेळीं त्याला शेजारच्या मोठ्या इमारतींतल्या आसराघराकडे धाव घ्यावी लागे. त्याला सर्दी सपाटून झाली होती, थकवा आला होता, खोकल्याची उबळहि मधून मधून जोरांत येत होती नि कित्येक दिवसांत पोटभर जेवण त्याला मिळालं नव्हतं. त्याचे सांधेहि धरले होते कीं काय कुणास ठाऊस ! निदान तसलाच कांहींतरी विकार त्याला होता खास. कारण, आपल्या घरापासून चित्रकार मंडळापर्यंतचं अंतर तोडणं त्याला आतांशा अति कष्टदायक होई. भाड्याच्या गाड्याहि बंद पडल्या होत्या आणि आतां तर दिव्यांची ही स्थिति....गोष्ट मोठी होती अशांतला भाग नाहीं. पण वोल्गा नदीपर्यंत गेलं कीं काम भागत होतं. " तिथं आपल्याला प्रकाशानं उजळलेलीं गांवं, ऊबदार खोल्या, भरपूर अन्न, सारं कांहीं मिळालं असतं. आपल्या बरोबरीचे लोक योग्य त्या वेळींच मागं गेले, ते नाहीं का आरामांत राहत ? आपण मात्र या अंधारांत, थंडीच्या कडाक्यांत भुकेनें तडफडत

राह्यलों आहोंत. त्यांतून डोक्यांत एकाद वेळीं बाँबगोळा पडला म्हणजे मरलोंच शंभर वर्षं! छे छे! आपण सर्वांच्या बरोबर त्याच वेळीं नाहीं गेलों, केवढा गाढवपणा झाला हा आपला!"

मधून मधून सारी इमारत खालपासून वरपर्यंत हादरून निघे. एक क्षण-भर सर्वत्र स्तब्ध होई. नंतर पुढल्याच क्षणीं एकदम कोलाहल माजे. मग हळूहळू सगळीकडे स्थिरस्थावर होई. त्या चित्रकाराला भोंवतालचा अंधार क्षणाक्षणाला दाट होत आहे असा आतां भास होऊं लागला. त्याची वेळेच्या गतीची भावनाहि नाहींशी झाली. या आसराघरांत त्यानं संध्या-काळच्या सुमारास प्रवेश केला होता. आतां रात्र बरीच झाली असली पाहिजे. या विमानहल्ल्याची लांबण काय भलतीच लागली हा! आणखी एक बाँबगोळ्याचा स्फोट, धुम्म्...अणखी एकदां धुम्म्!...पुन्हां एकदां धुम्म्!....या बाँबगोळ्यांचा बाहेर नुसता पाऊस पडत असला पाहिजे. आपल्या या लाडक्या नगरीची काय दुर्दशा झाली ही! नुसतं मनांत आलं तरी दुःखाचे कढ अनावर होतात, डोळ्यांशीं अश्रु सांकळून येतात, मनावर विषण्णतेचं अनिवार पटल येतं. आणखी थोड्याच वेळांत या विमानहल्ल्याचा धोका संपल्यानंतर "सब ठीक"चा भोंगा वाजेल, आपण रस्त्यावर जाऊं नि आपल्याला त्या वेळीं कोणतीं दृश्यं बघावीं लागतील? नवीनच उध्वस्त झालेलीं घरं, पडझड नि आगीचे लोळ आपल्याला सर्वत्र दिसतील. निर-निराळ्या बिऱ्हाडांतले बिछाने, कपडे, कपाटं, तुळयांमधून अडकून अधांतरीं टांगत, लोंबकळत राह्यलेलीं दिसतील. ढांसळून पडलेल्या भकास भिंती आणि त्यावरच्या उघड्यावर आलेल्या तसबिरी...अशाश्वत आणि क्षुद्र अशा मानवी जीविताची दुःखदायक आठवण करून देणारीं हीं दीनवाणीं प्रतीकंच नव्हेत तर काय! अरेरे...!

कोपऱ्यांत कुठंतरी एक मूल किरकिरूं लागलं. अंधारांतल्या अंधारांत तो चित्रकार त्या रडणाऱ्या मुलाची मुद्रा मनश्चक्षूंपुढं रेखाटूं लागला. डोळे

उघडे, अश्रूंनीं भरलेले, बालिश चर्या...त्याला आधीं झोप लागलेली असली पाहिजे आणि जाग आल्यामुळें भीतीनं अंधारांत तें रडूं लागलं असलं पाहिजे. असल्या या आसराघराचंच रंगचित्र तयार करावं काय? काय हरकत आहे? मेणबत्त्यांचा मंद प्रकाश सभोंवार पडला आहे. थरथरत्या ज्योतींचा प्रकाश आजूबाजूच्या लोकांच्या तोंडावरून चढतउतरत आहे, भिंतीवरच्या काळ्या सावल्या, चिंताग्रस्त चेहरे, विरलेले थंडीचे कोट अंगाभोंवतीं कसेतरी लपेटून घेतलेल्या म्हाताऱ्या बायका, कोपऱ्यांत जाऊन हलक्या आवाजांत बोलत राहिलेलीं तरुण कोंवळीं पोरं, हृदयाशीं बिलगलेल्या आपल्या मुलांना घट्ट कवटाळून धरणाऱ्या तरुण माता...

काळ तर मोठा विलक्षण आलेला आणि चित्रकलेवर त्याचबरोबर जबाबदारीहि केवढी मोठी पडलेली! आज जर पूर्वींचे श्रेष्ठ चित्रकार जिवंत असते तर त्यांनीं या विलक्षण काळांत सगळीकडे व्यापून राहिलेल्या विषाद आणि भव्यता यांचं चित्रण किती सफाईनं केलं असतं! उदाहरणार्थ, चित्रकारांचा कुलगुरु गोया यानं आपल्या स्थिर आणि कसलेल्या हातानं लेनिनग्राड ठळकपणानं रेखाटलं असतं, आपल्या रेखाचित्रांखालीं त्यानं आपली सही करून तिथं मजकूर लिहिला असता "हें सारं मी प्रत्यक्ष बघितलेलं आहे..."

एवढ्यांत जिन्यावर दिवा लकाकला. दारं उघडलीं आणि त्यांमधून सबठीकचा भोंगा वाजत असलेला ऐकूं आला. संपला म्हणायचा विमानहल्ला एकदांचा!

त्या चित्रकारानं बाहेर पडायची गडबड केली नाहीं. अंधारांतली ती दाट गर्दी अरुंद दरवाजांतून बाहेर पडेपर्यंत त्यानं वाट बघितली आणि अगदीं हाताला गार लागत असलेल्या भिंती चाचपडत तो बाहेर पडला.

रस्त्यावर आल्याबरोबर आपल्याला नवीन झालेली पडझड दिसून येईल आणि थोडंसंच अंतर ओलांडून आपल्याला आपलं छोटं घर गांठायचं

असलं, तरी त्या पडझडीच्या वरून आपल्याला अडखळतच जावं लागणार हें निश्चित, या विचारांतच तो चित्रकार बाहेर पडला.

पण बाहेर पाऊल टाकल्याबरोबर परमावधीच्या आश्चर्यानं त्याच्या मनाचा पार गोंधळ उडून जाऊन तो जागच्या जागींच थबकला.

हिरवटसर निळसर रंगाच्या आकाशांत मेंढ्यांच्या कळपाप्रमाणं दिसणारे शुभ्र ढगांचे पुंजके इतस्ततः विखुरले होते. वातावरणांतल्या थंडींत सूक्ष्म धुक्याचं विरळ पटल सर्वत्र पसरलेलं होतं, त्यामुळंच कीं काय कुणास ठाऊक, चंद्राला जांभळट निळसर रंग आला होता आणि त्याच्या शीतल आणि उज्ज्वल प्रकाशांत सारी सृष्टि नखशिखान्त न्हाऊन निघाली होती. थंडी आणि प्रकाश यांनीं आकाश जणुं ओतप्रोत भरलेलं होतं; एका वखळीच्या पलीकडल्या अंगाला उंच इमारती होत्या, त्यांच्या एरवीं रुक्ष वाटणाऱ्या भिंती आतां पंचधातूंच्या ओतवून तयार केल्यागत वाटत होत्या. पाऊल पडतांना प्रत्येक वेळीं हिमाचा मऊ थर किती नाजुकपणानं चुरला जात होता! रस्त्याच्या दोन्ही अंगांला इतस्ततः कमीअधिक सांचलेल्या हिमाच्या राशींवर जणु मखमलीचीं आच्छादनं वाटावींत अशा निळ्या सावल्या पडल्या होत्या. आणि इतर वेळीं अगदींच सामान्य वाटणाऱ्या पण आतां चंद्रप्रकाशांत तळपणाऱ्या रस्त्याची भव्य शोभा तर काय अवर्णनीय होती!

आपल्या घराकडे त्या चित्रकारानं पावलं वळवलीं. पण छे! त्याला आपलं घर ओळखूंसुद्धां येईना. स्वप्नसृष्टींतल्या एखाद्या विलक्षण उपवनांत आपण वावरतों आहोंत असा त्याला भास झाला. त्यांतल्या झाडांझुडुपांवरून हिमसेकाचा तीन तीन बोटं जाड थर सांचला होता. त्यांची प्रत्येक टापी कुणातरी अजब कलाकारानं आपलं सर्वस्व खर्चून घडवली असावीसं वाटत होतं. मंद प्रकाशाचे झोत इतस्ततः झळाळवीत त्या चमचमत होत्या. वृक्षाग्रांवर कसल्या तरी विलक्षण रंगांचा लखलखाट होत होता, त्यांच्यावरचीं

हिमपुटं एरमाईन प्राण्याच्या शुभ्र कातड्यांच्या टोप्यांप्रमाणं वाटत होतीं. जणु साऱ्या वृक्षांनीं कुठल्या तरी भव्य नृत्यसमारंभासाठीं असे हे निरनिराळ्या रंगांचे पोषाख केले होते आणि ते थोड्याच वेळांत एकमेकांच्या हातांत हात घालून त्या चित्रकारासभोंवतीं फेर धरून नाच करणार होते नि नाच करतां करतां पांचू, हिरे, वैडूर्य, पुष्कराज इत्यादि रत्न सर्वत्र भिरकावणार होते...

आणि या स्वर्गीय उद्यानांतील मध्यभागीं आपल्या मनोरम ऐश्वर्यानं भान हरपून टाकणारा एक वृक्ष खडा उभा होता. इतर वृक्षांवर भरून राहिलेली चमक, तेज, टिकल्या, पांचू, पुष्कराज इत्यादिकांची वारेमाप खैरात या ठिकाणीं शतपटींनीं वाढलेली दिसत होती. एवढंच नव्हे, तर या वृक्षावर साऱ्याच गोष्टी इतक्या परिपूर्ण अवस्थेला पोंचल्या होत्या, कीं त्या कला-कुसरींत मानवी कौशल्यानें वांटा उचललेला असणं अशक्यप्रायच होतं. तें सारं झाड कुठल्या तरी अतर्क्य पण शीतल तेजानं प्रज्वलित झालं होतं. जणुं पांढऱ्या शुभ्र आगटींतून गार गार ज्वालांचे लोळ लळलळत बाहेर पडत होते नि त्यांच्या डोळे दिपवून टाकणाऱ्या नृत्यांत क्षणभरहि खंड पडत नव्हता.

आश्चर्यमूढ होऊन तो चित्रकार विचारांत गढून गेला. ती जागा त्याला ओळखीची वाटेना. या अनोळखी बागेंत आपण कसें काय आलों ? आणि कुठली आहे बरं ही बाग ? या विचारांनीं त्याचं मन गुंग होऊन गेलं.

आजूबाजूला त्यानं दृष्टि टाकली. रस्त्यावरून लोकांची ये-जा सुरू झाली होती. तरुणतरुणींचं हृदयस्पर्शी हास्य आणि पायांखालीं चुरल्या जाणाऱ्या हिमाचा मृदु आवाज ऐकूं येत होता. आपल्या माथ्यावरची टोपी त्यानं काढली आणि डोळे मिटून क्षणभर तो स्तब्ध उभा राहिला. नंतर मग त्याचीं ज्ञानेंद्रियें भानावर आलीं. डोळे उघडल्यानंतर आपण पृथ्वीतलावर परत आल्याचा त्याला भास झाला. आणि यानंतर तर आपण आपल्याच बागेंत असून हिमाच्या आवरणाखालीं झांकलेल्या आपल्या कारंज्याच्याच दिशेनं आपलीं पावलं पडत आहेत हें त्याच्या ध्यानांत आलं. मग वाटेंत आपल्याला

बागेभोंवतालचं कुंपण कसं नाहीं लागलं ? त्या कुंपणाचा पार धुव्वा उडाला होता. बॅांबच्या स्फोटाच्या जोराच्या झोतानं तें पार उखडून गेलं होतं. नि त्याच्या जुन्या कुजक्या लाकडी फळकुटांची पार दुर्दशा होऊन ती रस्त्याच्या पलीकडे दूर अंतरावर भिरकावलीं गेलीं होतीं. आणि डोळे दिपविणारं सौंदर्य धारण करणारं तें झाड म्हणजे दुसरं तिसरं कोणतंच नसून त्याच्या बागेतल्या कारंज्याजवळचा कधींही डोळ्यांत न भरणारा तो सफरचंद होता. त्याचं स्वतःचं इवलंसं घरकुल पलीकडेच शांत पहुडलं होतं.

त्यानं आजूबाजूला पुन्हा बघितलं. मध्यरात्रींच्या निळ्या जांभळ्या चंद्राच्या शीतल प्रकाशांत सारी नगरी न्हाऊन निघाली होती. अवर्णनीय आणि असामान्य सौंदर्य धारण करून सारी नगरी त्याच्या सभोंवार भव्यपणानं मान ताठ करून उभी होती.

जणु नवीनच जीवन लाभल्याप्रमाणें तो त्या नगरीकडे एकाग्र दृष्टीनें पाहूं लागला. वैमानिक हल्याच्या आसराघरांत त्याचं मन ज्या विषादपूर्ण विचारांनीं व्यापलं होतं, ते विचार आतां कुठल्याकुठं लोपून गेले. सौंदर्य, शौर्य, पराक्रम आणि वैभव यांनीं शिगोशीग भरलेल्या या विश्वाचा त्याग करून निघून जायचं ?

छे छे ! शक्यच नाहीं !

शरिरांतून शेवटचा श्वास बाहेर पडतो आहे किंवा देहांत रक्ताचा शेवटचा बिंदु शिल्लक आहे, तोंपर्यंत आपल्या या नगरीचं संरक्षण झालंच पाहिजे. तिच्या परिसराजवळ येऊन ठेपलेल्या शत्रूला रानोमाळ पिटाळून लावायला पाहिजे, त्याचा पुरा नायनाट करून टाकला पाहिजे. हें स्थान सोडून निघून जाणं ? छे ! तो विचारच नको ! आणि हे विचार मनांत साकळून येऊन तो चित्रकार किती तरी वेळ त्या देखाव्याकडे अनिमिष नेत्रांनीं पाहत उभा होता ! आनंद, आश्चर्य, हर्ष, अभिमान या भावना त्याच्या हृदयांत सामावत नव्हत्या. ..

■

# सोव्हिएट शाळा

## लेखिका सौ. प्रभावती जोशी

आज चोहोंकडे समाजाच्या विचारवंत नेत्यांचें लक्ष युद्धोत्तर जगाच्या रचनेकडे लागलेलें आहे. शैक्षणिक दृष्ट्या आवश्यक अशीं नवीं ध्येयें व नव्या कल्पना आज पुढें येत आहेत. आपल्या देशांतहि शिक्षण-विषयक अनेक योजनांचा साधकबाधक विचार होत आहे. अशा वेळीं सोव्हिएट रशियांतील प्रचलित शिक्षणकार्याचें स्वरूप समजून घेणें हितावह ठरणार आहे.

या राष्ट्रांतील शैक्षणिक दृष्टिकोण अत्यंत प्रगमनशील आहे आणि त्याचा उपयोग आपल्या शैक्षणिक पुनर्रचनेंत होणें अत्यावश्यक आहे. शिक्षण-क्षेत्रांतील ही प्रगति रशियानें अवघ्या एक पिढींत केलेली आहे ही गोष्ट विशेष नमूद करण्यासारखी आहे. स्वतःचा अभ्युदय करूं पाहणाऱ्या हिंदुस्थानसारख्या अनेक देशांना रशियांतील शैक्षणिक प्रयोगांची माहिती असणें जरूर आहे. बेसुमार लोकसंख्या, निरक्षर बहुजनसमाज, दारिद्र्य वगैरे पुष्कळच बाबतींत हिंदुस्थानचें रशियाशीं साम्य आहे. त्यामुळे रशियानें अल्पावधींत यशस्वीपणें साधलेली शिक्षणक्षेत्रांतील प्रगति हिंदुस्थानला मार्गदर्शक होण्यासारखी आहे.

रशियामध्यें प्रत्येक मुलाला आपल्या आयुष्याला उत्तम सुरवात करायला अवसर देण्यांत येतो. मुलांना सात्त्विक अन्न देऊन त्यांची सर्वतोपरी काळजी घेतात. पुरुषांच्या बरोबरीनें स्त्रियांनीं कामें करावींत या हेतूनें लहान मुलां-साठीं अनेक शिशुगृहें उघडलेलीं आहेत, या ठिकाणीं मुलांना भरपूर खाणें-पिणें मिळतें, रंगीत खेळणीं मिळतात आणि खेळायला सौंगडीही मिळतात. सौंदर्य, टापटीप, व्यवस्थितपणा वगैरे गोष्टींकडे या शिशुगृहांतून विशेष लक्ष पुरविण्यांत येतें. इतर देशांतील नर्सरी स्कूलचा फायदा श्रीमंतांच्या मुलां-

नाच पुरेपूर मिळतो, तर रशियांतील शिशु-शाळा गरिबांपासून थोरा पर्यंत सर्व दर्जाच्या आईबापांच्या मुलांसाठीं योजिलेल्या आहेत. बालकांचें पाळण्यांतील शिक्षण ही सोव्हिएट जीवनाच्या स्पृहणीय यशाची गुरुकिल्ली आहे असें म्हटलें तरी चालेल.

या शिशुगृहांत मुलें आनंदानें राहातात. येथील प्रत्येक मुलाला त्याच्या स्वतःच्या नांवाबरोबरच एकएक खूण असते. कुत्रा, फूल, एल्क वगैरे पशुपक्षी व झाडें आणि फुलें यांचीं नांवें मुलांना ठेवलेलीं असतात. मुलांच्या सर्व वस्तूंवर त्यांच्या विशेष नांवाच्या खुणा असतात. इतकेंच नव्हे, तर त्यांना आपापल्या वस्तु ठेवायला ठराविक स्वतंत्र जागा असतात. “ मुलाला जी गोष्ट स्वतः करतां येण्यासारखी आहे. ती त्याला कधींहि आयती देऊं नका !” असें या शिशुगृहांतील दारांवर मोठ्या अक्षरांत लिहिलेलें असतें. उदाहरणार्थ, एखादी वस्तु टेबलावर आहे, ती मुलाला हवी आहे, पण त्या वस्तूला त्याचा हात पोंचत नाहीं. अशा वेळीं साहजिकच ती वस्तु उचलून मुलाला देण्याचा मोठ्या माणसाला मोह होतो. पण तसें न करतां ती वस्तु मुलाला स्वतःला त्याच्या प्रयत्नानेंच घेऊं द्यावी. मग मुलानें स्टूल आणून त्यावर चढून ती घेतली तरी चालेल. किंवा उड्या मारून मिळवली तरी चालेल. त्यामुळें मुलाला स्वतःच्या बुद्धीचा उपयोग करून प्रयत्न करण्याचें शिक्षण मिळतें.

अनेक मुलें एकत्र मिळून एक खेळ खेळत आहेत असेंहि दृश्य येथें नेहमी पहावयास मिळतें. उदाहरणार्थ, घरें बांधण्याचा खेळ. निरनिराळ्या आकारांचे लहानमोठे ठोकळे केलेले असतात; ते घेऊन मुलें घरें बांधतात. त्या वेळीं कांहीं ठोकळे एकेका मुलाला उचलण्यासारखे नसतात; म्हणून अनेक मुलें एकदम एकच ठोकळा उचलून योग्य जागीं ठेवतात. अशा प्रकारच्या खेळांमुळें मुलांमध्यें मित्रत्वाचें नातें, सहकार्याची भावना उत्पन्न व्हायला मदत होते.

रशियामध्यें सध्या शिशुगृहांत लक्षावधि मुलें आहेत. ही शिशुगृहें कारखाने व शाळा यांच्याजवळ मुद्दाम बांधलेलीं आहेत. त्यामुळें आईला मुलापासून आपण दूर गेलों असें न वाटतां आपलें काम करतां येतें. फिरणें, गाणें म्हणणें, मातीच्या वस्तु तयार करणें, झोंपणें, खाणें, जेवणें, गोष्टी सांगणें वगैरेंसाठीं ठराविक वेळ आंखलेला असतो. आजारी मुलांची तर या शिशुगृहांतून विशेष काळजी घेतात. आईला आपल्या मुलाची काळजी करण्याचें त्यामुळें कारणच उरत नाहीं. कृश मुलांसाठीं पाऱ्याच्या शास्त्रीय दिव्यांची उपचारासाठीं योजना केलेली आहे. इतकेंच नव्हे, तर देवी काढवून घेणें वगैरेसारखीं महत्त्वाचीं कामेंहीं येथेंच करतात. त्याशिवाय मूल जर जास्त आजारी असेल तर शिशुगृहाच्या जोडलेल्या हॉस्पिटलमध्येंच त्याच्या मातेला सतत राहायलाहि परवानगी देतात. मातेला जेवणहि तेथेंच मिळतें. त्यामुळें माता आणि मुलें यांची या शिशुगृहामुळें ताटातूट होते कीं काय अशी शंकासुद्धां येण्याचें कारण उरत नाहीं.

लहान मुलांची आरोग्यदृष्ट्या व बौद्धिकदृष्ट्या जरी इतकी काळजी घेतात. तरी त्यासाठीं लागणारा बहुतेक सर्व खर्च सोव्हिएट सरकारकडून केला जातो, ही गोष्ट प्रामुख्याने लक्षांत ठेवण्यासारखी आहे. मात्र मुलाच्या जेवणाचा खर्च म्हणून दर महिना १२ ते ६५ रुबल्सपर्यंत पालकांच्या पगाराप्रमाणे त्यांना द्यावा लागतो. बाकीचा जास्त लागणारा सर्व खर्च यूनियनकडून केला जातो.

मुलाला चौथें वर्ष लागलें म्हणजे त्याला नर्सरी शाळेंत घालतात. स्वच्छता कशी राखावी, शिस्त कशी पाळावी, आणि टेबलावरील जेवणाची व्यवस्थित मांडणी कशी करावी वगैरे अनेक गोष्टी या नर्सरी शाळांतून शिकवतात. इतकेंच नव्हे. तर मुलाला सहावें वर्ष लागलें कीं वाचन आणि लेखन शिकविण्यास प्रारंभ करतात. नृत्य व संगीत यांची सुरवातसुद्धां या वयापासूनच करतात.

मुलांना आठवें वर्ष लागलें कीं तीं प्राथमिक शाळेंत प्रवेश करतात. सोव्हिएट शिक्षण आठ ते अठरा वर्षें वयाच्या मुलांमुलींसाठीं प्रथमतः योजलेलें असलें तरी तूर्त तें पंधरा वर्षे वयापर्यंतच्या सर्व मुलांमुलींसाठीं सक्तीचें केलेलें आहे. त्यांत जातिभेद तर मानीत नाहींतच ; पण मुलगे आणि मुली असाहि भेदभाव करीत नाहींत.

किंडरगार्टन पद्धतीचें शिक्षण झालेल्या किंवा घरच्या घरीं अक्षरओळख होऊन वाचन व अंक यांची माहिती झालेल्या मुलामुलींना या शाळेंत घेतात. ज्यांची इतकी प्राथमिक तयारी झालेली नसेल त्यांच्यासाठीं बालवर्ग असतो. कांहीं शाळा आळीपाळीच्या पद्धतीने चालतात. या योजनेमुळें एकाच शाळेंत एका वेळीं ३००० विद्यार्थि अभ्यास करूं शकतात. अशा प्रकारें जागा आणि वेळ या दोहोंचा योग्य उपयोग रशियांत केला जातो. राजे-रजवाडे यांचे जुने वाडे, त्याचप्रमाणें मोठमोठ्या जुन्या इमारती यांचा शाळांसाठीं सध्या उपयोग करीत आहेत. एकट्या मॉस्को शहरांत गेल्या कांहीं वर्षांत पांचशें नवीन शाळांच्या इमारती बांधल्या गेल्या आहेत. त्यांत प्रत्येकीं सुमारें एक हजार विद्यार्थि अभ्यास करीत आहेत.

रशियांतील सर्व दुय्यम शिक्षणाच्या शाळा एकाच प्रकारच्या असतात. तेथलि अभ्यासक्रम दहा वर्षांचा असतो. सोव्हिएट सरकारने निरनिराळ्या भाषांतून शिक्षण देणाऱ्या सुमारें सत्तर निरनिराळ्या भाषांतील शाळा जागो-जागीं स्थापन केलेल्या आहेत. अशाच प्रकारच्या एका अँग्लो-अमेरिकन शाळेंत मिस् लेव्हिन ह्या प्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञ विदुषीने १९३८ सालीं शिक्षिका म्हणून नोकरीस प्रारंभ केला. त्यामुळे नोकरी करतांनाच सोव्हिएट शैक्षणिक पद्धतीचें निरीक्षण करण्यास तिला भरपूर वाव मिळून त्या उपयुक्त पद्धतीचा अभ्यास करण्यात उत्तम संधि प्राप्त झाली व मिस् लेव्हिननेहि तिचा पुरेपूर फायदा घेतला. तिने १९४२ पर्यंत या शाळेंत काम केलें असल्यामुळें तिचे अनुभव आपल्या देशांतहि मार्गदर्शक होण्यासारखे आहेत.

ही शाळा मुख्यत: अँग्लो–अमेरिकन, असून इंग्लिश ही मातृभाषा असणाऱ्या विद्यार्थ्यांकरितांच होती. विशेषत: परदेशांतून तज्ञ होऊन स्वदेशीं आल्यावर मॉस्कोमध्यें काम करणाऱ्या पालकांच्या मुलांसाठीं आणि परदेशांतून परत आलेल्या सोव्हिएट नोकरवर्गाच्या मुलांसाठींच ही शाळा होती. या शाळेंतील सर्व शिक्षण इंग्रजीमधूनच देतात; तरीसुद्धां रशियांतील इतर कुठल्याहि शाळेसारखीच ही शाळा असून तेथील अभ्यासक्रम व क्रमिक पुस्तकेंहि त्या शाळेप्रमाणेंच असतात. वर्षाचा सबंध अभ्यासक्रम प्रत्येक विषयानुसार छापलेला असतो. शहरें आणि खेडीं यांच्यांत थोडासा मामुली फरक करून सर्व शाळांना एकच अभ्यासक्रम असतो. कुठल्याहि हेडमास्तरांना त्यांत बदल करतां येत नाहीं. प्रत्येक विषयासाठीं दर आठवड्यांत किती तास खर्च करावे हें निश्चित केलेलें असतें आणि शाळेच्या हेडमास्तरांनीं त्याप्रमाणें वेळापत्रकें करावींत अशी योजना असते. मात्र सोपे विषय शाळा सुटायच्या वेळीं ठेवावेत अशी त्यांना सूचना देतात.

या सोव्हिएट शाळेच्या अभ्यासक्रमांत विज्ञान व देशाची सद्य:स्थिति संपूर्णपणें आकलन होण्यासाठीं इतिहास, भौगोलिक रचना व त्यामुळें होणारे राजकीय परिणाम कळण्याकरितां भूगोल, वनस्पतिशास्त्र, प्राणिशास्त्र, शरीरविज्ञान, आरोग्यशास्त्र, भूगर्भशास्त्र, उत्क्रांतिशास्त्र यांचा समावेश केलेला आढळून येतो. त्याचप्रमाणें मातृभाषा व वाङ्मय, आंतर-राष्ट्रीय भावनांचा परिपोष उत्तम प्रकारें होण्यासाठीं दुसरी एक युरोपीय भाषा व त्या भाषेंतील साहित्य, शरीरप्रकृति उत्कृष्ट राहण्यासाठीं निरनिराळे खेळ, मनाला विसावा मिळून परत हुशारी व हुरूप येण्यासाठीं गायन व इतर कला वगैरे निरनिराळ्या विषयांचाहि या शाळेंतील अभ्यासक्रमांत समावेश करतात. या सर्व प्रकारांच्या तात्त्विक ज्ञानाबरोबरच मुलांच्या स्वभावाचें ज्ञान व्हावें, त्यांच्या मनांतील स्वदेशाभिमानाची जागती ज्योत सतत तेवत रहावी, जगांतील सर्व मुलांमध्यें आंतरराष्ट्रीय भावना निर्माण करून एकोपा नांदावा

व फॅसिझमबद्दल तिरस्कार निर्माण व्हावा या हेतूनें विविध गोष्टींचा अंतर्भाव सोव्हिएट शाळेंतील अभ्यासक्रमांतच केलेला आढळतो.

रशियांतील शाळांत भौतिक शास्त्राच्या शिक्षणाला फार महत्त्व देण्यांत येतें. कोठल्याहि शाळेचा अभ्यासक्रम त्याशिवाय पूर्ण मानण्यांत येत नाहीं. विशेषतः सृष्टिनिरीक्षणाला तर अभ्यासक्रमांत मानाचें स्थान देतात. कँटरबरीचे डीन हयूलेट जॉन्सन ह्यांनीं एका ठिकाणीं एक उदाहरण दिलें आहे. ते म्हणतात, टॅगनराग ह्या शहरीं सृष्टिनिरीक्षणाचा अभ्यास करणारे कांहीं पायोनियर विद्यार्थी होतें. रॉव्हिटस्की ह्या प्रसिद्ध शास्त्रज्ञाला ते मदत करीत व त्याच्या हाताखालीं अभ्यास करीत. त्यांच्यापैकीं व्होलोडाया ह्या चौदा वर्षाच्या मुलाबरोबर त्या शास्त्रज्ञाची बरीच दोस्ती जमली होती. एकदां एक पेटी उघडीत असतां व्होलोडायाला एक गव्हाचें नवीन प्रकारचें बी दिसलें. त्यानें शिक्षकाला तें दाखवतांच रॉव्हिटस्कीनें म्हटलें, " अरे, ही तर त्या गव्हाची आठवी लोंबी ! इतकें दिवस कुठंतरी ती हरवून गेली असंच वाटत होतं मला ! "

कांहीं वर्षांपूर्वी रॉव्हिटस्कीला एका जिल्ह्यामधून गव्हाच्या आठ लोंब्या मिळाल्या होत्या. तसल्या प्रकारचें धान्य फक्त इजिप्तमध्यें उगवत असे. निदान त्या वेळेपर्यंत तरी युरोपखंडांत तें कधींच तयार झालेलें नव्हतें. सात लोंब्यांतील बीं रॉव्हिटस्कीनें स्वतः पेरलें होतें, पण त्यांचा विशेष फायदा झाला नव्हता. त्या प्रयोगाच्या बाबतींत त्याची पुष्कळदा निराशा झाली होती. निम्मी झाडें कीड पडून मरून गेलीं होतीं, तर उरलेल्यांना अगदीं सामान्य दर्जाचें बीं आलें होतें. सामान्य दर्जाच्या लोंबीला पस्तीस गहूं लागत, तर ह्या विशिष्ट प्रकारच्या लोंबींतून पाऊणशें गहूं मिळत. अशा प्रकारच्या बियांची लागवड केल्यास देशाच्या उत्पादनांत अमोलिक भर पडणार होती. धान्याचें उत्पन्न दुप्पट, क्वचित त्याहून जास्त होण्याचा संभव होता. नंतर व्होलोडायानें तें बी पेरलें. पुन्हा सर्व गहूं गोळा केले

आणि पुन्हा पेरलें. त्यांपैकीं निम्मी रोपटीं सामान्य दर्जाचींच उगवलीं. पण व्होलोडाया निराश झाला नाहीं. त्याने पुन्हां बीं पेरलें. हा क्रम त्यानें सतत चालू ठेवला. १९३६ मध्यें त्यानें पांच चौरस मीटर जमीन लावली. १९३९ सालीं त्यानें दोन किलोग्रॅम बीं एका शेतकऱ्याला लागवड करण्याकरितां दिलें. शेतकऱ्यानें तें बीं आपल्या शेतांत पेरलें तों काय चमत्कार! युरोपांत सामान्यतः न उगवणारें तें बी फारच उत्तम वाढलें होतें. १९४० सालीं भरलेल्या प्रचंड शेतकरी प्रदर्शनाच्या वेळीं मॉस्कोमध्यें व्होलोडायाला आपलें वैशिष्ट्यपूर्ण गव्हाचें बीं लावून एक वाफा तयार करण्यास परवानगी देण्यांत आली. रशियांत हा फारच मोठा मान समजतात. व्होलोडायाचा वाफा बघायला दूरदूर अंतरावरूनहि अनेक लोक येत व त्याचें कौतुक करीत. या एका उदाहरणावरून सृष्टिशिक्षणांत मुलांना केवढी आस्था लागलेली आहे तें ध्यानांत येईल.

त्याचप्रमाणें पशु, पक्षी, मासे, झाडें वगैरे अनेक गोष्टींचा धडे समजून देतांना उपयोग करतात. शाळेंत पाळीव जनावरें बाळगतात व त्यांच्यासाठीं स्वतंत्र जागा राखून ठेवतात. मुलें ह्या पशुपक्ष्यांच्या वाढीचा अभ्यास करून त्याची नोंद करून ठेवतात. त्यांचें खाणेंपिणें काय व कसें असतें ह्याचें विद्यार्थ्यांना ह्यामुळें प्रात्यक्षिक ज्ञान मिळूं शकतें. शाळेंत शिकविल्या जाणाऱ्या प्रत्येक विषयाचा जीवनाशीं संबंध असलाच पाहिजे असा रशियाचा कटाक्ष आहे.

एकदा लेनिननें गॉर्कीला म्हटलें होतें, "पुढील पिढींतील मुलें आपल्यापेक्षां कितीतरी जास्त सुखी राहतील. आपल्याला ज्या प्रकारच्या अडचणी आल्या आणि आपल्यावर जे जुलूम झाले त्या सर्वांपासून ही मुलें पूर्णपणें अलिप्त राहतील." सध्याच्या रशियांतील शिक्षणपद्धतीकडे नजर टाकल्यास लेनिनचे हे उद्गार किती खरे आहेत ह्याचें प्रत्यंतर पहावयास मिळेल. शाळेंत मुलांच्या सुखसोयींकडे अतोनात लक्ष पुरविण्यांत येतें.

मुलांच्या आरोग्याची दक्षता बाळगतात. एक डॉक्टर आणि एक नर्स शाळेच्या शिक्षकाप्रमाणेंच सदोदित हजर असतात. कपाटाच्या फळ्यांवर, कोपऱ्यांत, चित्रांच्या कडेने कुठेंहि धूळ साचलेली त्यांना कधींच खपत नाहीं. इतकेंच नव्हे, तर वर्गाची स्वच्छता राखण्यासाठीं दोन वर्गनियंत्रक निवडतात. मुलांच्या आरोग्याची काळजी घेणें हें रशियांतील शिक्षणतज्ञ पहिलें कर्तव्य मानतात.

प्रत्येक शाळेंत मुलांच्या उपयोगासाठीं म्हणून एक ग्रंथालय असतें. आणि वाचनासाठीं एक प्रशस्त दिवाणखाना असतो. त्यांत सर्व दैनिक वर्तमानपत्रें आणि मासिकें ठेवलेलीं असतात. ग्रंथालयावरील अधिकारी मुलांना आवश्यक असलेली सर्व माहिती पुरवितो व भाषेच्या शिक्षकांच्या सहकार्याने आपलें काम करतो.

प्रत्येक शाळेला सिनेमा दाखविण्याचें साहित्य आणि मॅजिक लॅण्टर्न दिलेला असतो. प्रत्येक तालुक्यांतील लोकल् बोर्डाकडून स्वतंत्र फिल्म लायब्ररीची व्यवस्था केलेली आढळून येते. इतिहास, भूगोल, विज्ञान वगैरे कोणतेहि विषय समजावून देण्याकरितां शिक्षकांना केव्हांही चित्रपट मिळूं शकतात. शाळेंतील अभ्यासक्रमानुसारच हे चित्रपट तयार करतात. इतर कोठल्याहि देशांत पाहावयास मिळणार नाहीं असें सर्व प्रकारचें व सर्व विषयांवरील विपुल अध्यापन साहित्य रशियांतील सोव्हिएट शाळांतून आढळतें.

बहुतेक परिक्षांचे सर्व प्रश्न तोंडींच विचारण्यांत येतात. सर्व परीक्षा जरी तोंडी घेतात तरी भाषा व अंकगणित ह्यांची परीक्षा मात्र लेखीच असते. वर्गांतच आणून ठेवलेल्या एखाद्या वस्तूवरून विषय निवडून त्याच्यावर विद्यार्थ्यांना पुष्कळशीं चर्चा आपापसांत करतां यावी अशी नेहमी अपेक्षा असते.

मुलांची नाटकें बहुधा एकट्या रशियांतच आहेत. मुलांच्या नाटकगृहांची संख्या शंभराहून जास्त आहे. मुलांच्यासाठीं मुद्दाम नाटकें लिहिली जातात व त्यांचें प्रयोग मुलांसाठीं करून दाखवितात. मुलांची सिनेमागृहेंहि रशियांत झपाट्यानें वाढत आहेत.

दि. गो. तेंडुलकर ह्यांनीं रशियांतील आपल्या प्रवासाचें वर्णन लिहितांना म्हटलें आहे, " अलीकडे कित्येक शाळांतून मुलांच्या आगगाड्या चालू झाल्या आहेत. या आगगाड्यांची सर्व कामें मुलेंच करतात. या आगगाड्यांचा प्रयोग सार्वजनिक बागांतून चालतो. "

इतकेंच नव्हे, तर केवळ मुलांकरितां अशी समुद्रकिनाऱ्यावर लेनिनग्राड व ओडेसा येथें स्वतंत्र बंदरें आहेत. त्यांत छोटेछोटे जहाजांचे काफिले असून त्यांची हालचाल, व्यवस्था सर्वस्वी मुलांकडेच सोपविलेली असते. उन्हाळ्याच्या सुट्टींत मुलांना मुद्दाम वननिवासाला पाठवितात.

याशिवाय मुलांसाठीं 'पायोनिअर पॅलेस' सारख्या संस्था रशियांत जागोजागीं आहेत. त्यांच्यामार्फत जुन्या इमारतींमधून इंजिनियरिंग, विमाने, रेल्वे, चित्रें, शिल्प, नृत्य, फोटोग्राफी, बुद्धिबळें, मैदानी खेळ वगैरे अनेक विषयांचीं साधनें ठेविलेलीं असतात आणि त्यांचा फायदा मुलेंहि मोठ्या आवडीनें करून घेतात. रशियांतील मुलांचें एक वैशिष्ट्य म्हणजे त्यांना समाजासमोर अगदी धीटपणानें भाषण करतां येतें हें होय. कारण ह्या गुणाचा परिपोष करण्याकरिता त्यांना 'पायोनिअर पॅलेस' ह्या संस्थेमार्फत नेहमी प्रोत्साहन मिळतें.

याशिवाय ह्या सर्व सोयींबरोबर रेडियोचे त्यांच्याकरिता दररोज दोनदा स्वतंत्र कार्यक्रम ठेवलेले असतात. लहान मुलांकरिता ज्या ज्या सोयी करणें शक्य आहे त्या त्या सर्वांचा अवलंब रशियांत केलेला आढळतो. त्यामुळें मुलें मोठ्या आनंदानें शाळेंत जातात आणि त्यांच्या मनाचा आणि कर्तृत्वशक्तीचा योग्य प्रकारें विकास होऊं शकतो.

स्वतःच्या शिक्षकांविषयीं रशियन विद्यार्थ्यांच्या मनांत कमालीचा आदर असलेला दिसतो. पुढील पिढींतील उद्यांच्या समाजाचे आधारस्तंभ असलेल्या विद्यार्थ्यांना शिक्षण देण्याची जबाबदारी सोव्हिएट शाळेंतील शिक्षकांच्या शिरावर आहे; म्हणूनच त्याला उच्च प्रकारचा सामाजिक दर्जा प्राप्त झालेला असतो. ह्या शिक्षकाला नुसतें पुस्तकी ज्ञान असून भागत नाहीं, तर तो मुलांचीं मनें सहजपणें जाणणारा कुशल मानसशास्त्रवेत्ता असावा लागतो. शिवाय त्याला निरनिराळ्या अनेक विषयांची भरपूर माहिती असावी लागते. विशेषतः मातृभूमीचें महत्त्व, राजकीय रचना व भूमिका, सोव्हिएट सरकारचें सर्वसामान्य धोरण व कार्यक्रम, या सर्व बाबतींचें अद्यावत् ज्ञान शिक्षकास असावेंच लागतें. अर्थात् यासाठीं नित्य वाचन आणि अभ्यास क्रमप्राप्तच आहे.

सोव्हिएट शाळेंतील शिक्षकाचा पगार कामाच्या तासांवरून ठरतो. त्याच्या पगाराची श्रेणी प्रतिमासीं १०० तास अध्यापन या तत्त्वावर अवलंबून आहे. ही मर्यादा विशेष तज्ज्ञांच्या बाबतींत ७५ तासांची ठेवलेली आहे. ह्या ठराविक पगाराबरोबरच गणित व भाषा ह्या विषयांकरितां, अध्यापनाव्यतिरिक्त कामाकरितां (उदाहरणार्थ—एखाद्या वर्गाला विशेष मार्गदर्शन करण्यासाठीं) ह्या शाळेंतील शिक्षकाला जास्त पगार मिळतो. खालच्या वर्गांतून ४२ पेक्षां जास्त विद्यार्थी असल्यास व वरच्या वर्गांतून ३० पेक्षां जास्त विद्यार्थी असल्यास त्या प्रत्येक विद्यार्थ्यामागेंसुद्धां शिक्षकाला जास्त पगार देण्याची पद्धत आहे. इतकेंच नव्हे, तर शाळेचा अभ्यासाचा वेळ सोडून इतर वेळांत शिक्षकाला काम करावें लागलें तर त्या कामाच्या प्रत्येक तासामागें कांहीं तरी जास्त पगार ह्या शिक्षकांना नेहमीच मिळतो. त्यामुळे ते शिक्षक जास्त काम करण्यास खुषीने तयार होतात. सोव्हिएट शाळेंतील शिक्षकांच्या पगारांत १९३६ सालीं शेंकडा १०० टक्क्यांहून जास्त वाढ झालेली आहे. त्यामुळें त्यांचें सध्यांचे पगाराचें

मान दर महिना ४०० रूबल्स ते १००० रूबल्स असें आहे. म्हणजे साधारणपणें सोव्हिएट शिक्षकाचा पगार दर महिना ५५० रुपयांपासून १४०० रुपयांपर्यंत असतो.

खेडेगांवांतील शाळांमध्यें तर शिक्षकांना फुकट जागा, फुकट सर्पण आणि दिवे मिळतात. इतकेंच नव्हे तर प्रसंगीं त्यांना एकेक गाय किंवा कोंबडी व डुकरें देतात. शहरांतील शिक्षकांना त्यांच्या पगाराच्या शेंकडा १० इतकेंच घरभाडें पडतें. त्यांना लागणारी वैद्यकीय मदत फुकट पुरवितात. त्यांच्या साठीं हप्ता भरावा न लागणारे विमे उतरलेले असतात. त्यांना प्रवास करतांना इतरांहून कमी भाडें पडतें. बिएट्रिस किंग ह्या बाईनीं रशियांतील शिक्षकांविषयीं लिहितांना म्हटलें आहे, कीं " शिक्षकाच्या जागेसाठीं अर्ज करणाराला त्याचा धर्म, त्याचा राजकीय चळवळींशीं वा संस्थेशीं संबंध, विवाह झाला किंवा नाहीं, मुलें असल्यास किती वगैरे बाबींचा कधींच उल्लेख करावा लागत नाहीं. शिक्षकानें स्वदेशप्रेमी असलें पाहिजे एवढीच अपेक्षा असते." शिक्षकांना आपला वेळ चांगल्या रीतीनें घालवितां यावा म्हणून त्यांच्याकरितां क्लब स्थापन केलेले असतात.

दर वर्षाच्या शेवटीं ज्या शिक्षकांचें काम चांगलें गणलें गेलें असेल त्यांना पैशांच्या स्वरूपांत बक्षिसें देतात. ज्या शिक्षकांचें काम अनेक वर्षें उत्तम असेल त्यांना सोव्हिएट यूनियनकडून 'सन्मान्य अध्यापक' ही स्पृहणीय पदवी मिळते. मात्र शिक्षकाच्या कामाचा दर्जा ठरवितांना नुसते परीक्षांचे निकाल लक्षांत न घेतां वर्गांतील मुलांची वर्तणूक, सामाजिक कार्य, पालकांशीं असलेला शिक्षकाचा संबंध वगैरे अनेक बाबींचा विचार केला जातो. शिक्षकांच्या ट्रेड यूनियन संस्था आहेत. त्यांच्यामार्फत प्रथम अहवाल तयार करतात आणि मग सरकारकडून शिक्षकांचा जाहीर रीतीनें बहुमान करण्यांत येतो.

सोव्हिएट शाळेसंबंधी लक्षांत ठेवण्यासारखी एक गोष्ट म्हणजे यांतील शिक्षकांची सभा नियमितपणें घेण्यांत येते ही होय. या सभेमध्ये प्रत्येक शिक्षकाला चर्चा वा टीका अगदीं मन मोकळेपणाने करण्याची मोकळीक असते. शाळेंतील सर्व महत्त्वाच्या बाबींचा विचार या सभेमध्यें होतो, इतकेंच नव्हे, तर शाळेंतील एकमेकांच्या कामासंबंधींहि चर्चा या वेळीं होते. या सभांमध्यें होणारी टीका जरी मर्मभेदी व क्वचित् बोचक असली तरी ती मित्रत्वाच्या नात्यानेंच केलेली असावयाची त्यामुळें कोणाचेंच मन दुखावलें जात नाहीं व कोणालाही वाईट वाटण्याचें कारण राहात नाहीं.

विद्यार्थी आणि शिक्षक यांचे परस्परसंबंधसुद्धां स्पृहणीय असतात. शारीरिक शिक्षा बेकायदा ठरविलेली आहे. वर्गाची शिस्त ही मुख्यतः विद्यार्थ्यांचें अभ्यासांत लक्ष असण्यावरच अवलंबून असते; आणि शिक्षकाची विषय प्रतिपादण्याची हातोटी, त्याचें व्यक्तिमत्व आणि समाजाचें दडपण ह्यामुळें वर्गांत शांतता नांदूं शकते. त्यासाठीं कुठल्याहि शिक्षेची जरूरी नाहीं. सोव्हिएट शाळा म्हणजे एक क्रीडांगणच आहे असें म्हटलें तरी चालेल. क्रीडांगणावर मुख्य नायकाच्या सूचना सर्व मुलें ऐकतात, कारण खेळ खेळण्यास सर्वजणच उत्सुक असतात आणि खेळ शिकविणारेहि उत्सुक असतात. सोव्हिएट शिक्षक म्हणजे मुलांपेक्षां जास्त माहितगार असा एक नायक होय आणि सोव्हिएट शिक्षण म्हणजे जणूं एक सर्वांच्या आवडीचा खेळ होय. म्हणूनच सोव्हिएट शाळांत मुलांना शिक्षा करण्याची फारशी जरूरी भासत नाहीं. सर्व शाळा विद्यार्थ्यांच्या सहकार्यानें चालते. शाळेंतील विद्यार्थ्यांच्या वर्गावर्गाच्या सभा होतात. ह्या सभांचें अध्यक्ष त्यांच्यांतीलच पुढारी असतात. ह्या वेळीं सर्व विद्यार्थ्यांना वर्गबंधूवर किंवा शिक्षकांवरहि टीका करण्याची मुभा दिलेली असते. त्यामुळें योग्य सुधारणा होऊन प्रगति होण्याला मदत होते.

शिक्षकांच्या सभांमध्यें पास झालेले ठराव शाळेच्या मुख्याधिकाऱ्याला मान्य करावे लागतात. विद्यार्थी व शिक्षक ह्यांचा दांडगा उत्साह व त्यांची समाजा-

बद्दलची कळकळ आणि जबाबदारीची जाणीव ह्यांमुळे परस्पर सलोख्याचें वातावरण निर्माण होण्यास मदत होते, आणि ह्या मित्रत्वाच्या वातावरणामुळेंच अनेक महत्त्वाचीं कामें उत्तम प्रकारें होऊं शकतात.

शाळेंतील शिक्षणपद्धतीविषयीं दोनतीन विशेष गोष्टी सांगण्यासारख्या आहेत. साम्यवादावर आधारलेली परस्पर स्पर्धेची पद्धति हें रशियांतील शिक्षणाचें महत्त्वाचें अंग आहे. निरनिराळ्या व्यक्ति, संघ, वर्ग व शाळा ह्यांमध्यें परस्पर–स्पर्धा व मित्रत्वाची चुरस निर्माण करणें हा पहिला विशेष होय. या स्पर्धेत नैपुण्य दाखविणाऱ्या व्यक्ति वा संघ यांना खास पारितोषिकें दिली जातात व अशा रितीनें त्यांना उत्तेजन लाभतें.

नजरेंत भरणारा दुसरा एक विशेष म्हणजे 'पायोनिअर्स' नांवाची शालेय विद्यार्थ्यांची अधिकृत संघटना हा होय. या संघटनेंतील बालवीर आपल्या अध्यापकांच्या सहकार्यानें अभ्यासांत त्वरित प्रगति करून दाखवितात. ह्या संघटनेच्या सभासदत्वाची मुख्य अट म्हणजे प्रत्येकानें आपल्या अभ्यासांत निश्चित प्रगति दाखविली पाहिजे ही होय. अभ्यास फार मागें पडलेला असेल तर त्या विद्यार्थ्यांना सभासद होतां येत नाहीं.

शिक्षक व पालक ह्यांची एकमेकांशीं चांगली ओळख असणें मुलांच्या शिक्षणाच्या दृष्टीनें आवश्यक आहे. येथील पालक व शिक्षक ह्यांचें परस्परसंबंध सलोख्याचे असतात. शिवाय शिक्षकांच्या बरोबरीनें त्यांनींही मुलांच्या शिक्षणांत मदत करावयाची असते. हा हेतु सहज साध्य व्हावा म्हणून शाळेशीं पालकांचा वरचेवर सतत संबंध घडवून आणतात आणि त्यांच्या सहकार्याचा उपयोग करून घेतात.

विशेष खबरदारी घ्यावी लागते ती चुकार, खोडकर वा नाठाळ विद्यार्थ्यांबाबत! त्यांच्या पालकांचें जर सहकार्य लाभलें तर हा प्रश्न बराच सोपा होतो. ह्या मुलांच्या बाबतींत विचार करतेवेळीं शिक्षक व पालक ह्यांचें सहकार्य असणें अत्यंत जरुरीचें आहे. हें सहकार्य जर नसेल तर हा प्रश्न

कधींच यशस्वी रीतीनें सोडवितां येणार नाहीं. शाळा व पालक ह्यांच्या सहकार्याच्या जोरावरच ह्या चुकार विद्यार्थ्यांचा प्रश्न सहज व सुलभ रीतीनें सोडवितात.

सोव्हिएट शाळा म्हणजे अभ्यास करतांना व खेळ खेळतांना विद्यार्थ्यांना अत्यंत उपयुक्त अशी एक प्रभावशाली शक्तीच आहे. म्हणूनच त्या शाळांतील मुलें आनंदी, सुदृढ व कार्यतत्पर असलेलीं दिसून येतात.

■

## ★ सोव्हिएट बँकस्

" सोव्हिएट रशियांत उत्पादन साधनांची खासगी मालकी ज्याप्रमाणें नाहीं त्याचप्रमाणें खासगी भांडवलाच्या बँकाही अर्थातच नाहींत, हें लक्षांत ठेवलें पाहिजे. इतर देशांतून बँकांचा व्यवहार हा खासगी मालकीच्या धंद्यांना पोषक असाच मुख्यतः चालतो. तसा तो सोव्हिएट रशियांत चालत नाहीं. .......या बँकांना लागणारा पैसा राष्ट्राच्या बजेटांतून पुरविण्यांत येतो.

सोव्हिएट पद्धतीच्या अर्थव्यवस्थेंत बँकांचा उपयोग उत्पादन सुसूत्र चालण्यासाठीं करण्यांत येतो. उलट, भांडवलदारी समाजांत उत्पादन व त्याचा विनिमय यांत होणाऱ्या तेजीमंदीमुळें बँकांचेही व्यवहार कमी–अधिक तेजी–मंदीचे होत असतात, ही गोष्ट सर्वांत महत्त्वाची आहे. सोव्हिएट रशियांत बँका या साधन म्हणून वापरल्या जातात, साध्य म्हणून नाहीं. "

—अर्थ, अग्रलेख. ता. ५–२–१९४७

# सोव्हिएटमधील धर्मस्वातंत्र्य

लेखक **दि. वा. फडणवीस**

अलिकडे रशियांतील बारीकसारीक घडामोडींकडेहि जग बारकाईनें पाहूं लागलं आहे. ह्याचा अर्थ उघड आहे. महायुद्धानें सर्वसाधारण प्रामाणिक जनतेचे डोळे उघडले असून तिच्यांत सोव्हिएट रशियाबद्दल आदरभाव निर्माण झाला आहे. गेल्या पंचवीस वर्षांत अत्यंत मागासलेल्या झारशाहीच्या राखेंतून लेनिन–स्टालिननीं मार्क्सवादाच्या मंत्रप्रयोगानें एका अत्यंत चैतन्यशाली नवराष्ट्राची निर्मिती केली आहे व तें राष्ट्र आज जगांतील सर्व पददलितांचें आशास्थान आणि आदर्श होऊन बसलें आहे. कोणत्याहि प्रगतिप्रिय माणसाला रशिया विचारांत घेतल्याशिवाय पुढें पाऊल टाकणेंच अशक्य झालें आहे.

१९४३ सालीं मॉस्को येथें रशियन चर्चची मध्यवर्ति संघटना स्थापन करण्यास सोव्हिएट सरकारनें संमति दिली. या घटनेचा फायदा घेऊन प्रतिगामी वृत्तीच्या मंडळींनीं जोराचा रशिया–विरोधी प्रचार आरंभला आहे. हा प्रचार किती पोकळ व खोटा आहे हें लक्षांत येण्यासाठीं समाजवाद धर्माला अफूची गोळी कां मानतो, सोविएट सरकारची धार्मिक प्रश्नासंबंधीं खरी भूमिका काय आहे इत्यादि गोष्टी प्रथम नीट समजून घेणें जरूर आहे. तिकडेच आपण वळूं.

## धर्म ही अफूची गोळी

मार्क्सवादी धर्माला अफूची गोळी समजतो. कां ? धर्म हा मार्क्सवादाच्या मूलभूत तात्त्विक भूमिकेला विरोधी आहे. भौतिक आणि विकासवादी अशा मार्क्सवादाचें आधिभौतिक आणि आधिदैविक अशा आत्मतत्त्वाच्या जाळ्यांत गुरफटलेल्या धर्माशीं कधींहि जमणें शक्य नाहीं. विकासवादाचें आणि

यदृच्छया चैतन्यात्मक आत्मतत्वांतून सृष्टीची आहे तशीच उत्पत्ती झाली असें म्हणणाऱ्या धर्माचें कसें जमावें ?

परंतु एवढ्यामुळेंच मार्क्सवादी धर्माला अफू समजत नाहीं; तर त्याचे जे प्रत्यक्ष परिणाम– सामाजिक क्रिया– घडून येतात त्यामुळें तो धर्माला अफूची गुटिका समजतो. धर्माची प्रत्यक्षांत समाजाला शिकवण काय असते ? जुलूम, गुलामी व पिळणूक ह्यांत खितपत असणाऱ्या बहुसंख्य समाजाला आहे त्याच स्थितींत समाधानी, संतुष्ट आणि क्षमाशील असायला सांगून मर्त्य जीवनानंतरच्या पारलौकिक सुखाची लालूच तो दाखवीत असतो. ही धर्माची शिकवणूक दलितवर्गावर काय परिणाम करते ? आधींच पिळणुकीच्या शक्तीपुढें हतबल झालेल्या बहुजनसमाजाला ती पारलौकिक सुखाचा आकाशांतील चंद्र दाखवून त्याचें सांत्वन करते आणि अन्यायाविरुद्ध करावयाच्या प्रतिकारापासून त्याला परावृत्त करते ; त्याची प्रतिकारशक्ति जागृत होऊं देत नाहीं. त्याचबरोबर दुसऱ्याच्या श्रमांवर जगणाऱ्या वांडगुळांना नुसता युक्तिवादाचाच मुद्दा पुरवीत नाहीं, तर त्यांच्या दुष्कृत्यांवर सफेदी मारायलाहि मदत करते. आम्ही श्रेष्ठ कां ? तर ईश्वराची इच्छा म्हणून ! त्यानेंच आम्हांला सत्ताधारी बनवलें त्याला आम्ही काय करणार ? उलट तुम्हीं मात्र आम्हांला उखडून लावण्याचा प्रयत्न कराल तर ईश्वराच्या इच्छेविरुद्ध वागल्याचें पातक तुम्हांला लागेल— असा युक्तिवाद धर्मच आपल्या पोतडींतून काढून पुरवूं शकतो. शिवाय दुसरी एक मात्रा आहेच, कीं धर्म हा श्रीमंतांना नेहमी उदार आणि दानप्रवण असण्याचा उपदेश करतो. तें स्वर्गाचें स्वस्त आणि रामबाण तिकीट तर असतेंच ; पण समाजाची जी पिळणूक ते करतात त्याचेंहि समर्थन ह्या युक्तीनें होतें. आम्ही नेहमी गरिबांना दान करीत असतों ; धर्मार्थ मदत करीत असतों. ती जर अशीच चालू ठेवायची, तर आम्हीं श्रीमंत झालेंच पाहिजे आणि त्यासाठी ही लुटीवर आधारलेली समाजरचना

टिकवलीच पाहिजे. मनुष्याचें नुसतें पौरुषच नव्हे, तर त्याची सदसद्विवेक-बुद्धीसुद्धां मारून टाकणारें धर्मासारखें दुसरें मादक औषध नाहीं.

सत्ताधारी वर्गाला लागणाऱ्या असल्या सोयिस्कर तत्त्वज्ञानाची पाणपोई धर्म सढळ हातांनी उघडीत असतो. त्यामुळें आकाश आणि पृथ्वीच्या दरम्यान दलाली करणाऱ्या धर्मगुरूंना हे पृथ्वीवरील सत्ताधीश आपल्या लुटींतील कमाईचा दायभाग देत असतात. आणि अशा रीतीनें धनिक व धार्मिक ह्यांचा समाजाला लुबाडण्याचा धंदा भागीदारींत चालू असतो.

## रशिया आणि धर्म : क्रांतिपूर्व काल

क्रांतिपूर्व कालांत ह्या भागीच्या धंद्याला रशियांत खूपच जोर चढला होता. चर्च आणि झारचें सरकार ह्यांतील संबंध केवळ मैत्रीचेच नव्हे, तर चर्च हें सरकारी रीत्या झारच्या नियंत्रणाखालीहि होतें. झारच्या प्रत्यक्ष हुकुमानें चर्चचे वरिष्ठ अधिकारी नेमले जात आणि झारच्या तिजोरींतून सालिना ३ कोटी ३५ लक्ष रूबल्सचा मलिदा रशियन धर्मगुरूंना चारला जात असे. शिवाय रशियांतील अज्ञ जनतेची धर्माच्या नांवावर जी अमर्याद लूट चाले ती वेगळीच.

अर्थातच झार आपल्या पिळणुकींतला दायभाग चर्चलाहि देत असल्या-मुळें चर्चनें झारच्या सत्तेचा पाठपुरावा अगदी इमानी कुत्र्याच्या आवेशानें करावा ह्यांत नवल नाहीं. मॉस्कोच्या गुप्त पोलिस खात्याचा अधिकारी झुबितॉव्ह ह्याने कामगार चळवळींत फूट पाडण्यासाठीं निर्माण केलेल्या कामगार संस्कृतिसंवर्धक संस्थेचें संचालन सर्वस्वीं चर्चकडून होत होतें. कामगारांना फसवून १९०४ मध्यें एका धर्मोपदेशकानें झारच्या राजवाड्या-समोर घडवून आणलेली हजारों कामगारांची कत्तल ह्याचाच पुरावा आहे. रशियांत क्रांति घडून येतांच रशियाच्या ‘पवित्र धर्मगुरू’नें खालील पत्रक प्रसिद्ध केलें—

" झारच्या सिंहासनाभोंवती आपल्या छातीचा कोट रचा ! या, सारेजण धावून या ! केवळ भीतीनें नाहीं, तर आपल्या बुद्धीशीं प्रामाणिक राहण्यासाठीं या आणि सत्ता व सत्ताधाऱ्यांना वांचवा ! साऱ्या रशियांतील देवळांच्या घंटा खणखणूं द्या आणि साऱ्या रशियाला एकत्र करून पुढें व्हा ! तुमच्या पवित्र ध्वजावर जळत्या अक्षरांत पुढील शब्द कोरून ठेवा– ' धर्माकरितां, झारकरितां आणि मातृभूमीकरितां ! "

पण हा वार फुसका ठरला आणि धर्मगुरूंनी विश्वासघातकी केरेन्स्कीशीं संगनमत करून फिरून आपलें आसन सावरून धरण्याचा शेवटचा आटोकाट प्रयत्न केला.

## मार्क्सवाद्यांचें धोरण

वरील वस्तुस्थितीच्या अवलोकनावरून धर्म ही केवढी प्रतिगामी शक्ति असते हें लक्षांत येतें. आणि म्हणून क्रांतिकारक सरकारनें ताबडतोब ह्या सापाच्या पिल्लाला बुटाच्या टांचेखालीं चिरडून टाकायला हवें असें साधारण माणसाला वाटतें. परंतु तसें करणें मार्क्सवाद्यांच्या विचारसरणीला धरून नाहीं. १८७४ मध्यें ब्लँक्वीस्ट जाहीरनाम्यावर टीका करतांना एंजल्सने त्याच्या धर्मावरील चढाईला मूर्खपणा म्हणून धिक्कारलें आहे. धर्मावरील असल्या प्रकारची चढाई धर्माचें उत्खनन करण्याऐवजी त्याला मजबूत करण्यालाच जास्त कारणीभूत होईल. लेनिनने ह्याचें विवरण जास्त स्पष्टपणें केलें आहे. तो म्हणतो, " धर्माचें मूळ हें निव्वळ वैचारिक किंवा शैक्षणिक नसून त्याहून खोल असें सामाजिक आहे. धर्मानें दलित जनतेला अज्ञानांत ठेवण्याला मदत होत असली तरी अज्ञान हाच केवळ धर्माचा आधार नाहीं. आधुनिक धर्माचें मूळ राबणाऱ्या जनतेची भांडवलशाहीकडून जी असह्य पिळणूक चालू असते आणि त्या भांडवलशाहीच्या शक्तीपुढें त्यांची जी अगतिक आणि भयभीत अवस्था होऊन जाते, त्यांत आहे. राबणाऱ्या जनतेला ही भांडवलशाही ज्या यातना अनुभवायला लावते त्या यातना

कोणत्याहि नैसर्गिक उत्पातापेक्षा भयानक अशा असतात. भय ही ईश्वराची जननी आहे. भांडवलशाहीची आंधळी ताकद –आंधळी, कारण त्याचा परिणाम अगोदर लक्षांत येऊं शकत नाहीं –कोणत्या वेळेला आपल्या आयु-ष्याचा नाश करून दारिद्र्य, उपासमार किंवा भिक्षेची नरोटी केव्हां हातीं देईल ह्याची शाश्वती लहानसहान धंदेवाईकांना किंवा कामकऱ्यांना नसते. आणि ह्या आंधळ्या शक्तीचें भय हेंच आधुनिक धर्माचें मूळ आहे. ”

लेनिनच्या ह्या उद्‌गारांत तीन महत्त्वाच्या गोष्टी आल्या आहेत. पहिली गोष्ट ही, कीं धर्माचा आधार केवळ अज्ञान नाहीं. म्हणजेच, धर्माचें मूळ हें वैचारिक ( Intellectual ) नाहीं. सर्वसाधारण बुद्धिवादाला विचा-रलें कीं, “ का रे बाबा, हे लोक धर्माच्या मागं इतके कां लागतात ? ” तर तो सरळ एकदम उत्तर, देईल, ‘मूर्ख, अज्ञानी आहेत म्हणून.’ अर्थातच ह्याचा सरळ परिणाम धर्माविरुद्ध मोहीम उभारण्यांत होतो. धर्म हा मूर्खपणा आहे, तेव्हां कोणत्याहि प्रगतिप्रिय सरकारनें तो चालू देतां कामा नये, हा फाजील-पणा आहे आणि तो थांबवला पाहिजे, असा युक्तिवाद ते करूं लागतात. परंतु ही विचाराची दिशा चुकीची आहे. मूळ भौतिक दृष्टीचा ह्याला आधार नाहीं. ह्या कल्पनेप्रमाणें धर्माचें मूळ वैचारिक दौर्बल्यांत, बौद्धिक कमतरतेंत आहे. ह्याचा अर्थ ही विचाराची दिशा कल्पनावादी ( idealistic ) आहे. परंतु कोणत्याहि सामाजिक लक्षणाचें मूळ कल्पनावादाच्या साहाय्यानें शोधूं पाहणें चुकीचें आहे. सामाजिक लक्षणाचें विश्लेषण भौतिक दृष्टीनेंच व्हायला पाहिजे. कारण सामाजिक लक्षण हा समाजाच्या भौतिक परिस्थितीचा परिपाक आहे. धर्म हें असेंच एक सामाजिक लक्षण आहे. अर्थात त्याचाहि विचार भौतिक पद्धतीनेंच बरोबर होऊं शकतो.

भौतिक पद्धतीनें ह्याचा विचार करायचा म्हणजे लेनिननें सांगितलेली दुसरी महत्वाची गोष्ट लक्षांत घेतली पाहिजे. लेनिन म्हणतो, “ भय ही ईश्वराची जननी आहे. ” कां ? आपण जर धर्माचा इतिहास पाहात गेलों

तर आपल्याला असें आढळून येतें, कीं मूळ धर्माचें स्वरूप हें निसर्गाच्या प्रकोपाला जबाबदार असलेल्या एकएका देवतेचें आणि त्या नैसर्गिक प्रकोपापासून संरक्षण करण्यासाठीं त्या देवतांची यजन–याजन–प्रार्थनादि प्रकारांनीं आराधना करण्याचें होतें. मूळ वेदांचें स्वरूप काय आहे ? इंद्र, वरुण, अग्नि आदि देवतांचा प्रकोप होऊं नये म्हणून करावयाच्या प्रार्थनाच वेदांत संकलित केल्या आहेत. यज्ञयाग म्हणजे सुद्धां ह्या देवतांना संतुष्ट करण्याचेच मार्ग आहेत. हीच गोष्ट पर्शियन, ग्रीक, रोमन, जर्मन, केल्टीक, स्लाव्ह इत्यादि सर्व जमातींच्या पुराणेतिहासांतून दिसून येते. आणि म्हणूनच एंजल्सनें म्हटल्याप्रमाणें हा प्राथमिक अवस्थेंतील धर्म म्हणजे मनुष्याच्या मनावरील, त्याच्या दैनिक जीवितावर सतत परिणाम करणाऱ्या नैसर्गिक शक्तींचें अद्भुत प्रतिबिंबच आहे. ह्या भीतिदायक शक्ति मनुष्याच्या मनावर परिणाम करून दैवी शक्तींचें स्वरूप धारण करतात. थंडी, वारा, ऊन, पाऊस, अवर्षण, भूकंप, वादळ इत्यादि नैसर्गिक उत्पातांचा मनुष्याच्या जीवितावर भयंकर परिणाम होत असे. त्यांच्यापुढें प्राथमिक अवस्थेंतला माणूस हा दुर्बल ठरे. परंतु ह्या उत्पातांचें कारण मात्र त्याला देतां येत नसे. अर्थातच त्याच्या मनानें ह्यांतून निरनिराळ्या देवता निर्माण केल्या. निसर्गाबद्दलचें हें भय हेंच देवता आणि धर्माचें मूळ आहे.

परंतु नैसर्गिक उत्पातांची अगम्यता आणि भय हेंच जर धर्माचें मूळ असेल तर जगाची शास्त्रीय प्रगति जसजशी होत गेली, निसर्गाचें गूढ जसजसें उकलत गेलें आणि त्यापासून संरक्षण करण्याचे उपाय जसजसे सांपडत गेले तसतसा धर्माचा नायनाट व्हायला पाहिजे परंतु तसें न होतां आजहि समाजाच्या मनावर धर्माची पकड घट्ट कायम आहेच. ( बुद्धिवाद्यांनीसुद्धा हा मुद्दा विचार करण्यासारखा आहे. अज्ञान हा जर धर्माचा पाया असता तर शास्त्रीय ज्ञानाच्या प्रगतीनें धर्माचें खूळ नष्ट व्हायला पाहिजे होतें. पण तसें होत नाहीं. ) मग ह्याचें कारण काय ?

लेनिन म्हणतो, " शास्त्रीय शोधांनीं धर्मावर आघात केला ह्यांत शंकाच नाहीं. परंतु धर्म नष्ट करण्याचें काम हे शोध करूं शकले नाहींत. कारण शास्त्रीय ज्ञानाने निसर्गाचें गूढ उकलून निसर्गाचें भय नाहींसें केलें खरें; पण त्याऐवजीं त्याहीपेक्षां जास्त भयकारी वस्तूंनी निसर्गाची जागा घेतली. मनुष्याच्या मनांतली भीति समूळ नाहींशी होऊं शकली नाहीं. हें भय सामाजिक शक्तींचें होय. आज मनुष्य पूर्वीप्रमाणें निसर्गाकडून वाटेल तसा वळविला जात नसला तरी त्यानें स्वतःच निर्माण केलेली सामाजिक परि-स्थिति एखाद्या बाह्य शक्तीप्रमाणें त्याच्या जीवनाचीं सूत्रें हालवीत असते. आजची भांडवलशाही अर्थव्यवस्था ही समाजापुढचा एक मोठा प्रश्न होऊन बसली आहे. आजचें अर्थशास्त्र आर्थिक प्रश्नांचें थोडेंबहुत ज्ञान देत असलं तरी तें वेळोवेळीं निर्माण होणाऱ्या आर्थिक पेंचप्रसंगांना रोखूं शकत नाहीं; प्रत्यक्ष भांडवलवाल्यांनासुद्धां वैयक्तिक तोटा, कर्ज, दिवाळखोरी वगैरेंपासून वाचवूं शकत नाहीं; आणि कामगारांना तर बेकारी, दारिद्र्य ह्यांपासून बचावूं शकत नाहींच नाहीं. अर्थातच मनुष्याच्या मनाची अनिश्चितता, त्याचें भय अजूनहि कायमच आहे. ' मनुष्यानें एक चिंतावें आणि दैवानें तें विघटित करून टाकावें ' असा प्रकार आजहि चालू असतो. "

आणि म्हणूनच निव्वळ ज्ञान–धर्माच्या सामाजिक मुळाचें ज्ञानसुद्धां धर्माचा नायनाट करूं शकत नाहीं. धर्माचें मूळ हें समाजांतील अर्थव्यवस्थेंत, वर्गीय समाज पद्धतींत आहे. त्याचें मूळ सामाजिक आहे. आणि म्हणूनच कसलेंहि ज्ञान नव्हे, तर सामाजिक कृति–वर्गीय समाजपद्धतीचें उत्खननच फक्त धर्माचा नायनाट करूं शकेल. ज्या दिवशीं मनुष्य ठरवूंहि शकेल आणि मनुष्यच मोडूंहि शकेल, त्याच दिवशीं मनुष्याच्या मनांतलें भय जाऊन धर्मश्रद्धेचाहि नायनाट होईल.

आणि म्हणूनच धर्माविरुद्ध सरकारी मोहीम काढायला लेनिनचा विरोध होता. धर्मविरोधी प्रचाराला तो दुय्यम महत्त्व देतो. कारण निव्वळ

ज्ञानाचे घुटके पाजण्यानें हें काम होणार नाहीं असें त्याला वाटतें. धर्माविरुद्ध दडपशाही सुरू केली तर धर्माचा लोप होण्याऐवजीं धार्मिक प्रवृत्ति वळावतील. बिस्मार्कला कॅथॉलिकविरोधी मोहिमेंत तोच अनुभव आला. म्हणूनच धर्मावर विश्वास असणाऱ्यांना कम्युनिस्ट पार्टीत घ्यावें किंवा नाहीं ह्या पृच्छेला लेनिननें अस्तिपक्षीं उत्तर दिलें. वर्गीय लढा जसजसा तीव्र होईल तसतसा धर्माचा पगडा कमी होईल आणि वर्गहीन समाज रचनेच्या उदयानें तो कायमचा नाहींसा होईल असें त्याचें म्हणणें होतें.

ही लेनिनची भूमिका सर्वसाधारण उदारमतवाद्यापेक्षां मूलतःच भिन्न आहे. ती खरी मार्क्सवादी भूमिका आहे. उदारमतवाद्याला धार्मिक स्वातंत्र्य पाहिजे असतें तें तो दडपशाहीचा विरोधी म्हणून. कसलीहि दडपशाही त्याला नको असते. धर्माचाहि जुलूम त्याला नको—धर्मावरीलहि नको असतो. धर्म समूळ नष्ट करावा असें तो कधींच म्हणत नाहीं. उलट धर्म नष्ट केलाच पाहिजे असें मार्क्सवादी म्हणतो. त्याचें म्हणणें एवढेंच, कीं तो दडपशाहीनें नष्ट होत नाहीं; त्याचे मार्ग निराळे आहेत.

## सोव्हिएट सरकारचें धोरण

ह्या बाबतींत एंजल्स आणि लेनिन ह्यांचे दोन दंडक होते. एक म्हणजे सरकारनें धर्म ही खाजगी बाब आहे असें जाहीर करावें, आणि दुसरी म्हणजे धर्म आणि शिक्षण ह्यांची फारकत करण्यांत यावी. बाकी सर्व सोव्हिएट नागरिकांना संपूर्ण धार्मिक स्वातंत्र्य देण्यांत यावें.

चर्चला सालिना जो साडेतीन कोटींचा भत्ता मिळत होता तो वरील दंडकानुसार १९१८ साली सोव्हिएट सरकारने बंद केला आणि धर्माबाबत घटनेंत खालील तरतूद केली—

(१) चर्च राज्ययंत्रापासून पूर्ण विभक्त राहील.

(२) कोणताहि सोव्हिएट नागरिक कोणताहि धर्म आचरूं शकेल किंवा आचरणारहि नाहीं. ( सर्व सरकारी कागदपत्रांतून नागरिकांच्या धर्माबद्दलचा सर्व उल्लेख पूर्णपणें वगळण्यांत येईल. )

(३) शांतता व नागरिक हक्क ह्यांच्या आड न येणारें सर्व प्रकारचें धार्मिक, विचार व आचारस्वातंत्र्य प्रत्येकाला आहे.

(४) भौतिक आणि धार्मिक शिक्षण सर्वस्वीं वेगळें करण्यांत येऊन चर्चला भौतिक शिक्षण देण्याचा अधिकार नाहीं असें जाहीर करण्यांत आलें.

(५) चर्चला खाजगी मालमत्ता बाळगण्याचा अधिकार नाहीं. परंतु धार्मिक आचाराकरितां आवश्यक असणाऱ्या इमारती आणि इतर वस्तु सरकारच्या परवानगीनें फुकट वापरतां येतील.

सोव्हिएट घटनेंत केलेल्या ह्या व्यवस्थेवरून मार्क्सवादाच्या आणि लेनिनच्या दंडकानुसार धर्माविरुद्ध कसलेंहि युद्ध न पुकारतां खरेंखुरें धार्मिक स्वातंत्र्य सोव्हिएट युनियननें लोकांना दिलें. ह्या घटनेप्रमाणें धर्मस्वातंत्र्य नर मर्यादित झालें नाहींच, पण जुन्या राजवटींत राशियन खिस्ती धर्म न मानणारांवर जो जुलुम होई ( उदाहरणार्थ—ज्यूंवरील झारशाहींतले निर्बंध ) तो मात्र नाहींसा करण्यांत आला.

## धर्मछळाचें थोतांड

मग रशियांत धर्माची मुस्कटदाबी करण्यांत येऊन धर्मगुरूंचा अनन्वित छळ करण्यात येतो असा जो प्रचार सर्व जगभर करण्यांत आला तो कां ? त्याला आधार कसला ? रशियांत घडलेल्या कांहीं घटनांना अत्यंत विकृत स्वरूप देऊन, रशियन क्रांतीने धाबें दणाणून गेलेल्या व्यक्तींनीच हा लांडा उपद्व्याप केलेला आहे. रशियांतील कांहीं धर्मगुरूंना मृत्युलोकाचा रस्ता दाखविणें भाग पडलें ही गोष्ट खरी; परंतु त्यांनीं आपल्या हातानेंच मृत्यूचें संकट आपणांवर ओढून घेतलें त्याला कोण काय करणार ? नव्या समाजवादी

सरकारनें धर्माबाबत उदारतेचें धोरण स्वीकारलें; परंतु क्रांतिपूर्व कालांत—झारशाहींत—वाटेल तशी मजा मारायला मिळणाऱ्या कांहीं भटां-भिक्षुकांची या नव्या समाजव्यवस्थेंत अगदींच गैरसोय झाली. स्वाभाविकच ते असंतुष्ट होऊन कामगारसत्तेविरुद्ध कारस्थानें करूं लागले. लोकांच्या धार्मिक समजुतींचा फायदा घेऊन ते त्यांना सोव्हिएट सरकारविरुद्ध चिथावण्याचा प्रयत्न करूं लागले. सोव्हिएट सरकारने जमीनदारांविरुद्ध जमिनींच्या सामुदायकीकरणाची ( Collectivisation ) मोहीम सुरू केली तेव्हां खेड्यापाड्यांतील जमीनदारवर्ग सरकारविरुद्ध प्रमुख हत्यार म्हणून धर्माचा उपयोग करूं लागला. लोकांच्या अज्ञानजन्य भोळ्या समजुती व दैवी चमत्कारांवरील अंधविश्वास ह्यांचा उपयोग धर्मोपदेशक शेतकऱ्यांना सरकारविरुद्ध चिथावण्यासाठीं करूं लागले. अर्थातच सरकारनें कडक धोरण स्वीकारलें आणि त्यांत बऱ्याच भटाभिक्षुकांची आहुति पडली.

ह्याहीपेक्षां नीचपणाचें उदाहरण धर्मगुरु तिखॉन ह्याचें. १९२१-२२ च्या दुष्काळांत लोक किडामुंगीसारखे पटापट मरत होते. लोकांच्या पोटावर पाय देऊन चर्चनें जमविलेलें सोनें, रुपें, जवाहिरादि अगणित संपत्ति दुष्काळ-निवारणासाठीं उपयोगांत आणावी अशी विनंति कांहीं खालच्या धार्मिक अधिकाऱ्यांनीं व नागरिकांनीं केली. त्याप्रमाणें मध्यवर्ति कार्यकारी मंडळानें ठरावसुद्धां पास केला. परंतु चर्चचा मुख्याधिकारी तिखॉन ह्यानें ताबडतोब वरील गोष्टीला विरोध करून आपल्या हाताखालील लोकांनी वरील हुकुमाला धाब्यावर बसवावें असें आज्ञापत्र काढलें. लाखों लोक अन्नान्न करून मरत असतांना अगणित संपत्ति उराशीं बाळगून हा रशियन ख्रिस्त्यांचा शंकराचार्य कोणत्या स्वर्गाला जाणार होता कुणाला ठाऊक ! माणुसकीला लाजविणाऱ्या या धर्मगुरूच्या वर्तनानें कुणालाहि चीड आल्याशिवाय राहणार नाहीं. लोक भुकेने अगतिक झाल्यावर त्याच भुकेच्या खाईत सोव्हिएट सत्ता गडप होईल असा कदाचित त्याचा डाव असावा—नव्हे होताच. तेव्हां सरकारने संगिनी

रोखून चर्चची मालमत्ता जप्त केली आणि भिक्षुकांच्या त्या राक्षसी राजाला फांसावर लटकावलें हें बरोबरच केलें.

परंतु ह्या गोष्टी रशियाविरोधी पत्रांतून कधींच प्रसिद्ध झाल्या नाहींत. फक्त सोविएट राज्यांत धर्माचा अनन्वित छळ होतो असा खोडसाळ प्रचार मात्र त्यांनी सुरू केला. परंतु वस्तुस्थिति लक्षांत घेतली म्हणजे सोव्हिएट सरकारची मोहीम धर्माविरुद्ध नसून धर्माच्या नांवावर क्रांतीला विरोध करणाऱ्यांविरुद्ध होती हें लक्षांत येईल. परंतु ह्या गोष्टीचा कामगारांच्या हितशत्रूनीं कामगारांत फूट पाडण्यासाठीं एक हत्यार म्हणून उपयोग करून घेतला. कारण जगांतील कामगारवर्ग अजून इतका पुढारलेला नव्हता. त्यांचा धर्मावर बराच विश्वास होता. निदान धर्मस्वातंत्र्याचा खून तरी त्यांना आवडत नव्हता.

## नव्या घटना

परंतु आतां सोव्हिएट रशियांतील परिस्थिति बदललेली आहे. मॉस्को येथें रशियन चर्चची मध्यवर्ति संघटना स्थापन करण्यास सोविएट सरकारनें संमति दिली. पूर्वी रशियांत धर्मस्वातंत्र्य असलें तरी धर्मगुरूंच्या कुटिल कारवायांमुळें त्यांच्यावर कडक नियंत्रण घालणें आवश्यक होतें ; पूर्वीच्या भांडवलशाही युगांतलें प्रतिक्रांतिकारक अवशेष अजून कायम होते. आणि आपल्या कारस्थानाकरितां ते धर्माचा उपयोग वरचेवर करून घेत होते. त्यामुळें सोविएट सरकारला वारंवार धार्मिक बाबतींत हस्तक्षेप करावा लागत असे व त्याचाच फायदा घेऊन बाह्य जगांतील रशियाचे हितशत्रू 'रशियांत धर्मावर अत्याचार होत आहे' असा ओरडा करीत होते.

परंतु आतां परिस्थिति बदललेली आहे. जुना परागतिवादी वर्ग नाहींसा झाला असून खरोखरीची वर्गहीन समाजव्यवस्था अस्तित्वांत येत आहे. गेल्या पंचवीस वर्षांत सोव्हिएट सत्तेचे अंतस्थ शत्रू अवशेषरूपाने अस्तित्वांत होते आणि बाहेर हें एकुलतें एक कामगार-राज्य सर्वत्र शत्रूंनीं वेढलेलें होतें.

अर्थातच आदर्श वर्गहीन समाजांतील निर्भेळ स्वातंत्र्य प्रस्थापित करणें सर्वस्वीं शक्य नव्हतें. आज त्या अंतःस्थ शत्रूंचा निःपात झाला आहे. बाहेरील परिस्थिति आजच्या युद्धाने पुष्कळच बदलून गेली आहे. पूर्वी धर्मगुरु सोव्हिएट सत्ता उलथून पाडण्याचा प्रयत्न करीत असत ; परंतु आज रशियांत जे कांहीं थोडेबहुत धर्मावर विश्वास असलेले लोक आहेत ते पुरोगामी सोव्हिएट सत्तेचे भक्त आहेत. युद्धांत त्यांचे धर्मगुरूसुद्धा ज्या मनोभावाने मातृभूमीची सेवा करीत होते त्यावरून ही गोष्ट स्पष्ट होत आहे. अर्थातच धार्मिक बाबतींतसुद्धां संपूर्ण स्वातंत्र्य- संघटनास्वातंत्र्य सुद्धा- देतां येणें आजच्या काळांत शक्य झालें. सोव्हिएट पद्धतीचा हा प्रचंड विजय आहे. वर्गविहीन समाजपद्धतीच्या दिशेनें पडलेलें हें पुढचें पाऊल आहे.

## ह्याचें जागतिक महत्त्व

वरील घटनेला जागतिक दृष्टया कांहीं महत्त्व आहे किंवा नाहीं हाहि एक महत्त्वाचा प्रश्न आहे. आज जगांत साम्राज्यशाहीविरोधी प्रचंड लढा चालू आहे. सबंध जगांतील जनतेमध्यें प्रचंड आंदोलन उठलें असून या जनतेचा रशियाला वाढता पाठिंबा मिळत आहे. परंतु त्याचबरोबर जनतेंत फूट पाडायचे प्रयत्नही जनतेचे शत्रू निरनिराळ्या उपायांनीं करीत आहेत. त्यांच्या अनेक हत्यारांपैकीं 'रशियांत धर्माची मुस्कटदावी होते' असा प्रचार हें एक प्रमुख हत्यार होतें. आज तें गळून पडलें असून रशियांत खरोखरच धर्मावर नियंत्रण नाहीं अशी धार्मिक प्रवृत्तीच्या लोकांची सुद्धां खात्री पटत आहे. त्यांचाहि पाठिंबा सोव्हिएट रशियाला मिळत आहे. अशा रीतीनें साम्राज्यविरोधी जनतेच्या संग्रामांत जनतेची वाढती एकजूट व्हायला ह्या घटनेनें मदत होत आहे.

■

# 'चुकची' जमातीची प्रगति

लेखक अ. रा. कामत

आदिवासी या सर्वसामान्य नांवानें संबोधल्या जाणाऱ्या गोंड, भिल्ल, संताळ, नागा, वारली वगैरे अनेक जमाती हिंदुस्थानच्या निरनिराळ्या भागांत राहतात. मुंबई इलाख्यांत एकूण लोकसंख्येपैकीं शेंकडा ७ लोक आदिवासी आहेत; मध्यप्रांतांत हें प्रमाण शेंकडा २०, तर आसामांत शेंकडा ३० इतकें मोठें आहे. हिंदुस्थानांतील आदिवासींची लोकसंख्या तीन कोटींहून अधिक असावी. म्हणजे दर अकरा लोकांत एकजण आदिवासी आहे.

या वन्य जमाती संस्कृतीच्या निरनिराळ्या अवस्थांप्रत पोंचलेल्या आहेत. त्यांपैकीं सर्वांत सुधारलेले लोक इतर हिंदी जनतेंतील सर्वांत दलित जनतेच्या तोडीचे आहेत. कांहींना नांगर ही चीज माहीत नाहीं; पण जंगलें जाळून व त्यावर बीं पेरून ते शेती करतात. कांहींना अशा शेतीचाही गंध नाहीं; आणि कांहींतर अगदीं रानटी अवस्थेंत आहेत. निरनिराळ्या जमाती निरनिराळ्या अवस्थेंत असल्या तरी जमातींतील धर्मप्रमुख, सावकार, जमीनदार व सरकारी अधिकारी यांच्या असीम पिळणुकीखालीं सर्व आदिवासी अगदीं दडपले गेले आहेत. वेठ-बिगार, मारपीट, स्त्रियांवर अत्याचार हे प्रकार नित्याचेच.

ब्रिटिश राजकर्त्यांनीं वन्य जमातींविषयीं कोणतेंहि एक निश्चित धोरण स्वीकारलेलें नाहीं. सरकारने हे सर्व प्रदेश कमीअधिक प्रमाणांत "अलग" राखले आहेत, पण आदिवासींवरील जुलूम कमी होण्यास त्यामुळें मदत झालीच असें नाहीं. उलट, बाहेरचा संबंध येऊं न देतां या जमाती निरंतर या प्राथमिक अवस्थेंत राहूं द्याव्या असें कांहीं परकीय वंशशास्त्रज्ञांचें जें म्हणणें आहे, त्याला सरकारच्या वरील धोरणानें अप्रत्यक्षपणें पाठिंबाच

मिळत आहे. खरी गोष्ट अशी आहे, कीं सर्वसाधारण हिंदी जनतेविषयीं ब्रिटिश साम्राज्यशाहीचें जें धोरण आहे, तेंच धोरण या आदिवासी जनतेविषयींहि आहे; आणि याहून वेगळें धोरण कोणतेंहि साम्राज्यशाही सरकार ठेवील अशी अपेक्षा करणें व्यर्थ आहे.

पण स्वतंत्र हिंदुस्थानांत आदिवासींचें स्थान कोणतें राहील? त्यांची प्रगति कशी घडवून आणावयाची? त्यांना आपल्या इतर हिंदी बांधवांच्या-बरोबर शक्य तितक्या वेगानें कसें नेतां येईल? या सर्व प्रश्नांचा काळजीपूर्वक फेरविचार करून राष्ट्रीय पुढाऱ्यांनीं व इतर विचारवंतांनी एक निश्चित व्यापक धोरण ठरविण्याची वेळ आतां आली आहे. केवळ भूतदयावादानें व नुसत्या शाळा–दवाखाने स्थापून हा प्रश्न सुटणार नाहीं. शिक्षण व संस्कृति यांच्या प्रसाराबरोबर आर्थिक दैन्य दूर झालें तरच संस्कृतीची पाळेंमुळें खोलवर जातात. ठाणें जिल्ह्यांतील हजारो "वारल्यां"नी वेठ–बिगारीविरुद्ध प्रचंड लढा उभारून आपल्या गाऱ्हाण्यांना व या व्यापक प्रश्नाला तोंड फोडलें आहे व त्यावरून ही गोष्ट उघड झाली आहे.

झारशाहीला उलथून टाकल्यावर सोव्हिएट सरकारने आपल्या देशांतील वन्य जमातींचा प्रश्न लागलीच हातीं घेतला. त्यांचें याविषयीं एक निश्चित व्यापक धोरण आणि कार्यपद्धति आहेत. प्रिं. धनंजयराव गाडगीळ यांच्या मतें, वन्य जमातींना सुधारण्यासाठीं आजवर जगांत जे प्रयत्न झाले त्यांमध्यें सोव्हिएट प्रयत्नांनाच सर्वांत अधिक यश आलेलें आहे. ( Federating India, pp. 74–75 ). अर्थात त्यापासून आपल्याला शिकण्यासारखें पुष्कळ आहे. आदिवासींयांच्या सोव्हिएट धोरणाचा सांगोपांग वृत्तांत देण्याचें हें स्थळ नव्हे. फक्त 'चुकची' या जमातींत शैक्षणिक व सांस्कृतिक प्रगतीची ध्वजा कशी नेण्यांत आली याचा मराठी वाचकांस परिचय करून देण्याचा या लेखकाचा उद्देश आहे. देशकालपरिस्थिति भिन्न असल्यामुळें वरवर पाहणारांस चुकचींचा प्रश्न आपल्याकडील आदिवासींच्या प्रश्नाहून वेगळा आहे

असें भासेल. पण थोडा खोलवर विचार केल्यास अंतर्यामींची समस्या सर्वत्र एकच आहे याची सहज खात्री पटेल.

अफाट विस्तार, अचाट थंडी आणि अति विरळ लोकवस्ती याविषयीं सोविएट देशामधील सायबेरिया हा उत्तरेकडील भूप्रदेश प्रसिद्ध आहे. चुकोट द्वीपकल्प सायबेरियाचा ईशान्येकडील भाग असून त्याच्या पूर्वेकडे बेअरिंगची सामुद्रधुनी व उपसागर आणि दुसऱ्या बाजूला आर्क्टिक महासागराचा लॅरेन्स उपसागर हा फाटा येतो. वर्षातून सहा-आठ महिने येथें समुद्र गोठलेला असतो आणि वर्षभर कमालीची थंडी असते. शेवाळ, नेचे आणि क्वचित खुरटीं झुडुपें यांशिवाय इतर कोणतीहि वनस्पति या प्रदेशांत उगवत नाहीं.

निसर्गाची इतकी अवकृपा असल्यावर या प्रदेशांत मनुष्यवस्ति दाट असणार तरी कशी ? आठदहाशें मैल लांब व पांचशें मैल रुंद अशा या प्रदेशांत एकूण लोकसंख्या एक लाखाहून कमी आहे आणि त्यामध्यें चुकची व एस्किमो या दोन प्रमुख जमाती आहेत. बर्फमय प्रदेशांत सापडणाऱ्या प्राण्यांची शिकार हेंच त्यांचें उपजीविकेचें साधन. समुद्र वितळल्यावर त्या दोनचार महिन्यांत सील व वॉलरस पकडणें आणि आठ महिन्यांच्या हिवाळ्यांत पोलर कोल्हे, अस्वलें व इतर केसाळ कातड्याच्या प्राण्यांची शिकार करणें हा त्यांचा निर्वाहाचा व्यवसाय वर्षानुवर्षें चाललेला असतो. खायला कच्चें मांस, पेहेरायला केसाळ आणि इतर कातडीं व प्रकाश आणि ऊब यांसाठीं प्राण्याची चरबी असें चुकचीच्या जीवनाचें थोडक्यांत वर्णन करतां येईल.

चुकची लोक राहण्यासाठीं चिखल, माती व बर्फ यांच्या साहाय्याने सर्व बाजूंनीं बंदिस्त अशा ठेंगण्या, गुहेसारख्या झोंपड्या बांधतात. उबेसाठीं आंत चरबीचा नंदादीप अखंड तेवत असतो. दार इतकें ठेंगणें असतें कीं आंत शिरतांना रांगत जावें लागतें आणि झोंपडींत गेल्यावर सर्व व्यवहार बसून

अथवा ओणव्याने करावे लागतात. हवा खेळती राहण्याची सोय नसल्यामुळें झोपड्यांच्या आंत विलक्षण उकाडा होतो. अंगावरील जाड कातडी कपडे काढून टाकावे लागतात. दहापंधरा मैलांच्या अंतरानें पांचसात यारंग ( झोपड्या ) याप्रमाणें ही वस्ती चुकोट भूमींत पसरलेली आहे.

असा हा खडतर आयुष्यक्रम कंठणारे लोकसमूह संस्कृतीच्या अगदीं प्राथमिक अवस्थेंत असल्यास त्यांत नवल कोणतें? एप्रिल ते ऑगस्ट या तीनचार महिन्यांतच काय तें चुकचींचें बाहेरच्या जगाशीं समुद्रमार्गाने दळणवळण होऊं शकतें. ( अलीकडे सोव्हिएट देशाच्या इतर भागाशीं विमानें व बिनतारी या साधनांनी वर्षभर संबंध ठेवतां येतो. ) चुकोट भूमींत अंतर्गत वाहतुकीचें मुख्य साधन म्हणजे कुत्र्यांनी ओढल्या जाणाऱ्या सपाट तळाच्या, वर्फावर घसरणाऱ्या गाड्या. कुत्रा हा चुकची लोकांचा घोडा अथवा बैल समजण्यास हरकत नाहीं.

चुकचींच्या भाषेला लिपि तर नाहींच आणि शब्दसंख्याहि अतिशय लहान. संस्कृतीच्या खालच्या पायऱ्यांवर असलेल्या जमातींमध्यें विलक्षण रूढि व समज प्रचलित असतात. तसे ते चुकचींमध्येंहि आहेत. भुतेंखेतें जादूटोणा, मंत्रतंत्र यांवर त्यांची भलतीच श्रद्धा असते आणि शमान ( टोळीचा धर्मप्रमुख ) सांगेल तें प्रमाण, अशी स्थिति असते. तोच त्यांचा धर्मगुरु आणि वैद्य ! या शमानांचें जबरदस्त आर्थिक व सामाजिक वर्चस्व सर्व जमातीवर असतें. वास्तविक या सर्व गोष्टी "होत्या" असें म्हटलें पाहिजे; कारण आता यांमध्यें कितीतरी बदल झाला आहे व तें सांगण्याचा तर या लेखाचा उद्देश आहे.

चुकची लोक मनानें मोठे उदार, कमालीचे प्रामाणिक आणि अतिशय आतिथ्यशील आहेत. आलेल्या पाहुण्याला "चाय" ( चहा ) प्यायल्याखेरीज जाऊं देणार नाहींत. चुकची दिलेला शब्द कधींच मोडणार नाहीं व दुसऱ्याच्या वस्तूंना कधीं हात लावणार नाहीं.

झारशाहीच्या काळांत अनेक रशियन व्यापारी उन्हाळ्यामध्यें चुकोट भूमींत येत असत. केसाळ कातडीं आणि सील व वॉलरसची चामडीं देऊन चुकची लोक त्याबद्दली त्यांना अतिशय प्रिय असलेली " चाय, " साखर, काडतुसें आणि इतर वस्तु खरेदी करीत असत. अतिशय मौल्यवान केसाळ कातडीं गरजू चुकचीकडून अगदीं मातीमोल भावानें घेऊन हे लबाड रशियन व्यापारी त्यांना अक्षरश: लुबाडीत असत. जादा अमली बनविलेल्या व्होडका दारूची बाटली देऊन त्याऐवजीं दोनचारशें रूबल किंमतीचें कातडें उपटण्यांत ते पटाईत होते. आणि व्होडकाचा अंमल चढल्यावर चुकचींना बुचाडणें त्यांना अधिकच सुलभ होत असे. भांडण झाल्यास रशियन साम्राज्यशाहीचीं सर्व आधुनिक शस्त्रास्त्रें या व्यापाऱ्यांच्या पाठीशीं सदैव सज्ज होतींच ! या व्यापाऱ्यांच्या सान्निध्यामुळें चुकचींना कधींकधीं नवनवे आजार जडत आणि चुकचीचें वैद्यकीय ज्ञान अगदींच प्राथमिक अवस्थेंत असल्यामुळें शेंकडों चुकची पटापट मृत्युमुखीं पडत. चुकची जनतेला हे " टँजी " ( गोऱ्या तोंडाचे ) व्यापारी संकटाप्रमाणें भासल्यास आश्चर्य नाहीं. पण आवश्यक असलेल्या वस्तु मिळविण्याचा दुसरा कांहींच मार्ग नसल्यामुळें त्यांना या व्यापाऱ्यांशीं संबंध ठेवावाच लागे.

१९१७ सालीं रशियामध्यें झारशाही उलथून पडली आणि समाजवादी सोव्हिएट सत्ता स्थापन झाली. मागासलेल्या जमातींची आर्थिक व सांस्कृतिक उन्नति घडवून आणून, शक्य तितक्या लवकर त्यांना इतर सुधारलेल्या बांधवांच्या बरोबरीचें स्थान मिळवून देणें हें या नवीन सरकारचें धोरण होतें. याला अनुसरून चुकची जमातीच्या प्रगतीसाठीं लॉरेन्स उपसागराच्या तोंडाशीं एक संस्कृतिकेंद्र ( Kultbaz ) स्थापण्यांत आलें. मॉस्को विश्वविद्यालयांत या उत्तरेकडील जनसमूहांचा विशेष अभ्यास करण्यासाठीं एक खास विभाग काम करीत होता. त्या विभागातर्फे पांचसहा उत्साही रशियन तरुण व एक तरुण शिक्षिका या संस्कृति केंद्रांत येऊन दाखल झाली. जन

सेवा, देशाभिमान व स्वार्थत्याग यांनीं प्रेरित झालेली ही मंडळी या प्रदेशांत संस्कृतीचा झेंडा रोवणारे अग्रदूत होते असें म्हटलें पाहिजे.

या केंद्रासाठीं एक बरीशी इमारत बांधण्यांत आली आणि तेथें एक दवाखाना, शाळा आणि व्यापारगृह सुरू करावयाचें ठरलें. व्यापारगृहातर्फे (स्टोअर) केसाळ कातडीं, चामडीं, चरबी योग्य भावानें विकत घेण्यांत येत व त्याबदली चुकची लोकांना आवश्यक वस्तु पाठविण्यांत येत. या नवीन मंडळींपैकीं फक्त एकालाच (सेमुश्किनला) काय ती चुकची भाषा बोलतां येत असे; तोच केन्द्रप्रमुख बनला. बाकीच्यांचा सर्व व्यवहार प्रथम प्रथम हावभावांनीं चालावयाचा! नंतर मात्र सर्वांनीच ती भाषा आत्मसात् केली.

हे टँजी आपल्या भल्यासाठीं आले आहेत हें प्रथम चुकचींना खरेंच वाटेना! जुन्या काळांतील लुटारू रशियन व्यापाऱ्यांचे हे भाईबंद आपल्या हितासाठीं येतील याची खात्री त्यांना कशी पटावी? पण देवघेवींतील प्रामाणिकपणा, कातड्यांच्या मोबदला मिळणाऱ्या वस्तूंची स्वस्ताई, व्होडकाचा अभाव आणि समानतेनें वागण्याची पद्धति हीं पाहून नव्या 'टँजी' विषयीं त्यांच्यामध्यें हळूहळू विश्वास निर्माण होऊं लागला. केंद्रातर्फे प्रथम दवाखान्याला सुरवात करण्याचा बेत होता; पण शतकानुशतकें अंधश्रद्धेच्या व शामानगिरीच्या जबरदस्त दडपणाखालीं राहिलेल्या चुकचीला या परकीय रशियन डॉक्टरविषयीं एकदम श्रद्धा कशी वाटावी? तशांत त्यांचा तो सर्व जामानिमा व साधनसामग्री. त्याला बुजून डॉक्टरच्या वाऱ्यालासुद्धां कोणीहि उभा रहात नसे. स्वतःच्या सहकाऱ्यांच्या प्रकृतीची काळजी घेण्याशिवाय डॉक्टरला पहिल्या सबंध वर्षांत दुसरा कोणताच उद्योग नव्हता!

शाळा चालू करावी तर तीहि गोष्ट सोपी नव्हती! लोकवस्ती विरळ, तेव्हां मुलांना आईबापांपासून दूर वसतिगृहांत राहावें लागणार. चुकची

आईबाप याला कबूल कसे होतील हा प्रश्नच होता. सेमुश्किनला (केंद्रप्रमुख) थोड्याशा प्रयत्नानें शाळेच्या वरकामासाठीं एक मुका चुकची मिळाला होता. त्याला घेऊन सेमुश्किननें शेंदीडशें मैलांच्या टापूंतील चुकची वस्तीमध्यें दौरा काढला. शाळेला मुलें मिळविण्याच्या कामीं त्याला एका वडीलधाऱ्या चुकचीची मदत झाली. या म्हाताऱ्याला चुकची जमातींत बराच मान होता. त्याचा सेमुश्किनशीं अलीकडे विशेष परिचय झाला होता आणि हे नवे "श्वेतमुख" लबाड नाहींत याची त्याला खात्री पटली होती. या वृद्ध चुकचीनें शमामच्या धमकावणीला भीक न घालतां आपल्या नात्यांतील चुकचींना शाळेंत मुलें पाठविण्याचा सल्ला दिला. वडीलधाऱ्या मनुष्यानें खात्री दिल्यामुळें इतर चुकचींनीहि आपलीं मुलें पाठविण्यास फारसे आढेवेढे घेतले नाहींत. अखेर शाळकरी वयाचीं आठ ते पंधरा वर्षांचीं तीसपस्तीस मुलें घेऊन सेमुश्किनची स्वारी केंद्रापाशीं दाखल झाली आणि शाळेला सुरवात झाली.

या मुलांना नवें वातावरण अगदी अपरिचित होतें. स्वच्छ फरशीची जमीन, पांढऱ्याशुभ्र भिंती, उंच छत, खुर्च्या-टेबलें, दिवे, सारेंच विलक्षण! त्यांनीं भिंतींना रेलून भिंती किती मजबूत आहेत हें अजमावलें ; नखांनीं टेबलें कुरतडून पाहिलीं आणि फरशीवर हळूच हात फिरवून पाहिला. या वस्तूंचे गुणधर्म पाहण्यांत पहिल्या दिवसाचा वेळ गेला. जेवणाची वेळ होईपर्यंत त्यांनीं खुर्च्यांवर बसण्याचें तंत्र कसेंबसें आत्मसात् केलें; पण जेवतांना एक मोठीच अडचण उपस्थित झाली! चुकचींना मीठ अजिबात निषिद्ध असतें. भाजी-आमटीला कोणी शिवेना. शेवटीं ब्रेड आणि चाय यांवरच ती वेळ भागविण्यांत आली!

स्वच्छतेचें नांवच या मुलांना माहीत नव्हतें. हात तोंड धुणें शिकविण्या-पासून सुरवात ; मग दातांचा ब्रश, साबण, टॉवेल कां व कशीं वापरायचीं हें त्या बिचाऱ्यांना कसें कळणार ? कापसाचे व लोकरीचे कपडे त्यांनीं

हाताळून पाहिले व त्यांना ते आवडलेहि, पण केसाळ कातड्यांचा पोशाख टाकून हे नवे कपडे घालण्याइतकी मनाची तयारी होण्यास थोडा काळ जावा लागला. कपडे स्वच्छ ठेवावे हें मनावर बिंबण्यास मात्र बरेच दिवस जावे लागले. तेथपर्यंत तीं स्वच्छ कपडे खुशाल खाटेखालीं फेकून देत !

पहिल्या रात्रीं झोपण्याची वेळ झाली तशी शिक्षकानें त्यांना बिछाने टाकलेल्या खाटा दाखवून दिवा मालविण्याची तयारी केली. पण अंधारांत झोपण्यास मुलें राजी होईनात. तसेंच दोन खोल्यांमधलें दार उघडें राहिलें पाहिजे असा आग्रह त्यांनीं धरला. बंद खोलींत व अंधारांत झोपल्यास रात्रीं भुतें येऊन आपला फडशा उडवतील अशी त्यांची पक्की समजूत होती ! हें सर्व झालें तरीही मुलांना झोप लागली आहे का नाहीं हें पाहण्यासाठीं शिक्षक मोठ्या रात्रीं आला तेव्हां त्याला एक विलक्षण दृश्य दिसलें. सर्व खाटा रिकाम्या आणि दारापाशीं सर्व मुलें गटागटांनीं एकमेकांना घट्ट बिलगून जमिनीवर झोपलेली ! दिवसाच्या श्रमानें त्यांना निद्रा आली. पण त्या निद्रेंतहि तीं भ्यालेलीं व अस्वस्थ दिसत होतीं. खाटेवरील बिछान्यांत अलगअलग झोपण्याची त्यांना फार भीति वाटली असली पाहिजे हें उघड आहे.

शाळा सुरू झाली ; पण नव्या अभ्यासक्रमाला मुलें रुळेपर्यंत रूढ अर्थानें शिक्षणास आरंभ करणें इष्ट नव्हतें. या बालकांना त्यांच्या दैनंदिन जीवितामधूनच संस्कृतीची प्राथमिक ओळख होत होती. नवें आयुष्य हेंच एक प्रकारें त्यांचें शिक्षण होतें. पण यामध्येंहि भाषेची मोठीच अडचण होती. चुक्ची भाषेचा एकमेव पंडित फक्त सेमुश्किन. बाकीच्यांना मुलांशीं मूक हावभावांनीं "बोलावें" लागे ! नाहीं म्हणावयास या मुलांपैकीं दोघांच्या आईबापांचा रशियनांशीं संबंध आलेला असल्यामुळें त्यांस थोडेसें रशियन समजे ; वर्गांत त्यांचा दुभाषी म्हणून मर्यादित उपयोग होई.

६८२७

कागदपेन्सिलीच्या मदतीनें " बोलकीं " येतें हें मुलांना पटवून देण्याच्या उद्योगास सेमुश्किन व त्याचे सहकारी लागले. कागदपेन्सिली पाहून मुलांचें कुतुहल जागृत झालें. पेन्सिलीच्या रेघोट्यांनीं त्यांनीं सर्व कागद व नंतर भिंती चितारून टाकल्या, कागदाचे कपटे करून घरभर पसरून टाकले. एकदोघांनीं पेन्सिलीचें अंतरंग पाहण्यासाठीं तिचीं दोन अर्धें केलीं आणि हें संशोधन पाहिल्यावर इतर सर्वांनीं स्वतः प्रयोग करून त्याविषयीं स्वतःची खात्री करून घेतली ! पण चित्रांचीं पुस्तकें, फळ्यावरील चित्रें व आकृति पाहिल्यावर कांहीं दिवसांनीं पुस्तकें, कागद हीं पेन्सिलीच्या मदतीनें " बोलकीं " करतां येतात याविषयीं त्यांची समजूत पटली. मग लिहिण्या-वाचण्याचा प्रश्न उकलणें तितकेंसें कठीण नव्हतें.

शिक्षणाला पद्धतशीर सुरवात होणार, इतक्यांत शाळेवर एक विलक्षण प्रसंग ओढवला. चुकचींना मुलांचा विलक्षण लळा असतो. आईबाप मुलांना अतिशय प्रेमानें व बरोबरीच्या नात्यानें वागवतात. आणि त्यांना एकमेकांचा विरह सहन करणें पराकाष्ठेचें जड जातें. म्हणूनच पालकांनी वाटेल त्या वेळीं मुलांना भेटून त्यांच्या खुशालीबद्दल स्वतःची खात्री करून घ्यावी असें धोरण आरंभापासून ठेवण्यांत आलें होतें. पालक रात्रीं अपरात्रीं केव्हांहि येऊन जात. प्रथमप्रथम दररोज कोणी ना कोणी पालक येतच असे. आपल्या मुलांस नेहमींप्रमाणें कच्चें मांस मिळत नाहीं ही गोष्ट आईबापांना विशेषेंकरून जाणवे. इतकी, कीं पुष्कळदां ते त्यांना कच्चें मांस चोरून आणून देत.

कांहीं दिवसांनीं मुलांना घरची ओढ इतकी अनावर झाली, कीं कांहीं मुलें सदा दुर्मुखलेलीं दिसूं लागलीं. एके दिवशीं बाहेर बर्फाचें भयंकर वादळ चालू असतां दोन मुलें शाळेंतून बेपत्ता असल्याचें आढळून आलें. तीं बहुधा वादळाआधींच घरीं पळालीं असावींत अशी बहुतेक शिक्षकांची खात्री होती. तरीहि या वादळांत सांपडून किंवा वाट चुकून जर का तीं

दगावलीं तर शाळेचा ग्रंथ येथेंच आटपावयाचा ! चुकोट भूमींत अतिशय भयंकर वादळें होतात व कधींकधीं तीं दिवसदिवस चालू राहतात; आणि या अवधींत घराबाहेर पडणें मुष्किल होतें. वादळाचा जोर थोडासा कमी झाल्यावर सेमुश्किन आणि त्याचा चुचकी सोंगडी यांनीं कुत्र्याच्या गाड्या भरधांव सोडल्या. त्या मुलांच्या घरीं जाऊन पाहातात तर मुलें अगदीं सुरक्षित होतीं. काळजीचा भार दूर झाल्यामुळें सेमुश्किनला अतिशय हलकें वाटलें. शिवाय या त्याच्या अगत्यामुळें चुकचींचा सेमुश्किनवरील विश्वासही वाढला.

या घटनेपासून सेमुश्किन व त्याचे सहकारी यांनीं योग्य तो बोध घेतला. तीनचार दिवस सुट्टी घेऊन सर्व शिक्षक शिष्यांबरोबर चुकची वस्तींत रहावयास गेले. या चार दिवसांत शिक्षकांनीं चुकची जीवन अगदीं जवळून पाहिलें. जेवण, शिकार, झोंप, हिंडणें या दैनंदिन कार्यक्रमांत त्यांच्या बरोबरीनें भाग घेऊन त्यांनीं चुकची जीवनाचा अनुभव घेतला. शिक्षक व शिष्य यांमधील अंतर कमी होण्यास या सुट्टीची खूप मदत झाली. आधुनिक सुखसोयींना बुजणारीं हीं मुलें जात्या बावळट नसून चलाख आहेत याची त्यांना स्वानुभवानें खात्री पटली. शिकार साधतांना त्यांची नजर किती तीक्ष्ण असते व हालचाली किती चपळ असतात, पशुपक्ष्यांचे आवाज तीं किती बेमालूम काढतात, रशियनांसुद्धा सर्वांची नक्कल किती हुबेहुब वठवितात, या सर्व गोष्टींचें शिक्षकांनीं अवलोकन केलें. तसेंच या मुलांना आपलेंसें करण्यासाठीं चुचकी भाषा बिनचूकपणें, योग्य त्या ठेक्यांत बोलतां येणें किती आवश्यक आहे याची जाणीव त्यांना झाली. सुट्टी संपवून परततांना त्यांनीं एका वृद्ध चुचकी बाईचें मन वळवून मुलांची काळजी वाहण्यासाठीं तिला आपल्याबरोबर नेलें. या आत्याबाईला शाळेच्या जीवनाची संवय होण्यास बरेच दिवस लागले. कित्येक दिवस तिनें आपला जुना पोषाख सोडला नाहीं आणि ती बैठकहि जमिनीवरच मांडत असे; पण तिचा सहवास असल्यामुळें यापुढें मुलांना पूर्वीइतकें चुकल्याचुकल्यासारखें वाटत नसे.

असेच कांहीं दिवस गेल्यावर नव्या जीवनाविषयीं आश्चर्य व भीति यांचा आवेग मुलांच्या मनांतून ओसरूं लागला आणि शिक्षणामध्यें प्रगति होऊं लागली. प्रथम भाषेची अडचण तीव्रतेनें भासे; पण शिक्षकांना कामचलाऊ चुकची भाषा समजूं लागली तसतसें शिकविणें हि सुलभ झालें. या मुलांमध्यें तग्राई नांवाचा अतिशय बुद्धिमान मुलगा होता; तो पुढें बराच नांवारूपास चढला.

शिकवितांना चुकची जीवनांतील उपमा योजणें उपयुक्त ठरत असे. उदाहरणार्थ, प्रत्येक शब्दाला प्राण्याप्रमाणें डोकें, पोट व शेंपूट असतें असें म्हटलें कीं मुलें शब्दाचे अवयव ध्यानांत घेऊन ती लिहावयास शिकत. अंकगणित शिकवितांना ओळखीच्या वस्तूंभोंवती प्रश्न गुंफणें भाग असे. "तग्राईनें काल चार कोल्हे पाहिले व आज तीन पाहिले तर एकूण किती?" या प्रश्नांत कोल्ह्याऐवजीं वाघ असल्यास हा प्रश्नच "खोटा" आहे अशी मुलें एकदम ओरड करीत आणि त्याचा विचार करावयाचें नाकारीत! "खरे" प्रश्न तयार करणें हे शिक्षकाचें एक कामच होऊन बसलें. पुन्हा एखाद्या उदाहरणांत "तग्राईने काल शंभर सील मारले" असें विधान करावयाची सोय नव्हती. एका दिवसांत कोणालाहि शंभर सील मारतां येणें अशक्य असल्यामुळें मुलें हंसून तो प्रश्न सोडविण्याऐवजीं निकालांतच काढीत!

वर्ग चालू असतांना कित्येकदां आईबाप वर्गांत येऊन जमिनीवर आसन ठोकीत. त्यांना वर्गाचे धडे समजत नसले तरी मुकाट्यानें लक्ष देऊन ते सर्व गोष्टी पाहात व ऐकत. शाळेचें वरकाम पाहणारा मुका चुकची वर्गांत नेहमीं हजर असे; आणि कांहीं महिन्यांनीं "कॉमरेड, सिगारेट द्या. नाहीं मला सिगारेट!" अशी मोडकी-तोडकी चिठ्ठी डॉक्टरला पाठवून त्यानें सर्वांस एके दिवशीं गार केलें! वास्तविक तो बहिरा नसून फक्त मुका होता.

पण त्यानें शिकण्याकडे इतकें लक्ष पुरविलें असेल अशी शंका कोणासच आली नव्हती !

मुलांना लागणाऱ्या नव्या संवयी हळूहळू सर्व चुकचीं समाजांत पसरूं लागल्या. तोंड व हात स्वच्छ धुणें, स्वच्छ कपडे वापरणें, स्वच्छ आंघोळ करणें, डोक्यावरील केस कापून कमी करणें इत्यादींचें अनुकरण या शाळकरी मुलांची लहान भावंडें करीत आणि नंतर त्यांचा प्रौढ मनुष्यांत प्रवेश होई. संस्कृतीचें लोण अशा रीतीनें शाळेच्या द्वारा हळूहळू सर्वत्र पोंचण्यास सुरवात झाली.

पण केस कापणें व आंघोळ यांसाठीं प्रथम मुलांची किती मनधरणी करावी लागली ! कांहीं मुलें थोड्याशा समजुतीनंतर 'टँजी' सारखे छोटे केस ठेवण्यास तयार झाली. पण इतर सर्वांचे केस छोटे केल्यावरहि बरेच दिवस तग्राईने मात्र आपला हट्ट कायम ठेवला. डोक्यावरील जंगल उतरण्यास तो तयार होईना. अखेर एके दिवशीं त्याला काय वाटलें कोणास ठाऊक, सर्वांची नजर चुकवून तो डॉक्टरकडे गेला व डोळ्यांत अश्रू आणून "माझे केस लवकर कापून टाका" असा आग्रह धरून बसला ! सर्वांचे क्रॉप दिसत असतांना आपण तेवढे लांब केस वाढवून वेगळे दिसणें त्यास असह्य झालें असावें. आंघोळींची सवय लावण्यास असाच प्रयास पडला. त्यांच्या अंगाला पूर्वी कधीं पाणी लागलें असेल तर शपथ ! परंतु ऊन व गार पाण्यांत डुंबणें किती मजेदार असतें हें कळल्यावर मात्र त्यांना आंघोळींची इतकी चटक लागली, कीं न्हाणीघरांतून मुलांना बाहेर काढतांना पुरेवाट होई !

चित्रपट आणि संगीत यांचा सांस्कृतिक प्रगतीसाठीं बहुमोल उपयोग झाला. प्रथम बर्फमय टंड्रा प्रदेशांतील जीवनाविषयींचे चित्रपट दाखविण्यांत आले. कोल्हे, अस्वलें, सील व शिकारी पडद्यावर हालूं लागले कीं मुलें व प्रौढ माणसें एकदम स्तब्ध होत व या रशियन शमानगिरीकडे ( जादूटोणा )

टक लावून बसत. पियानो व फिडल वाजविणाऱ्या शिक्षकाभोंवतीं मुलांची गर्दी जमे. चुकची मुलांना अभिनयाची जात्याच आवड होती याचा उल्लेख वर आलाच आहे. नाट्यप्रवेश वसविण्यास आणि त्यांचे स्वतःचे नृत्यप्रकार नाचण्यास शिक्षक तऱ्हतऱ्हेनें उत्तेजन देत. मधूनमधून सणाच्या दिवशीं समारंभ साजरे करण्यांत येत. त्या वेळीं आसपासच्या सर्व चुकचींना आमंत्रण दिलें जाई. त्या दिवशीं समारंभाच्या भाषणाबरोबर चित्रपट, नाटक, संगीत, खेळ व नृत्य यांचा भरगच्च कार्यक्रम आखण्यांत येत असे. अशा प्रकारचा पहिला समारंभ पहिल्या टर्मच्या अखेरीस झाला, त्या वेळीं सिनेमा प्रोजेक्टर सांभाळणें, डायनामो फिरविणें इत्यादी कामें तम्राईच्या देखरेखीखालीं चुकची मुलांनीं पार पाडलेलीं पाहून सर्व चुकचींना आपली मुलें "गोऱ्या तोंडाच्या" रशियनांसारखीं हुशार बनलीं आहेत याबद्दल कौतुक व अभिमान वाटला.

चुकची जनतेंत नवीन कल्पनांचा प्रसार करण्याचें चित्रपट हें एक प्रभावी साधन ठरलें. सुट्टीच्या दिवसांत सेमुश्किन व तम्राई आपला फिरता सिनेमा कुत्रागाडींत घालून चुकची वस्तींत लांबलांब दौरे काढीत आणि त्या तसल्या ठेंगण्या यारंगांमध्यें चित्रपट दाखवीत. पाहायला सर्व खेडें—ज्या कांहीं सातआठ झोपड्या असतील त्या–जमत असे. तम्राई सिनेमा दाखविण्याच्या कामांत इतका प्रवीण झाला, कीं पुढेंपुढें तो एकटाच प्रवासी सिनेमा घेऊन हिंडत असे.

संस्कृतिप्रसारासाठीं हळूहळू डॉक्टर व त्यांचा दवाखाना यांची खूप मदत होऊं लागली. प्रथम डॉक्टरला कांहींच काम नसे ! शाळेच्या मुलांची नियमित तपासणी करणें व त्यांना आणि आपल्या सहकाऱ्यांना जपणें एवढेंच काम डॉ. "श्वासघ्या" यांना पडत असे. (मुलांनी डॉक्टरला "श्वासघ्या" असें खास नांव ठेवलें होतें !) जादूटोणा, मंत्रतंत्र आणि अगदीं रानटी उपाय हे शमानप्रणीत इलाज सर्व चुकचीच्या मतें कोणताहि आजार हटविण्यास रामबाण होते. अडलेल्या बाळंतिणीच्या पोटावर फळी

दाबून मूल काढीत—इतके रानटी प्रकार. परंपरागत चालत आलेले होते. शमानचें समाजावर इतकें जबरदस्त दडपण होतें, कीं कोणीही चुकची डॉक्टरकडे फिरकत नसे. अखेर डॉक्टरला पहिली केस मिळाली. एका मुलाच्या बेंबीला झालेला रोग डॉक्टरनें बरा केला. नंतर तग्राईनें आपल्या वहिणीला मोठ्या आग्रहानें बाळंतपणासाठीं दवाखान्यांत आणलें. तिची पूर्वींची बाळंतपणें अडलीं होतीं. प्रत्येक वेळीं मूल मृतावस्थेंत बाहेर येई. या खेपेस ती दवाखान्यांत सुखरूप बाळंत झाली व तिला मुलगा झाला. मुलगी न होतां मुलगा झाला याबद्दल वास्तविक डॉक्टरला कांहींच श्रेय नव्हतें. पण यामुळें तग्राईचे नातेवाईक डॉक्टर " श्वासघ्या " यांजवर अतिशय खूष झाले ! झालें, डॉ. " श्वासघ्या " यांची लोकप्रियता वाढीस लागली. नंतर त्यांनीं तग्राईच्या बापाच्या पाठीवरील बरेच दिवस वाहत असणारे गळूं बरें केलें. बर्फाच्या तीक्ष्ण धारेमुळें एका तरुणाचा पाय चिंचून तो मृत्युपंथास लागला होता. डॉक्टरनें त्याचा पाय कापला; तो चांगला बरा झाला. आतां डॉक्टरची प्रसिद्धी सर्वत्र होऊं लागली. पूर्वीं डॉक्टर रोग्याच्या घरीं जावयास तयार असूनहि रोगी मिळत नसे, तर आतां अनेक रोगी उपचारार्थ दवाखान्यांत राहावयास येऊं लागले. प्रथमप्रथम आजारी मनुष्याबरोबर त्याचें सर्व कुटुंब दवाखान्यांत मुक्काम करीत असे.

आतां शमानांचें वर्चस्व डळमळूं लागलें !

शेवटीं एका प्रसंगानें डॉक्टरची लोकप्रियता कसास लागली. एक चुकची मुलगा इन्फ्ल्युएंझानें खूप आजारी पडला. दवाखान्यांत आणावयास उशीर झाल्यामुळें डॉक्टरच्या हरप्रयत्नांस यश न येतां तो दगावला ! शमान अशा प्रसंगासाठीं टपून बसलेले होतेच. त्यांनीं डॉक्टर व नव्या सुधारणा यांविरुद्ध अत्यंत विपारी प्रचार सुरू केला. पण आश्चर्याची गोष्ट अशी कीं त्या मुलाच्या आईबापांनी डॉक्टरला बोल लावण्याचें साफ नाकारलें ! डॉक्टरने आपल्या प्रयत्नांची शिकस्त केल्याचें त्यांनीं आपल्या

डोळ्यांनीं पाहिलें होतें. डॉक्टरनें आपल्या मुलांची इतकी उत्तम काळजी घेतल्याबद्दल त्यांनीं उलट डॉक्टरचे आभार मानले. अशा प्रकारें शमानांचा डाव सपशेल फसला.

शमानांचा तात्पुरता पराभव झाला खरा; पण जुन्या रूढि व शमानांचें वर्चस्व यांविरुद्ध सुरू झालेला हा लढा दिवसेंदिवस तीव्र होणें अपरिहार्य होतें. तरुण शाळकरी मुलें एका बाजूस व शमान आणि म्हातारे एका बाजूस अशी चुकची जनतेची रस्सीखेंच सुरू झाली. शेकडों वर्षांचें जबरदस्त दडपण सुखासुखीं नाहींसें होणें शक्य नव्हतें. शमानविरोधी झगड्याचें एक उदाहरण अतिशय मनोरंजक आहे. आठ दिवसांनीं चंद्रग्रहण आहे हें संस्कृतिकेंद्रांतील सर्वांना माहीत होतें. ग्रहणाचा फायदा घेऊन तग्राई वगैरे मुलांनीं सर्व चुकचींच्या देखत शमानांना पौर्णिमेच्या दिवशीं चंद्र काळा करून दाखविण्याचें आव्हान दिलें. शमानने अर्थातच तें आव्हान उडवून लावलें. इकडे मुलांनीं त्या आठवड्यांत अमुक दिवशीं अमुक वेळेस चंद्र काळा होणार आहे आणि शमानांना ही गोष्ट माहीत नाहीं ही बातमी सर्वत्र पसरविली. पण तिकडे "हीं मुलें रशियनांच्या नादानें काय वाटेल तें भकतात," असें शमान सर्वांना सांगत होते. अखेर ठरल्या वेळीं चंद्रावर पृथ्वीची छाया पसरलीच. मुलें आनंदाने बेहोष झालीं आणि शमानांचा चेहरा चंद्रासारखा काळाठिक्कर पडला. त्या दिवसापासून शमानांवरचा लोकांचा विश्वास झपाट्यानें उडूं लागला.

पण शमानांनीं डूक धरून या तरुण चुकची मुलांस निरनिराळ्या प्रकारें भयंकर त्रास देण्यास सुरवात केली. पुढेंपुढें हे चुकची तरुण साक्षरता, स्वच्छता, नवीन विद्या इत्यादि साधनें खेड्यापाड्यांत पसरविण्यासाठीं झटूं लागले, तसतसे शमान त्यांच्या मार्गांत संकटांचे अनेक काटे पेरूं लागले. कारण यामुळें आयती बसून मिळणारी मिळकत, सुखासीन आयुष्य आणि समाजावरील वर्चस्व हे सर्व नाहींसें होणार हें त्यांना स्पष्ट दिसत होतें.

एकदोघां चुकची तरुणांना या संस्कृतीच्या लढ्यापायीं बलिदान करावें लागलें. पण अखेर शमानांचें उच्चाटण होऊन नव्या संस्कृतीचा विजय झाला.

दुचाकी, बिनतारी, टेलिफोन, रेडियो, विमान, मच्छीमारीसाठीं नवीन मोटारबोटी या सर्व साधनांचा चुकची जमातीला पुढें आणण्यासाठीं अतिशय उपयोग झाला. संस्कृतिकेंद्रापासून कांहीं मैलांवर सरहद्दसंरक्षणासाठीं असलेल्या लाल सेनेची छावणी होती. लाल सैनिक संस्कृतिकेंद्रास सर्वतोपरी मदत करीत असत. आपल्या नातेवाइकास पत्ता लागूं न देतां तग्राई त्या लाल सैनिकांकडून विमानविद्या शिकला. न जाणो, नातेवाइकांना हें समजल्यास त्याला त्यांनीं अडथळा केला असता. तग्राई लवकरच उत्तम वैमानिक बनला. एका समारंभाच्या प्रसंगीं जमलेल्या सर्व चुकचींच्या देखत तो आकाशांतून विमानानें एकटाच खालीं उतरला. सर्व चुकचींना आनंद, आश्चर्य व अभिमान यांचा केवढा विलक्षण धक्का बसला! चुकची जनतेमध्यें विमानें विलक्षण प्रिय झालीं आणि अनेकांनीं त्यांत बसण्याचा अनुभव घेतला.

पहिल्या वर्षीं शाळेंत दाखल झालेल्या मुलांमध्यें तग्राई अग्रेसर होता. शाळेंत शिकत असतांनाच सिनेमा दाखविण्यांत, आगबोटीवरील मेकॅनिकचें काम करण्यांत, विमान हांकण्यांत आणि इतर अनेक गोष्टी करण्यांत तो तरबेज झाला. डॉक्टरबरोबर तो बुद्धिबळें खेळे. आणि पुढेंपुढें त्यानें या खेळांत इतकें प्रावीण्य संपादन केलें, कीं डॉक्टरवर तो सहज मात करी; आणि अखेर अतिपूर्वेकडे असलेल्या लाल सेनेच्या प्रमुख बुद्धिबळपटूसहि त्यानें चीत केलें!

प्रथम आलेल्या मुलांपैकीं बहुतेकांनीं आठ वर्षांच्या अवधींत प्राथमिक व दुय्यम अभ्यासक्रम संपविला. त्यांपैकीं तग्राइ धरून पांच मुलें आणि एक मुलगी नंतर मॉस्को विश्वविद्यालयांत उच्च शिक्षणाकरितां दाखल झालीं. हीं सर्व तरुण मुलें आपल्या जमातीला पुढें आणण्यासाठीं उत्साहानें झटूं लागलीं.

या शैक्षणिक व सांस्कृतिक प्रगतीबरोबर आर्थिक उन्नतीही वेगानें होत होती. मच्छीमारी, शिकार यांसाठीं चुकची आतां अद्यवत् साधनें वापरूं लागले आणि पूर्वी व्यापाऱ्यांकडून होणारी पिळवणूक नाहींशी झाल्यामुळें त्यांच्या श्रमांना योग्य मोबदला मिळून त्यांच्या राहणीचें मान उंचावूं लागलें. या सर्वांचा त्यांच्या राहणीच्या पद्धतीवर परिणाम झाला व जीवन अधिक सुखाचें, सुसंस्कृत व समृद्ध बनूं लागलें. या उत्तरेकडील थंड प्रदेशांत दोन महिन्यांत पिकून तयार होणाऱ्या गव्हाच्या जातीची लागवड होऊं लागली आहे अशी वार्ता अलीकडे आली आहे. यावरून या प्रगतीची कांहींशी कल्पना येईल. विस्तारभयास्तव या सर्वांचा सविस्तर उल्लेख टाळणें भाग आहे.

शेवटीं सांगावयाची गोष्ट एकच. अवघ्या पंधरा वर्षांच्या अवधींत पूर्वी अतिशय दैन्यावस्थेंत राहणारी व मागासलेली जी चुकची जमात, तिनें आतां आपल्या इतर सुधारलेल्या सोविएट बांधवांच्या तोडीचें स्थान मिळविलें आहे. सोविएट देशाच्या मध्यवर्ति सोविएट सभेंत चुकोट भूमीचा प्रतिनिधि म्हणून एक चुकची गेलीं दहा वर्षें भाग घेत आहे.

REFBK-0006827

# ★ सोव्हिएट व अमेरिकन शेतकरी

सन १९४० सालीं, अमेरिकन शेतीसंबंधी पाहणी होऊन असें आढळून आलें कीं तेथील ६०,००,००० शेतवाड्यांपैकीं ४०,००,००० शेतवाड्यांची आर्थिक स्थिति आंतबट्ट्याची आहे. उरलेल्या २०,००,००० शेतमालकांना सुखवस्तु म्हटलें तरी त्यांच्यापैकीं अनेकांची स्थिति अगदीं कांठावरच आहे. सर्वच शेतकऱ्यांना मंदीच्या भीतीनें एकसारखें ग्रासलेलें असतें व कोणच्याही अमेरिकन शेतकऱ्याला त्याच्या शेतकामापासून सोडवणूक व विश्रांति मिळण्याची शक्यताच नसते.

उलट, सोव्हिएट सामुदायिक शेतवाड्यांची आर्थिक स्थिति अशी आहे कीं प्रत्येक शेतकऱ्याच्या वांट्याला येणारी मिळकत त्याच्या कौटुंबिक खर्चाला पुरेशी असून चैनीच्या वस्तूंवर मात्र थोडा खर्च परवडण्यासारखा आहे. वैद्यकीय मदत, पिकांचा विमा व मुलांची नर्सरीची व्यवस्था या सर्व गोष्टींसाठीं प्रत्येक शेतकऱ्याला आपल्या या वाट्यांतून कांहीं द्यावें लागत नाहीं. झारकाळांत ज्या शेतकऱ्याला वर्षाकाठीं २५ रुबल दिसत असत, त्याला आतां चार दहा लक्ष रुबल्स उत्पन्न असणाऱ्या सामुदायिक शेतवाडीच्या व्यवस्थेचा कारभार चालविण्यासाठीं प्रत्येक गोष्टींत लक्ष घालावें लागतें व मत द्यावें लागतें.

● ● ● "साएन्स ॲन्ड सोसायटी" या अमेरिकन मासिकाच्या सन १९४६ च्या भाग १० मधील मि. ऱ्हेम हॅरिस या अमेरिकन शेतकीतज्ञाच्या लेखांतील उतारा.

## लेखकांचा परिचय :

श्री. **के. ना. काळे**—सुप्रसिद्ध साहित्यिक आणि दिग्दर्शक. महाराष्ट्र साहित्य परिषदेतर्फे निघणाऱ्या त्रैमासिकाचे संपादक होते. रंगभूमि आणि सिनेमा या दोन्ही क्षेत्रांत वैशिष्ट्यपूर्ण अभिनय आणि दिग्दर्शन याविषयीं त्यांचा लौकिक आहे. सोव्हिएट सिनेमा आणि रंगभूमी याविषयीं त्यांचा दीर्घ व्यासंग आहे.

श्री. **पु. का. ओक**—नूतन मराठी विद्यालयाच्या दुय्यम शाळेंत शास्त्रविषयाचे अध्यापक. सोव्हिएट मित्रसंघ पुणें, या संस्थेचे सहचिटणीस. प्रासंगिक लिखाण करतात.

प्रि. **वा. य. कोल्हटकर**—एम्. ए., एम्. कॉम., एम्. एस्‌सी. (लंडन)- बडोदा येथील प्रतापसिंह कॉमर्स कॉलेजचे प्रिन्सिपॉल., राजकारण आणि अर्थकारण यावरील व्यासंगपूर्ण लेखनामुळें ते मराठी वाचकांच्या चांगले परिचयाचे आहेत. नाझीवाद आणि समाजवाद या विषयावर इंग्रजीमध्यें त्यांचें एक पुस्तक नुकतेंच प्रसिद्ध झालें असून त्यामध्यें जर्मनी आणि सोव्हिएट रशिया या देशांतील अर्थव्यवस्थेचें त्यांनीं विशेष विवेचन केलें आहे.

श्री. **शशिकांत पुनर्वसु ( मो. शं. भडभडे )**—न्यू इंग्लिश स्कूल ( पुणें ) या शाळेंत अध्यापक आणि सोव्हिएट मित्रसंघ पुणें या संस्थेचे सहचिटणीस. यांच्या अनेक लघुकथा आणि नाट्यछटा प्रसिद्ध झाल्या आहेत.

सौ. **प्रभावती जोशी**—हुजूरपागा ( मुलींची इंग्रजी शाळा ) पुणें, येथें अध्यापिका म्हणून काम करीत होत्या. सोव्हिएट रशियांतील मुलें आणि त्यांचें शिक्षण याविषयीं त्यांचा अभ्यास आहे.

**श्री. दि. वा. फडनवीस**—मुंबई येथील " लोकयुग " या मराठी साप्ताहिकाचे एक सहसंपादक. लघुकथा हा त्यांचा आवडता लेखन प्रकार असून शिवाय प्रासंगिक लेख लिहितात.

**प्रा. अ. रा. कामत**—फर्ग्युसन कॉलेजांत गणित विषयाचे प्राध्यापक. प्रासंगिक आणि विशेषतः सोव्हिएट रशियाविषयीं लेख लिहितात. त्यांचें सोव्हिएट रशियांतील शिक्षणव्यवस्थेवर " नवें शिक्षण " या नांवाचें पुस्तक नुकतेंच प्रसिद्ध झालें आहे.

डॉ. सौ. **सुशीलाबाई बेडेकर**—एम्. बी. बी. एस्. झाल्यानंतर माता-बाल-संगोपन शास्त्राविषयीं कलकत्ता इन्स्टिट्यूट ऑफ ट्रॉपिकल मेडिसिन या संस्थेंतील अभ्यासक्रम पुरा केला असून आरोग्यप्रचारिकांना शिक्षण देण्याच्या पुणें येथील " हेल्थ स्कूल "च्या सध्यां प्रमुख आहेत.